


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, सोमवार २२ जून २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ ८




# NEET पुनर्परीक्षा: 1-2 मिनिटे उशिरा पोहोचल्याने प्रवेश नाकारला

## हिजाबवरून वाद, कलावा-इअररिंग्स काढायला लावले, कपड्यांवरून चेन-बटणे काढली



राजस्थानमधील उदयपूर येथील सरकारी रेसिडेन्सी शाळेत नोज पिन न निघाल्याने विद्यार्थिनीच्या नाकावर टेप चिकटवण्यात आला.



मोदी कालेजमधील परीक्षा केंद्रावर एक विद्यार्थी पूर्ण बाह्यांचा टी-शर्ट घालून आला होता. पोलिसांनी शर्टच्या बाह्या कापून त्याला आत पाठवले.



राजस्थानमधील भीलवाडा येथील एका केंद्रावर उमेदवाराच्या टी-शर्टवरील धातूची बटणे आणि हाताला बांधलेले धागे कापण्यात आले.



उशिरा पोहोचल्यामुळे काही विद्यार्थिनींना प्रवेश मिळाला नाही. त्या गेटवर रडताना दिसल्या.

**नवी दिल्ली/भोपाळ/जयपूर/लखनौ/वृत्तसंस्था :**नीट-यूजी २०२६ ची पुनर्परीक्षा देशभरात दुपारी २ वाजता सुरू झाली होती. देशभरातील ५५१ शहरांमधील आणि परदेशातील १४ शहरांमधील ५,४४० केंद्रांवर २२.७९ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. ही परीक्षा दुपारी २ ते सायंकाळी ५:१५ पर्यंत चालली. .विद्यार्थ्यांना सकाळी ११ ते दुपारी १:३० पर्यंत परीक्षा केंद्रांमध्ये प्रवेश दिला गेला. मुंबईतील दोन आणि बंगळुरू तील चार विद्यार्थ्यांना एक-दोन मिनिटे उशिरा आल्यामुळे प्रवेश नाकारण्यात आला.बंगळुरू मध्ये, मुलींनी आत जाण्यासाठी रेलिंगवरू न उडी मारण्याचा प्रयत्न केला, परंतु परीक्षा कक्षाचे गेट बंद होते. राजस्थानमधील अजमेर येथील एका केंद्रावर हिजाब घातलेल्या एका विद्यार्थिनीला प्रवेश नाकारण्यात आला. ब-याच चर्चेनंतर तिला आत प्रवेश देण्यात आला.उदयपूरमध्ये, एका उमेदवाराची नथ गायब असल्याचे आढळले आणि तिच्या नाकावर टेप लावण्यात आला. मध्य प्रदेशातील भोपाळमध्ये, विद्यार्थ्यांच्या हातातील धागे कापण्यात आले. उत्तर प्रदेशात, मुलींना त्यांचे कानातले काढण्यास भाग पाडले गेले. दरम्यान, हैदराबादमध्ये एका १९ वर्षीय नीट (NEET) विद्यार्थिनीने आत्महत्या केली. रविवारी सकाळी तिचा मृतदेह तिच्या अपार्टमेंटमध्ये गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. पुनर्परीक्षेच्या दबावामुळे तिने हे पाउल उचलले असावे, असा पोलिसांना संशय आहे. घटनास्थळी सापडलेल्या आत्महत्येच्या पत्रात, त्या विद्यार्थिनीने आपल्या मृत्यूसाठी कोणालाही जबाबदार धरलेले नाही.

**२ लाखांहून अधिक सुरक्षा कर्मचारी तैनात, हवाई दलाने पेपर पोहोचवले-** या वर्षी ३ मे रोजी NEET-UG परीक्षा झाली होती. पण पेपरफुटीच्या आरोपांनंतर १२ मे रोजी NTA ने ती रद्द केली. आता एजन्सी पुन्हा परीक्षा घेत आहे. NTA नुसार, पुन्हा होणा-या परीक्षेत देशभरातील परीक्षा केंद्रांवर २ लाखांहून अधिक सुरक्षा कर्मचारी, ६७४ सिटी कोऑर्डिनेटर आणि ६,६६९ निरीक्षक तैनात करण्यात आले होती. पेपरफुटी रोखण्यासाठी पहिल्यांदाच भारतीय वायुसेनेची विमाने आणि हेलिकाप्टर वापरण्यात आलीत. वायुसेनेने २०० हून अधिक उड्डाणे करून NEET-UG च्या प्रश्नपत्रिका देशभरातील वेगवेगळ्या झोनपर्यंत पोहोचवल्या होत्या. NTA नुसार, ९५ हजारांहून अधिक परीक्षा केंद्रांवर CCTV पाळत ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली होती. एकूण १,३८,५६० CCTV कॅमेरे लावण्यात आले असल्याचे स्पष्ट झाले.त्यांच्यावर राष्ट्रीय, राज्य आणि मंत्रालय स्तरावर पाळत ठेवली जात होती.इलेक्ट्रानिक माध्यमांद्वारे होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी ५१, ३११ जॅमर लावण्यात आले होते.

# महिला शेतक-यांना मिळणार कायदेशीर दर्जा

## पावसाळी अधिवेशनात विधेयक मांडले जाणार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची माहिती

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्य विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन सोमवारपासून सुरू होत आहे. या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला होणा-या चहापानाच्या



कार्यक्रमावर विरोधकांनी बहिष्कार टाकला. त्यानंतर महाविकास आघाडीची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून विरोधकांनी सरकारवर जोरदार टीका केली. त्यानंतर महायुतीची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांच्या टीकेला जोरदार प्रत्युत्तर दिलं. तसेच राज्यातील विविध विषयांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केलं. (पान २ वर)

# अमोनिया वायूची गळती; 7 जणांचा मृत्यू, 70 कर्मचा-यांची प्रकृती बिघडली

**बंगळुरू/वृत्तसंस्था :**तामिळनाडूमधील तिरु वल्लूर येथे एक मोठी दुर्घटना घडली आहे. येथील एका कारखान्यामधील अमोनिया वायूची गळती होउन ७ जणांचा मृत्यू झाला आहे. तर या वायूची बाधा



होउन ७० हून अधिक कर्मचा-यांची प्रकृती बिघडल्याचे सांगण्यात येत आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री विजय यांनी या दुर्घटनेबाबत दुःख व्यक्त केले असून, घटनेच्या चौकशीसाठी एका समितीची स्थापना करण्याचे आदेश दिले आहेत. दुर्घटना घडली तेव्हा सदर कारखान्यात १०० हून अधिक कामगार काम करत होते. त्यामधील ७० जणांची प्रकृती एकाच वेळी बिघडली. तर उर्वरित कर्मचारी घाबरू न कारखान्याबाहेर पळाले. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासनातील अधिका-यांनी घटनास्थळी धाव (पान २ वर)

# अल्पवयीन मुलीवर दोघा नराधमांचा लैंगिक अत्याचार

**कल्याण** : एका १६ वर्षीय मुलीवर दोघा नराधमांनी लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना पुर्वेकडील भागातील एका घरात



शनिवारी रात्री उशीरा घडली. अख्तर मणियार आणि सलीम शेख अशी अटक आरोपींची नावे आहेत. विशेष बाब म्हणजे हे दोघेही ६० ते ६५ वर्षांचे आहेत. दोघांना कोळसेवाडी पोलिसांनी अटक केली आहे. दोघांविरोधात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.

पीडित मुलगी अत्यंत गरीब असून प्लास्टीक कचरा, भंगार वेचून उदरनिर्वाह करीत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. तर दोघा आरोपींमधला मणियार हा एपीएमसी मार्केटमध्ये चहा विक्रीचा व्यवसाय करतो. तर सलीम हा रिक्षाचालक आहे. या दोघांनी पिडीतेला फूस लावून एका घरात नेले आणि तिच्यावर अत्याचार(पान २ वर)

# विधान परिषदेच्या उर्वरित जागांचा आज फैसला

**मुंबई :** राज्य विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील १७ पैकी ६ जागांवर महायुतीने मतदानापूर्वीच बिनविरोध विजय



मिळवला आहे. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष उर्वरित ११ जागांच्या निकालाकडे लागले असून, या बहुचर्चित निवडणुकीची मतमोजणी सोमवार, दि. २२ जून रोजी होणार आहे. या निवडणुकीत अनेक नाट्यमय घडामोडी पाहायला मिळाल्या. अमरावती मतदारसंघात काँग्रेसमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला. पक्षाने आपल्या सदस्यांना मतदानात तटस्थ राहण्याचा व्हिप (पक्षादेश) बजावला होता, मात्र काँग्रेस नगरसेवकांनी तो धुडकावून लावत मतदानात भाग घेतला. दुसरीकडे, नाशिक आणि भंडारा-गोंदिया या मतदारसंघांमध्ये मतदारांनी १०० टक्के मतदानाचा हक्क बजावला.(पान २ वर)

# चंपत रायसह 150 जणांना अयोध्या न सोडण्याचा इशारा

**अयोध्या/वृत्तसंस्था :**राम मंदिरातील देणगी चोरीचा तपास करणारे विशेष तपास पथक (एसआयटी) उद्या, सोमवारी, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना आपला प्राथमिक अहवाल सादर करण्याची शक्यता आहे. या पथकाने रविवारी संध्याकाळी मुख्यमंत्री योगी यांची भेट घेतली होती, परंतु बैठक झाली नाही. मुख्यमंत्री आधीच नियोजित असलेल्या पावसाळी अधिवेशनासह इतर बैठकांमध्ये व्यस्त होते.एसआयटीने सात पेन ड्राईव्हवर माहिती जतन केली आहे. सहा दिवसांच्या तपासात १५० संशयितांची नावे समोर आली आहेत. यापैकी २५ जणांवर कारवाई होण्याची शक्यता आहे. एसआयटीने ज्यांची चौकशी केली आहे, त्यांना पुढील सूचना मिळेपर्यंत कुठेही प्रवास न करण्याचा इशारा देण्यात आला आहे. यामध्ये ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय आणि विश्वस्त अनिल मिश्रा यांचा समावेश आहे. राम मंदिरात प्रभाव



## योगींना राम मंदिर देणगी चोरीचा अहवाल देणार SIT, 7 पेन ड्राइवमध्ये पुरावे

असलेल्या रामशंकर यादव उर्फ टिन्नू यांची एसआयटीने जवळपास दररोज चौकशी केली आहे. पथकाने त्यांचे जवळचे सहकारी, नातेवाईक आणि त्यांच्या मालमत्तेबद्दलही माहिती मिळवली आहे. या सहा दिवसांत, पथकाने सीसीटीव्ही फुटेज, देणगीची सविस्तर माहिती, देणगी मोजण्याची पद्धत आणि बँकेत पैसे हस्तांतरित करण्याची पद्धत यासह प्रत्येक तपशिलाची बारकाईने तपासणी केली. सहाव्या दिवशी, शनिवारी, पथकाने सर्व आरोपी आणि संशयितांच्या बँक खात्याची माहिती मिळवली. या तपासानंतर, पथकाने सर्व पुरावे आपल्यासोबत नेले.

**यांना अयोध्या सोडून न जाण्याचा इशारा मिळाला-**SIT ने मंदिराच्या दानपेट्यांमधील निधीचा वापर, अनावश्यक खर्च आणि जमीन खरेदीशी संबंधित प्रकरणांचीही चौकशी केली. २०२१ पर्यंतचे जुने रेकॉर्डही तपासले. बँक अधिका-यांचीही चौकशी केली. सूत्रांनुसार, ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय आणि विश्वस्त डी. अनिल मिश्रा यांच्यावर कारवाई जवळपास निश्चित(पान २ वर)

# 60 किलो चांदीसह मौल्यवान हार, पादुका चोरीला

अयोध्या : अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरातून ६० किलो चांदी, मौल्यवान हार आणि चरण पादुका चोरीला गेल्यावरून एसआयटीकडून



चौकशी सुरू करण्यात आली आहे. रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यादरम्यान या विटा मंदिराला दान करण्यात आल्या होत्या आणि त्या मंदिराच्या पायाभरणीत वापरल्या जाणार होत्या. याप्रकरणी सध्या विशेष तपास पथक सखोल तपास करत आहे. गेल्या सहा दिवसांपासून एसआयटीचे पथक या चांदीच्या विटांच्या कागदपत्रांची आणि सध्याच्या स्थितीची पडताळणी करत आहे. मात्र, अधिकृत रेकार्डमध्ये या चांदीची नोंद, साठवणूक किंवा वापराबाबत कोणतीही स्पष्ट माहिती पोलिसांना मिळालेली नाही. दुसरीकडे, चांदी दान करणाऱ्या ज्वेलर्स असोसिएशनचे अध्यक्ष अनुराग रस्तोगी यांनी सांगितले की, देशभरातील सराफा व्यापाऱ्यांच्या मदतीने ही ६० किलो चांदी गोळा करू न मंदिराला देण्यात आली होती. या दानाची अधिकृत पावतीही त्यांच्याकडे आहे.

# 23 जूनपासून महाराष्ट्रात मान्सून होणार सक्रिय

## संपूर्ण कोकणात शेवटच्या आठवड्यात मुसळधार

**मुंबई/प्रतिनिधी :**जून महिना अर्धा संपूनही संपूर्ण महाराष्ट्र सध्या भीषण उन्हाचा आणि उकाड्याचा सामना करत आहे. मात्र आता नागरिकांसाठी दिलासादायक बातमी आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, खंडित झालेला मान्सून पुन्हा एकदा पुढच्या प्रवासासाठी सज्ज झाला असून, २३ जूनच्या आसपास तो महाराष्ट्रासह देशातील इतर राज्यांमध्ये वेगाने पुढे सरकणार आहे.हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २२-२३ जूनपासून दक्षिण कोकण आणि महाराष्ट्रालगतच्या भागात मान्सून पुन्हा सक्रिय होईल. पावसाचा जोर हळूहळू वाढून २४ ते २६ जून दरम्यान तो मुंबईसह उत्तर कोकण आणि महाराष्ट्राच्या अंतर्गत भागांपर्यंत पोहोचेल.



**अशी असेल वाटचाल-** मान्सूनची उत्तर सीमा सध्या हर्णे, सोलापूर, हैदराबाद, भद्राचलम, कोरापुट, फुलबनी, रांची, जमुई, मुजफ्फरपूर या भागांमधून जात आहे.

**पुढील वाटचालीस अनुकूल वातावरण -** २३ जूनच्या सुमारास मान्सून महाराष्ट्राचे आणखी काही भाग, तेलंगणा, ओडिशा, झारखंड आणि बिहार, छत्तीसगडच्या काही भागांत पुढे सरकण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे.

**२५ जूनपर्यंत उष्णतेची लाट-**२० जूनला कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी अधिक उष्णता नोंदवली गेली. तर पूर्व उत्तर प्रदेश आणि विदर्भात २५ जूनपर्यंत उष्णतेची लाट कायम राहू शकते.

**संपूर्ण कोकणात शेवटच्या आठवड्यात मुसळधार** - २५ जून ते १ जुलै (पान २ वर)

# सरकारची कर्जमाफी फसवी, शेतक-यांचा 7/12 कोरा करा

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्य सरकारच्या अपयशी कारभाराविरोधात आणि जनतेच्या प्रश्नांबाबत सरकारच्या असंवेदनशील भूमिकेचा निषेध म्हणून महाविकास आघाडीने विधानमंडळ अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात आलेल्या सरकारच्या चहापान कार्यक्रमावर बहिष्कार टाकल्याची घोषणा आज पत्रकार परिषदेत करण्यात आली. महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी राज्यातील गंभीर प्रश्नांकडे सरकारचे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला. राज्यात दुष्काळ,शेतकरी प्रश्न, महिलांवरील वाढते अत्याचार, ढासळलेली कायदा-सुव्यवस्था, वाढते अमली पदार्थांचे जाळे यांसारख्या अनेक




प्रश्नांवर सरकारकडे कोणतेही समाधानकारक उत्तर नसल्याची टीका महाविकास आघाडीने केली.

राज्यावर दुष्काळाचे संकट आहे.पेरण्या लांबला आहेत, शेतक-यांसमोरील अडचणी वाढत आहे.सरकारने सुका दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी शिवसेनेचे गटनेते भास्कर जाधव यांनी पत्रकार परिषदेत केली. (पान २ वर)

# योग केवळ श्रमाचे साधन नाही; मानवतेला एकत्र जोडणारी शक्ती

## योगदिनी PM मोदींचा खास संदेश






कोलकाता येथे योगा करताना पंतप्रधान मोदींनी गर्दीतील लोकांना शीतली प्राणायाम करायला शिकवले.

**कोलकाता/वृत्तसंस्था :**पश्चिम बंगाल ही रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद यांसारख्या संतांची भूमी आहे. त्यांनी जगभरात योग संदेश पसरवण्यास मदत केली. या पवित्र भूमीवर सामूहिक योगाभ्यास केल्याने एक अनोखा आध्यात्मिक अनुभव मिळतो. महर्षी अरविंद यांनी म्हटले आहे की, आपल्याला जाणीव असो वा नसो, आपले संपूर्ण जीवनच योग आहे. जेव्हा योगाभ्यास आपल्या जीवनाचा भाग बनतो, तेव्हा तो मानवी एकतेचा आधार बनतो. योग हे केवळ शारीरिक श्रमाचे साधन नाही, किंवा ते कोणत्याही विशिष्ट वयोगटापुरते मर्यादित नाही. योग हा चेतना आणि उर्जेसह मानवी जीवनाचा प्रकाश आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त परदेशातील २१० हून अधिक भारतीय दूतावास जगभरातील सुमारे २,५०० ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करत आहेत, तर देशभरातील १०० नामांकित सांस्कृतिक आणि ऐतिहासिक स्थळांवर विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. पंतप्रधान मोदी यांनी कोलकाता येथे विशेष कार्यक्रमाला उपस्थिती लावली आणि उपस्थितांना मार्गदर्शन केले. योगामुळे लोकांना वाढत्या वयातही तरु ण आणि (पान २ वर)



गुजरातच्या वडोदरा येथे महिलांनी जलतरण तलावात पदाधीरासन केले.



### अखेर ओम निंबाळकरांची अधिकृत भूमिका स्पष्ट

# ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देत शिंदे गटात प्रवेश

**मुंबई/धाराशिव:** राजकीय वर्तुळातून एक अतिशय मोठी आणि खळबळजनक बातमी समोर येत आहे. शिवसेना ठाकरे गटात पुन्हा एकदा मोठी फूट पडली असून, पक्षाच्या नऊ पैकी सहा खासदारांनी बंडखोरीचा झेंडा फडकवला आहे. हा शिवसेना ठाकरे गटासाठी अत्यंत मोठा आणि धक्कादायक निर्णय मानला जात आहे. या बंडखोर खासदारांमध्ये धाराशिवचे लोकप्रिय खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या नावाचाही समावेश होता. मात्र, शनिवारी त्यांनी मी अजून पक्षप्रवेशाबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही, मतदारसंघातील कार्यकर्त्यांशी चर्चा करूनच पुढचे पाउल टाकेन, असे विधान केल्यामुळे शिवसेना शिंदे गटाचे टेन्शन वाढले होते. पण आता अखेर ओमराजे निंबाळकर यांनी आपली अधिकृत भूमिका जाहीर केली असून ठाकरे गटाला जय महाराष्ट्र केला आहे.



**कार्यकर्त्यांच्या दरबारात झाला मोठा निर्णय-** ओमराजे निंबाळकर यांनी आज धाराशिव लोकसभा मतदारसंघातील आपल्या जीवाभावाच्या कार्यकर्त्यांची आणि मतदारांची एक महत्त्वपूर्ण बैठक बोलावली होती. या बैठकीला दुपारी सव्वाचार वाजेपासून हजारो कार्यकर्त्यांनी हजेरी लावली होती. रात्री ८ वाजेपर्यंत सलग ४ तास ओमराजे यांनी प्रत्येक कार्यकर्त्याचे मत आणि सूचना जाणून घेतल्या. या प्रदीर्घ चर्चेनंतर त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करण्याचा अंतिम निर्णय जाहीर केला.

**म्हणून घेतला ठाकरे गट सोडण्याचा निर्णय!**

आपली भूमिका स्पष्ट करताना ओमराजे निंबाळकर भावूक झाले होते. त्यांनी गेल्या काही वर्षांतील स्थानिक राजकारणाची पार्श्वभूमी मांडताना सांगितले की, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये आपले कार्यकर्ते जीवाचे रान करून लढले. मात्र, धाराशिवमधील एकाही पंचायत समितीत किंवा नगरपालिकेत आपल्याला यश मिळाले नाही. मी आणि माझ्या सहका?यांनी २४ तास सामान्य लोकांसाठी दिले, प्रामाणिकपणे काम केले. आमचा कार्यकर्ता कधीही कामात किंवा लोकांच्या समस्या सोडवण्यात कमी पडला नाही. पण, सत्ता नसल्यामुळे आपल्याला पराभवाला सामोरे जावे लागले.

ते पुढे म्हणाले की, सत्तेत नसल्यामुळे सामान्य माणसाची साधी कामे करणे, अगदी ट्रान्सफॉर्मरच्या अडचणी सोडवणेही कठीण झाले होते. आम्ही सामान्य माणसाच्या कामासाठी राजकारणात आहोत. त्यामुळेच कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव आणि संमतीने आम्ही आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात काम करण्याचा निर्णय घेतला आहे.

**ठाकरे गटाला मोठा हादरा, शिंदे गट बळकट**

ओमराजे निंबाळकर यांच्या या अधिकृत घोषणेमुळे शिवसेना ठाकरे गटाला मराठवाड्यात खूप मोठा फटका बसला आहे. तर दुसरीकडे, ओमराजेंच्या संभ्रमावस्थेमुळे चिंतेत असलेल्या शिंदे गटाला आता मोठा दिलासा मिळाला असून धाराशिवमध्ये त्यांची ताकद कमालीची वाढली आहे. ठाकरे गटाच्या एकूण ९ खासदारांपैकी ६ जण फुटल्यामुळे आता संसदेतही ठाकरे गटाचे स्थान अडचणीत येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## जामगाव-नागझिरी फाट्याजवळ तरुणाचा अपघातात मृत्यू

**मोर्शी/प्रतिनिधी:-**कोरोना महामारीत वडिलांचा मृत्यू झाल्यानंतर आईचा सहारा असणाऱ्या एका १९ वर्षीय तरुणाचा अपघात होऊन मृत्यू झाल्याची घटना दि.२१ जून रोजी उघडकीस आली. एकुलता एक मुलाच्या मृत्यूने समाजमन सुन्न झाले आहे.मृतक तरुणाचे नाव अनिकेत विजयराव बनसोड (वय १९) रा. समर्थ कॉलनी मोर्शी असे आहे. याबाबत प्राप्त माहितीनुसार समर्थ कॉलनी मोर्शी येथील अनिकेत विजय बनसोड हा लग्नसमारंभात व्हिडिओ शूटिंग व फोटोग्राफीचे काम करून आपल्या घरचा उदरनिर्वाह करीत होता. दि.१८ जून रोजी सकाळी अनिकेत हा आपल्या बुलेट मोटरसायकलने वरुड येथे एका लग्न समारंभासाठी व्हिडिओ शूटिंग व फोटोग्राफी काढण्यासाठी गेला होता. लग्नसमारंभातील व्हिडिओ शूटिंग व फोटोग्राफी आटोपून तो आपल्या मोटरसायकलने रात्री दहा वाजता वरुड येथून बेनोडा मार्गे मोर्शी येथे येत असतांना जामगाव नागझिरी फाट्याजवळ अचानक जंगली डुक्कर गाडीला आडवे आल्यामुळे तो गतप्राण झाले. अनिकेत याला डोक्याला जबर मार बसल्यामुळे नाका तोंडातून प्रचंड रक्तस्त्राव होत होता. मागाहून येणाऱ्या गाडी चालकाने घटनास्थळी थांबवून जखमी अनिकेतच्या मोबाईलवरून त्याच्या नातेवाईकाला फोन लावून माहिती दिली.लगेच १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या वरुडच्या नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेऊन अनिकेतला वरुड येथील दवाखान्यात भरती केले.मात्र परिस्थितीचे गांभीर्य पाहून अनिकेतला तात्काळ अमरावती येथे नेण्याचा सल्ला देण्यात आला.त्याच रात्री अमरावती येथील खाजगी दवाखान्यात त्याला भरती करण्यात आले. डॉक्टरांनी औषधोपचार करून शर्तीच्या प्रयत्नानंतरही दि. २० जून रोजी रात्री अनिकेतची प्राणज्योत मालवली.वडील नसलेल्या व आईचा सहारा असलेल्या एकुलत्या एक तरुणाचे अपघाती निधन झाल्यामुळे समाजमन सुन्न झाले. आज अनिकेतचा मृतदेह मोर्शी येथे आणण्यात येऊन मोर्शी येथील स्मशानभूमीत त्याच्यावर अंतिम संस्कार पार पडले. यावेळी उपस्थितांचे डोळे मात्र पाणावल्याशिवाय राहिले नाही.



मृतक अनिकेतच्या मामेभावाचा हळदीचा कार्यक्रम दि.१९ रोजी मोर्शी येथे पार पडणार होता.त्यासाठी तो वरुड येथून रात्रीलाच मोर्शी येथे निघाला होता त्यातच त्याचे अपघाती निधन झाले.दि.२२ जूनपासून अमरावती जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांनी हेल्मेट वापरण्याची सक्ती केली असून हेल्मेटमुळे डोक्याला मार बसत नाही व मृत्यू होण्याची संभावना कमी असते.त्यामुळे हेल्मेट वापरणे बंधनकारक केले आहे.

पान १ व १० वरून

## महिला शेतक-यांना मिळणार

तसेच या पावसाळी अधिवेशनात महिलांसाठी एक महत्वाचं विधेयक विधीमंडळात मांडलं जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीसांनी दिली आहे. महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक अधिवेशनात मांडण्यात येणार असून या विधेयकानुसार आता महिला शेतक-यांना कायदेशीर दर्जा मिळणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?

विरोधकांनी नेहमीप्रमाणे चहापानाच्या निमंत्रणावर जाहीर बहिष्कार टाकला. विरोधकांनी सहा पानाचं एक पत्र आम्हाला दिलेलं आहे. खरं तर विरोधक चर्चेला आले असते, तर काही गोष्टींवर चर्चा झाली असती. मात्र, त्यांनी तसं न करता आम्हाला एक पत्र दिलं. आता हे पत्र आपण पाहिलं तर यावर एका वेगळ्या पानावर आधीच सर्वांच्या सह्या घेउन ठेवलेल्या दिसत आहेत. त्यानंतर त्यावर सहा पानांचं पत्र जोडलेलं दिसत आहे. मी हे पत्र चेक केलं असता माझ्या लक्षात आलं की विरोधकांनी हे पत्र चॅटजीपीटीने तयार केलेलं आहे, असं म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर टीका केली.

भास्कर जाधवांना खोचक टोला-आपण अलिकडच्या काळात पाहिलं असेल की ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव फारच रागवतात. काल आपण पाहिलं असेल की मिलिंद नार्वेकर यांनी दोन-चार वेळा गाडीचा ह?र्न वाजवल्यानंतर भास्कर जाधव यांनी त्यांचंच ऑपरेशन तुडवा करून टाकलं, अशा शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी खोचक टोला लगावला.

विरोधकांच्या पत्रात एकही नवा विषय नाही

विरोधकांच्या पत्रात एकही नवा विषय दिसत नाही. विरोधकांनी दिलेल्या पत्रातील एक पॅराग्राफ असा आहे की २०२३ पासून प्रत्येक पत्रात तो पॅराग्राफ दिसून येतो, म्हणजे विरोधक काहीही बदल करत नसल्याचं यावरून दिसून येतं. याचं कारण लोकांचे प्रश्न विरोधकांना अवगतच नाहीत. या पत्रात कर्जमाफीबाबतचा मुद्दा मांडण्यात आलेला आहे. मी तुम्हाला सांगतो की सध्या कोणत्याही निवडणुका नसताना आम्ही शेतक-यांची कर्जमाफी केली आहे. आमच्यासाठी शेतक-यांची कर्जमाफी हा राजकीय विषय नाही. आपण शेतक-यांच्या कर्जमाफीबाबत एक समिती तयार केली होती, त्या समितीच्या आधारावर काही अटी आपण त्यामध्ये टाकलेल्या आहेत. ३६ हजार ८५ कोटी रुपयांच्या या कर्जमाफीचा ५६ लाख शेतक-यांना लाभ होणार आहे, असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं आहे.

महिला शेतक-यांना मिळणार शेतक-यांचा दर्जा

या अधिवेशनात १० नवीन विधेयके मांडण्यात येणार आहेत. त्यातील सर्वात महत्वाचं विधेयक म्हणजे महिला शेतक-यांना कायदेशीर शेतक-यांचा दर्जा देणारं विधेयक मांडलं जाणार आहे. सर्व्हे करताना लक्षात आलं की शेतीच्या क्षेत्रात सर्वात जास्त काम करणा-या महिला आहेत. मात्र, तरीही महिलांना शेतक-यांचा अधिकृत दर्जा नाही. किंवा महिलांच्या नावावर शेती नसल्यामुळे त्यांना शेतकरी समजलं जात नाही. मात्र, आता या अधिवेशनात आपण महिला शेतक-यांना कायदेशीर दर्जा देउन त्या शेतकरी असल्याचा दाखला देणार आहोत. या बरोबरच आणखी काही विधेयक देखील मांडण्यात येणार आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री फडणवीसांचा विरोधकांना इशारा

आमचा प्रयत्न हा संवादाचा आहे. विरोधकांनी संवाद ठेवला तर आम्ही चर्चेतून सर्व प्रश्नांची उत्तरं द्यायला तयार आहोत. विरोधकांनी राजकारण केलं तर राजकीय उत्तर मिळतील. समाजकारण केलं तर सामाजिक उत्तरं मिळतील. हितांसाठी प्रश्न विचारले तर हितकार्य अशा प्रकारचे उत्तरं मिळतील. मला विश्वास आहे की हे अधिवेशन तीन आठवडे चालेल, असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## अमोनिया वायूची गळती;

घेतली. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या कर्मचा-यांचे मृतदेह ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्या शवविच्छेदनाबाबत विचारविनिमय सुरू आहे. दरम्यान, वायू गळतीमुळे बाधा झालेल्या कर्मचा-यांच्या प्रकृतीवर ड?क्टरांचं एक पथक लक्ष ठेवून आहे.या दुर्घटनेबाबत प्रशासनाकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार या कारखान्यामध्ये कोळंबीवर प्रक्रिया करण्याचे काम केले जात असे. या दुर्घटनेनंतर कामगारांमध्ये शोकाकूल वातावरण आहे. तसेच तामिळनाडूचे मुख्यमंत्री विजय यांनी या घटनेच्या चौकशीसाठी एक तीन सदस्यीय समिती स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच या समितीला २४ तासांत अंतरिम अहवाल आणि पुढील ३ दिवसांत अंतिम अहवाल सोपवण्याची सूचना देण्यात आली आहे.

## अल्पवयीन मुलीवर दोघा

केला. ज्याठिकाणी लैंगिक अत्याचाराचा प्रकार घडला. ते घर मणियार याने भाडयाने घेतले आहे. दरम्यान पिडीतेने आरडाओरड केल्यानंतर शेजारी राहणा-या लोकांना हा प्रकार समजला आणि त्यांनी तातडीने ११२ नंबरवर काल करून पोलिसांना याबाबत माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दोघा नराधमांच्या मुसक्या आवळल्या. ज्या घरात हा प्रकार घडला त्याठिकाणी रक्ताचे डाग पडलेले होते. दरम्यान या प्रकरणी कोळसेवाडी पोलिस पुढील तपास करत आहेत.

**नराधमांना कठोर शिक्षा झाली पाहिजे-**घटनेची माहिती मिळताच आ. सुलभा गायकवाड यांनी सहाय्यक पोलिस आयुक्त अशोक होनमाने यांची भेट घेतली. दोन्ही आरोपींना कठोर शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी गायकवाड यांनी केली. पिडीतेला न्याय मिळालाच पाहिजे. भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी महिला व बालकांच्या सुरक्षेसंदर्भात अधिक प्रभावी उपाययोजना राबवा असेही गायकवाड यांनी सांगितले. शिंदेसेनेचे नगरसेवक महेश गायकवाड यांनीही या घटनेबाबत तीव्र संताप व्यक्त केला. नराधमांना फाशीची शिक्षा व्हावी अशी मागणी त्यांनी केली. तर कल्याण परिसरात वारंवार महिला अत्याचाराच्या घटना घडत आहेत. लाडकी बहिण योजनेची जाहिरात करणा-या सरकारच्या अर्थात देवाभाउ यांच्या राज्यात आज लाडकी बहिणच सुरक्षित नाही ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. नराधमांना कठोर शिक्षा दयावी अशी मागणी उध्दवसेनेचे युवा सेना शहर अधिकारी अ‍ॅड नीरज कुमार यांनी केली.

## विधान परिषदेच्या उर्वरित

**संभाजीनगरात तिरंगी लढत**-छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघात ६३७ पैकी ६३० मतदारांनी (९८.९० टक्के) मतदान केले. येथे महायुतीचे सुहास शिरसाठ, महाविकास आघाडीचे गणेश लोखंडे आणि अपक्ष उमेदवार इसाक खान सांडू खान यांच्यात तिरंगी लढत आहे. निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयातील मतमोजणी केंद्राची पाहणी करून पूर्वतयारीचा आढावा घेतला. मतमोजणीसाठी ४ टेबल लावण्यात आले असून ५४ अधिकारी-कर्मचारी तैनात आहेत.

**असा ठरणार विजयाचा कोटा-**या निवडणुकीत विजयाचे गणित थोडे वेगळे असते. विजयी होण्यासाठी एकूण वैध मतांच्या ५० टक्के अधिक १ मत असा विजयाचा कोटा निश्चित केला जातो. पहिल्या पसंतीक्रमाच्या मतमोजणीत हा कोटा पूर्ण न झाल्यास, दुस-या पसंतीची मते मोजली जातात.

**नाशिकमध्ये दुपारी १२ पर्यंत लागू शकतो निकाल**

नाशिकमध्ये ६१९ पैकी ६१८ मतदारांनी मतदान केले. जर सर्व मते वैध ठरली, तर विजयासाठी ३१० मतांचा कोटा लागेल. मात्र, मते अवैध ठरल्यास हा कोटा कमी होउ शकतो. येथे भाजपा विरुद्ध भाजपाशी संबंधित अपक्ष अशी लढत असल्याने दराडे की गिते? याचा फैसला दुपारी १२ वाजेपर्यंत लागण्याची शक्यता आहे.

**बिनविरोध विजयी उमेदवार-**वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर : अरुण लखानी, भाजप पुणे: विक्रम काकडे , राष्ट्रवादी कॉंग्रेस ठाणे : रवींद्र फाटक , शिवसेना रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग : अनिकेत तटकरे, राष्ट्रवादी कॉंग्रेस यवतमाळ : दुष्यंत चतुर्वेदी, शिवसेना अहिल्यानगर : प्राजक्त तनपुरे, भाजप

## चंपत रायसह 150 जणांना

आहे. दोघांनाही पदावरून हटवले जाउ शकते. याशिवाय, मंदिराचे बांधकाम प्रभारी गोपाल राव यांनाही पदावरून हटवले जाउ शकते.

**आतापर्यंत २ कोटींची वसुली-** देणगी चोरी प्रकरणात लवकुश, अवनीश, अनुकल्प, करुणे आणि रामशंकर उर्फ टिन्नू या ५ जणांच्या माहितीनुसार आतापर्यंत २ कोटी रुपयांची वसुली करण्यात आली आहे. हे सर्व मंदिरात दान केलेल्या रकमेच्या मोजणीच्या कामाशी संबंधित होते. मंदिर ट्रस्टचे कर्मचारी टिन्नू यांच्या घरातून १३ जून रोजी सोने सापडले होते. तथापि, सोन्याचे प्रमाण किती आहे, हे अद्याप निश्चित झालेले नाही. सपा सरकारमध्ये मंत्री राहिलेल्या पवन पांडे यांनी ७ जून रोजी दावा केला होता की, राम मंदिरातून ५ ते ७.५ कोटी रुपयांपर्यंतची चोरी झाली आहे. अखिलेश यांनीही म्हटले होते की, या प्रकरणावर सरकारचे मौन संशयास्पद आहे. न्यायालयाने या प्रकरणाची दखल घ्यावी. चंपत राय यांनी स्पष्टीकरण दिले होते की, अद्याप अशी कोणतीही गोष्ट समोर आलेली नाही. वाद वाढल्यावर भाजप नेते डा. रजनीश सिंह यांनी ९ जून रोजी पंतप्रधानांना पत्र लिहून सीबीआय चौकशीची मागणी केली. दुस-या दिवशी म्हणजेच १० जून रोजी पंतप्रधान कार्यालयाने (PMO) ने मंदिर ट्रस्टकडून या प्रकरणाचा अहवाल मागवला होता.

राम जन्मभूमी मंदिर निर्माण समितीचे अध्यक्ष, माजी IAS नृपेंद्र मिश्रा म्हणाले की, राम मंदिरातील देणग्यांच्या चोरीवर उघडपणे दरोडा टाकला गेला. मंदिराचे संपूर्ण व्यवस्थापन बदलले पाहिजे. हा लोकांसोबत खूप मोठा विश्वासघात आहे. बँकेतील लोकांनी जबाबदारी पार पाडली नाही. यापेक्षा मोठी निष्काळजीपणा काय असू शकते?

या गोष्टी नृपेंद्र मिश्रा यांनी शुक्रवारी एबीपी न्यूजशी बोलताना सांगितल्या. ते म्हणाले - मोजणी प्रक्रियेशी संबंधित पुराव्यांवरून असे दिसून येते की, संपूर्ण व्यवस्थेत देखरेख जवळजवळ शून्य होती आणि दक्षता गंभीरपणे कमी होती. तर, बँक आणि ट्रस्ट यांच्यात झालेल्या करारामध्ये स्पष्टपणे ठरले होते की देणग्यांची मोजणी आणि त्यांचा हिशेब ठेवण्याची जबाबदारी बँकेची असेल. राम मंदिरात देणगी चोरीच्या वादामुळे मुख्यमंत्री योगी शुक्रवारी अयोध्येला पोहोचले होते. हनुमानगढी मंदिरात पूजा-अर्चा केली. त्यानंतर राम मंदिरात पोहोचून रामलल्लाचे दर्शन घेतले. मुख्यमंत्री योगी म्हणाले - विरोधक रामाचा नारा लावणा-यांवर गोळ्या झाडत होते. त्यांचे दुहेरी चरित्र तर बघा. राम मंदिर बनू नये यासाठी कॉंग्रेसने पराकाष्ठा केली होती. सर्वोच्च न्यायालयात निर्लज्जपणे म्हटले होते की, राम तर झालेच नाहीत. तीच कॉंग्रेस आज अयोध्येबद्दल खूप उत्सुक झाली आहे.

योगींनी जाहीर सभेत सांगितले- सपाचे दुहेरी चारित्र्य बघा, म्हणते की रामभक्तांचा अपमान झाला आहे. कारसेवकांवर आणि रामभक्तांवर गोळ्या चालवणारे लोक उपदेश द्यायला निघाले आहेत. आम्ही ट्रस्टच्या विनंतीवरून एसआयटी चौकशी बसवली. एसआयटी दूध का दूध आणि पाणी का पाणी करूनच राहील. मी सर्वांना सांगेन की कोणीही अशी अनावश्यक टिप्पणी करू नये, ज्यामुळे रामभक्तांना दुःख होईल.

## 23 जूनपासून महाराष्ट्रात मान्सून

दरम्यानच्या जुनच्या शेवटच्या आठवड्यात मुंबईसह संपूर्ण कोकणात जोरदार मान्सूनची शक्यता कायम आहे. मुंबईतील मान्सूनच्या आगमनानंतर म्हणजे जुनच्या शेवटच्या आठवड्यात खान्देश, नाशिक, अहिल्या नगर, पुणे, सातारा, कोल्हापूर व पश्चिम मराठवाड्यातील जिल्ह्यात मान्सूनच्या पावसाची शक्यता आहे. पूर्व मराठवाडा व विदर्भात मात्र जुलै पहिल्या व दुस-या आठवड्यात मान्सूनच्या शक्यता जाणवते. तत्पूर्वी तुरळक ठिकाणी किरकोळ पूर्वमोसमी पावसाची शक्यता आहे. तर २३ आणि २४ जून रोजी कोकण आणि गोव्यात मुसळधार पावसाची शक्यता आहे. २०१९ व २०२३ या एल-निनोच्या दोन वर्षात मुंबईत मान्सूनचे १४ दिवसांनी उशिरा आगमन झाले होते. यावर्षीही एल-निनोचे वर्ष आहे आणि अद्याप मुंबईत मान्सून पोहोचला नाही. २०२६ च्या एल-निनो वर्षात मान्सूनचे २५ जूनला मुंबईत आगमनाची शक्यता आहे.

## सरकारची कर्जमाफी फसवी,

सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी ही फसवी असून त्यात शेतक-यांना अटी शर्तीमध्ये अडकवण्यात आले आहे. महायुती सरकारने शेतक-यांचा ७/१२ कोरा करावा अशी मागणी महाविकास आघाडीने यावेळी केली.विधान परिषदेचे कॉंग्रेस गटनेते सतेज पाटील यांनी,हे सरकार ५६ टक्के कमिशन सरकार असल्याची टीका केली. राज्यात कंत्राटदारांनी अधिवेशन घेउन कामांची बिले मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणात कमिशन द्यावे लागत असल्याचे सांगितले. कंत्राटदारांची तब्बल एक लाख कोटी रुपयांहून अधिक बिले प्रलंबित आहेत. जल जीवन मिशनच्या निधीत कपात झाली असून अनेक विकासकामे रखडली आहेत. दुसरीकडे राज्यावरील कर्जाचा बोजा साडेनउ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याने महाराष्ट्राची आर्थिक स्थिती चिंताजनक बनली आहे अशी टीका सतेज पाटील यांनी केली. राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील म्हणाले राज्यात कायदा आणि सुव्यवस्था कोलमडली आहे.महिलांवर अत्याचार वाढले आहे.ड्रग्सचे प्रमाण राज्यात प्रचंड वाढले आहे .अशा प्रकरणात छोट्या लोकांना अटक होते.पण मास्ट्रर माईंड मात्र मोकाट असतात. अमली पदार्थ विकणारे आणि पोलिसांचे हितसंबंध आहेत यातून या घटना वाढत आहे. देवस्थानच्या जमिनीचा घोटाळा मागील अधिवेशनात मांडला. पण काही कारवाई नाही अशी टीका जयंत पाटील यांनी केली. सरकार विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर उत्तर देण्याऐवजी केवळ टिंगल-टवाळी करत आहे. विरोधकांनी दिलेल्या पत्रातील व्याकरणावर भाष्य करण्यापेक्षा त्यातील प्रत्येक मुद्द्यांवर उत्तर देण्याची जबाबदारी सरकारची आहे,अशी टीका जितेंद्र आव्हाड यांनी केली. जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची तयारी नसलेल्या सरकारसोबत औपचारिक चहापानाला उपस्थित राहणे योग्य नसल्याने महाविकास आघाडीने या कार्यक्रमावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. राज्यातील १३ कोटी जनतेच्या हिताचे प्रश्न सोडविणे हे सरकारचे कर्तव्य असून पावसाळी अधिवेशनात हे सर्व मुद्दे महाविकास आघाडी आक्रमकपणे मांडणार असल्याची भूमिका महाविकास आघाडीने आज पत्रकार परिषदेत मांडली.

## योग केवळ श्रमाचे साधन नाही;

निरोगी राहण्यास मदत होते. योगाभ्यासामुळे सतत शारीरिक आणि मानसिक विकासाला चालना मिळते. योग मानवी जीवनाला सतत विकासाच्या दिशेने वाटचाल करण्याची प्रेरणा देउ शकतो, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले.

**हे आपले ध्येय असले पाहिजे-** पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, लोकांनी वाढत्या वयानुसार अधिक लवचिक, उत्साही आणि बलवान बनण्याचे ध्येय ठेवायला हवे. वयाच्या २० व्या वर्षापेक्षा वयाच्या ४० व्या वर्षी अधिक लवचिक, वयाच्या ३० व्या वर्षापेक्षा वयाच्या ५० व्या वर्षी अधिक उत्साही आणि वयाच्या ४० व्या वर्षापेक्षा वयाच्या ७० व्या वर्षी आजारांशी लढण्यास अधिक सक्षम असणे, हे आपले ध्येय असले पाहिजे. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त संपूर्ण देश आणि जग एकजूट झाले आहे. योग म्हणजे लोकांना एकत्र आणणारी आणि मानवतेला जोडणारी शक्ती आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी नमूद केले. दरम्यान, पश्चिम बंगालमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करणे विशेष आहे, कारण हे राज्य आपल्या समृद्ध आध्यात्मिक आणि योग वारशासाठी ओळखले जाते. योग दिनानिमित्त पश्चिम बंगालच्या लोकांनी राबवलेल्या स्वच्छता मोहिमेची पंतप्रधान मोदी प्रशंसा केली. तसेच जगाच्या विविध भागांतून एकामागून एक अद्भुत दृश्ये समोर येत आहेत. भारतात हिमालयापासून हिंद महासागरापर्यंत, ईशान्य आणि पूर्वेकडील बंगालपासून पश्चिमेकडील सौराष्ट्रापर्यंत, संपूर्ण देश योगाच्या उर्जेने भरलेला दिसत आहे. संपूर्ण जग आणि संपूर्ण देश एकमेकांशी जोडलेले दिसत आहेत आणि हीच योगाची शक्ती आहे. योग सर्वांना जोडतो, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

## आष्टीकरांनी खासदारकीचा राजीनामा

'जर शिंदेसेनेची विचारधारा स्वीकारली असेल, तर आधी खासदारकीचा राजीनामा द्यावा आणि पुन्हा जनतेसमोर जाऊन कौल घ्यावा,' अशी मागणी केली आहे. आयती खासदारकी दुसऱ्या पक्षाच्या झोळीत टाकणे हे मतदारांच्या विश्वासाला तडा देणारे असल्याची टीका होत आहे.

राजकीय पक्षांतर हा लोकशाहीतील वैधानिक अधिकार असला, तरी जनतेने दिलेल्या जनादेशाचा सन्मान राखण्यासाठी नव्या पक्षाच्या चिन्हावर पुन्हा निवडणूक लढवून मतदारांचा कौल घेणे ही नैतिक जबाबदारी असल्याचे मत नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## ट्युशनच्या सहलीत दहावीच्या

फोन आला आणि थायलेश पाण्यात बुडाल्याची माहिती देण्यात आली.आई कांता मेश्राम यांनी तातडीने आर्णी बायपास परिसरातील रेल्वे पुलाजवळील नाल्याकडे धाव घेतली असता, त्यांचा मुलगा मृतावस्थेत आढळून आला. या घटनेने मेश्राम कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मुलाच्या मृत्यूबाबत सखोल चौकशी करण्यात यावी, सहलीदरम्यान विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी कोणती खबरदारी घेण्यात आली होती, तसेच जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशी मागणी मृत विद्यार्थ्याच्या आईने पोलिसांकडे केली आहे. अवधूतवाडी पोलिसांनी जबानी रिपोर्टच्या आधारे पुढील तपास सुरू केला आहे.

## मृग नक्षत्र संपले तरी

मांडतो. हल्ली पाऊस पेरणी उत्पादन खर्च याचे गणितच जुळत नाही. तरीसुद्धा शेतकरी आशावादी असून हाल अपेष्टा सहन करतो. शेतीच्या मशागतीची कामे पूर्ण झाली असून पाऊस कधी येणार ही एकच चर्चा सर्वत्र सुरू आहे. पावसाचे आगमन दीर्घकाळ लांबणीवर पडणे हे नैसर्गिक संकट शेती व शेतकऱ्यांसाठी धोक्याचे ठरू शकते. हवामान खात्याने येत्या काही दिवसात मान्सून सक्रिय होण्याचा अंदाज व्यक्त केला असला तरी पेरणी योग्य दमदार पाऊस कधी होणार याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून आहे. कारण पुरेशा पावसाअभावी पेरणी लांबत असल्याने आर्थिक ताण सुद्धा वाढत आहे. हल्ली पाऊस लांबल्याने शेतीचा खेळ सुद्धा थांबला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

## विदर्भात आणखी चार

तडाखा असे आवाहन करण्यात आले आहे. पडणाऱ्या पावसाचे जास्तीत जास्त जलसंधारण करण्यासाठी सरी-वरंबा पद्धतीचा अवलंब करावा तसेच सेंद्रिय खतांचा वापर वाढवावा, असेही त्यांनी सांगितले. यंदा एल निनोच्या प्रभावामुळे मान्सूनवर परिणाम झाल्याचे स्पष्ट दिसून येत असून २०२६ हे वर्ष दुष्काळी ठरण्याची शक्यता गृहित धरून शेतीचे नियोजन करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. २३ जूननंतर मेडन-ज्युलियन ऑसिलेशन काही प्रमाणात अनुकूल होण्याची शक्यता असल्याने २५ जूनपासून पावसाची स्थिती सुधारेल, अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.

## जुन्या वादातून तरुणाची

धनराज कैथवास (वय १९, रा. भगतसिंग चौक, जुनी वस्ती, बडनेरा), संकेत विनोद कैथवास (वय २०, रा. मातार्फेल, जुनी वस्ती, बडनेरा) तसेच एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला बोरगाव डीएपी परिसरातून ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडून यामाहा एमटी दुचाकीही जप्त करण्यात आली. प्राथमिक चौकशीत आरोपींनी जुन्या वादाच्या रागातून ओम कैथवास याच्यासोबत भांडण झाल्यानंतर धारदार चाकूने वार करून त्याची हत्या केल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (गुन्हे) रमेश धुमाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे व कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर व पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही यशस्वी कारवाई केली.

## परतवाड्यात बंद घर फोडून

रक्कम व मौल्यवान दागिने चोरून नेल्याचे निदर्शनास आले. चोरीस गेलेल्या ऐवजात ३६ हजार ५०० रुपये रोख, ३० ग्रॅम वजनाचे सोन्याच्या बांगड्या, २० ग्रॅमचे मंगळसूत्र, १५ ग्रॅमच्या दोन अंगठ्या, कानातील झुमके, सोन्याची नथ तसेच सुमारे २ लाख ८० हजार रुपयांचे चांदीचे दागिने यांचा समावेश असून एकूण नुकसान ७ लाख ६ हजार ५०० रुपये इतके आहे. घटनेची तक्रार मिळताच परतवाडा पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. तांत्रिक विश्लेषण, गुप्त माहिती आणि स्थानिक सूत्रांच्या मदतीने पोलिसांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवत २१ जून रोजी मुख्य आरोपी संजय उर्फ नंदू कवळे याला अटक केली. पोलिसांकडून आरोपीची कसून चौकशी सुरू असून चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या जलद कारवाईमुळे परतवाडा पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.

## फायरिंग ?ाकरणातील सात

मिळताच गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर, दिनेश दहातोंडे, नागपुरी गेटचे पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके तसेच त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. तपासादरम्यान पोलिसांना घटनास्थळावरून गोळीबारात वापरण्यात आलेल्या काडतुसाचे रिकामे खोके आढळून आले असून ते जप्त करण्यात आले.

हल्ल्यात जखमी झालेल्या शोएब अहमद यांना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार सुरू असतानाच पोलिसांनी तांत्रिक तपास, गुप्त माहिती आणि स्थानिक सूत्रांच्या मदतीने आरोपींचा माग काढला. नागपुरी गेट डीबीचे दानिश शेख आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी रात्रभर शोधमोहीम राबवून सातही आरोपींना ताब्यात घेतले. रविवारी दुपारी सर्व आरोपींना अमरावती न्यायालयात हजर करण्यात आले. या प्रकरणी नागपुरी गेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## कारच्या धडकेत वृद्धाचा

पंचनामा केला. मृताच्या पुतण्याने दिलेल्या तक्रारीवरून कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास परतवाडा पोलीस करीत आहेत.

## आमला येथे गावठी दारू

पिपामध्ये साठवून ठेवलेला तब्बल २१५ लिटर मोहमाचा सडवा आढळून आला. याशिवाय घटनास्थळावरून ४० लिटर तयार गावठी दारू आणि एक मोटारसायकल जप्त करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत १ लाख १५ हजार ५०० रुपये असून आरोपी उमेश चव्हाण (रा. आमला) याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता टोटेवार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राजू चौधरी, पोलीस हेडकॉन्स्टेबल महेंद्र तायडे, शिवपाल डाबेराव, महिला पोलीस हेडकॉन्स्टेबल सुचिता किरसान, पोलीस हेडकॉन्स्टेबल अमित वानखडे आणि पोलीस कॉन्स्टेबल पवन पवार यांनी केली.

## मोबाईलच्या नादातून १२

त्यांच्या पत्नीचे अंदाजे ५ ते ६ ग्रॅम वजनाचे, त्यावेळच्या दरानुसार सुमारे ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र घरातच राहिले होते. लग्नसमारंभाहून परतल्यानंतर मंगळसूत्र आढळून न आल्याने चोरीची तक्रार देण्यात आली होती. तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. तपासादरम्यान फिर्यादींच्या घरी येणाऱ्या एका अल्पवयीन मुलाची चौकशी करण्यात आली. त्यातून शंतनू प्रदीप पवार (वय २४, रा., गाडगेनगर) याने मोबाईल मिळवून देण्याचे आमिष दाखवून १२ वर्षीय मुलाकडून चोरी करवून घेतल्याचे निष्पन्न झाले.

चोरी केलेले मंगळसूत्र वितळवून त्याची सोन्याची लगड तयार करून आरोपीने स्वतःजवळ ठेवली होती. पोलिसी चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर सध्याच्या बाजारभावानुसार सुमारे ९० हजार रुपये किमतीची सोन्याची लगड पंचांसमक्ष पोलिसांच्या ताब्यात देण्यात आली. पोलिसांनी ती जप्त करून गुन्ह्याचा छडा लावला. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त शाम घुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त कैलाश पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या नेतृत्वात डी.बी. पथक प्रमुख योगेश श्रीवास व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही यशस्वी कारवाई केली.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, २२ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

## मतदार यादीची अचूकता, पारदर्शकता आणि विश्वासार्हता राखण्यासाठी निवडणूक यंत्रणेचे प्रशिक्षण संपन्न

■ प्रतिनिधी | वाशिम ■

लोकशाही व्यवस्थेचा मूलाधार असलेल्या मतदार यादीची अचूकता, पारदर्शकता आणि विश्वासार्हता कायम राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट व्हावे यासाठी सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून ही मोहीम यशस्वी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी आयोजित 'विशेष संक्षिप्त पुनरीक्षण' कार्यक्रमाच्या प्रशिक्षणात ते मार्गदर्शन करताना बोलत



होते. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली देवकर, कारंजा उपविभागीय अधिकारी कैलास देवरे, मंगरूळपीर उपविभागीय अधिकारी रवी काळे, नगरपालिका सहआयुक्त डॉ. बाबुराव बिक्कड, उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव तसेच जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी जयेश खंडारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रशिक्षणामध्ये विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाची उद्दिष्टे, मतदार यादी अद्ययावतीकरण प्रक्रिया, नवमतदार नोंदणी, नाव वगळणे, दुरुस्ती अर्ज, क्षेत्रीय पडताळणी, घरभेटी तसेच भारत निवडणूक आयोगाच्या विविध मार्गदर्शक सूचनांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांनी सादरीकरणाद्वारे कार्यक्रमाच्या प्रत्येक टप्प्याचे सखोल विवेचन केले.

तसेच प्रत्यक्ष कामकाजादरम्यान येणाऱ्या अडचणी, त्यावरील उपाययोजना, वेळेचे नियोजन आणि निर्धारित कालावधीत काम पूर्ण करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मतदार यादीतील त्रुटी कमी करण्यासाठी काटेकोर पडताळणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर यांनी दिले. पात्र मतदार वंचित राहणार नाहीत आणि अपात्र नावे यादीत राहणार नाहीत, यासाठी निवडणूक यंत्रणेने अत्यंत जबाबदारीने काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या प्रशिक्षणामुळे विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक दिशा, माहिती आणि मार्गदर्शन मिळाले.

प्रशिक्षणाला निवडणूक नोंदणी अधिकारी (आरओ), सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी (एआरओ) तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) उपस्थित होते.

# अधिकारी अनुपस्थित, उपस्थिती नोंदवही कुलूपबंद; मुख्यालय नियमांच्या पालनाबाबतही प्रश्नचिन्ह

■ प्रतिनिधी | कारंजा ■

उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, कारंजा येथील प्रशासकीय कारभाराबाबत नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. कार्यालयीन वेळेत वरिष्ठ अधिकारी आणि प्रभारी अधिकारी दोघेही अनुपस्थित आढळून आल्याने कार्यालयीन कामकाजाच्या व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यासोबतच अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी वास्तव्यास राहण्याबाबतच्या शासन नियमांचे पालन केले जात आहे का, याबाबतही चर्चा सुरू झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी कार्यालयीन वेळेत उपअधीक्षक विनोद जाधव हे कार्यालयात उपस्थित नसल्याचे आढळून आले. विशेष म्हणजे त्यांच्या अनुपस्थितीत कार्यालयाचा कार्यभार सांभाळणारे प्रभारी मुख्यालय सहाय्यक देखील कार्यालयात हजर नसल्याचे समोर आले. कार्यालय प्रमुख आणि प्रभारी अधिकारी हे दोघेही एकाच वेळी अनुपस्थित असल्याने त्या कालावधीत कार्यालयीन कामकाज नेमके कोणाच्या नियंत्रणाखाली सुरू होते, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

यावेळी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीची खात्री करण्यासाठी उपस्थिती नोंदवही (हलचल रजिस्टर) पाहण्याची मागणी करण्यात आली. मात्र संबंधित नोंदवही मुख्यालय सहाय्यक यांच्या कपाटात कुलूपबंद असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे त्या दिवशी कोणते अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते, कोण रजेवर होते अथवा कोण गैरहजर होते, याची पडताळणी करता आली नाही. उपस्थितीशी संबंधित नोंदी सहज उपलब्ध नसल्याने कार्यालयातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत. स्थानिक स्तरावर चौकशी केली असता, संबंधित कार्यालयातील अनेक अधिकारी व कर्मचारी हे बाहेरगावाहून ये-जा




**उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, कारंजाचा भोंगळ कारभार**

करीत असल्याने वेळेवर उपस्थित राहत नसल्याच्या तक्रारी सातत्याने होत असल्याचे समोर आले आहे. काही नागरिकांच्या मते, कार्यालयात आवश्यक अधिकारी उपलब्ध नसल्याने त्यांना वारंवार चकरा माराव्या लागतात. अनेकदा एखाद्या साध्या कामासाठीही नागरिकांचा पूर्ण दिवस खर्ची पडत असल्याची नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

विशेष म्हणजे, महाराष्ट्र शासकीय सेवक आचरण नियम तसेच विविध शासन निर्देशांनुसार, ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुख्यालय निश्चित करून देण्यात आले आहे त्यांनी मुख्यालयात किंवा मुख्यालयाजवळ वास्तव्यास राहणे अपेक्षित असते, जेणेकरून कार्यालयीन कामकाजात सातत्य राहील आणि नागरिकांना आवश्यक सेवा वेळेत उपलब्ध होतील. आपत्कालीन परिस्थिती, तातडीची प्रशासकीय कामे किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशांची अंमलबजावणी यासाठी अधिकारी व कर्मचारी सहज उपलब्ध राहणे हा या नियमामागील प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे बाहेरगावाहून नियमित ये-जा करणाऱ्या कर्मचाऱ्यांमुळे मुख्यालय नियमांचे पालन होत आहे का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. काही कर्मचाऱ्यांनी नाव जाहीर न करण्याच्या अटीवर सांगितले की, अधिकारी उशिरा येणे अथवा वेळोवेळी अनुपस्थित राहणे ही बाब नवीन नसून याबाबत पूर्वीही तक्रारी झाल्या आहेत. याचा थेट परिणाम कार्यालयीन कामकाजाच्या गतीवर होत असून नागरिकांना आवश्यक सेवा वेळेत मिळण्यात अडचणी निर्माण होत असल्याचे सांगितले जाते.

प्रशासकीय तज्ज्ञांच्या मते, शासकीय कार्यालयांमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियमित उपस्थिती, मुख्यालय नियमांचे पालन, कार्यालयीन शिस्त आणि नागरिकांना वेळेत सेवा देणे ही मूलभूत जबाबदारी आहे. कार्यालय प्रमुख आणि प्रभारी अधिकारी एकाच वेळी अनुपस्थित राहिल्यास कामकाजाच्या सातत्यावर परिणाम होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत पर्यायी व्यवस्था आणि स्पष्ट जबाबदारी निश्चित असणे आवश्यक मानले जाते.

या संपूर्ण प्रकारामुळे काही महत्त्वाचे प्रश्न पुढे आले आहेत. कार्यालय प्रमुख आणि प्रभारी अधिकारी एकाच वेळी अनुपस्थित कसे होते? त्या कालावधीत कार्यालयाचा कार्यभार कोणाकडे होता? उपस्थिती नोंदवही तत्काळ उपलब्ध का करून देण्यात आली नाही? अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी वास्तव्यास राहण्याच्या नियमांचे पालन केले आहे का? अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी कोणती यंत्रणा कार्यरत आहे? तसेच नागरिकांना वेळेत सेवा मिळण्यासाठी प्रशासनाने कोणती उपाययोजना केली आहे? असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून कार्यालयातील उपस्थिती व्यवस्थेची पडताळणी करावी, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुख्यालय वास्तव्यासंदर्भातील नियमांचे पालन होत आहे का याची तपासणी करावी, वेळपालनाबाबत आवश्यक निर्देश द्यावेत तसेच नागरिकांना कोणत्याही अडचणीशिवाय वेळेत सेवा मिळेल प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी काटेकोरपणे राबविण्याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे.

# भाजपा वाशिम शहर मंडळात जागतिक योग दिन उत्साहात साजरा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी वाशिम शहर मंडळाच्या वतीने एकवीरा देवी संस्थान, गोंदेश्वर परिसरात योग कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून संपूर्ण जगात २१ जून हा 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा केला जात असून, योगाचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी भाजपा वाशिम शहर मंडळ सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे.

या कार्यक्रमात वाशिम शहरातील प्रसिद्ध योग प्रशिक्षक सौ. तारा राजू कलवार यांनी उपस्थितांना योगाचे शास्त्रीय महत्त्व, त्याचे शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारे सकारात्मक परिणाम याविषयी मार्गदर्शन केले. तसेच विविध योगासने, प्राणायाम व ध्यान यांचे प्रात्यक्षिक करून सर्वांना योगाभ्यास करवून घेतला.

यावेळी जिल्हा, ग्रामीण व शहरातील भाजपा पदाधिकारी, विविध मोर्चांचे पदाधिकारी, महिला व पुरुष कार्यकर्ते तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत सामूहिक योगाभ्यास केला. योग हा केवळ व्यायाम नसून निरोगी, संतुलित व सकारात्मक जीवनशैलीचा आधार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगाला दिलेली योगाची अमूल्य देणगी आज संपूर्ण विश्व स्वीकारत असून, योगामुळे भारताची प्राचीन संस्कृती आणि जीवनपद्धती जागतिक स्तरावर पोहोचली आहे. निरोगी भारत आणि सशक्त समाज निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.भाजपा वाशिम शहर मंडळ अध्यक्ष मनिष मंत्री यांच्या नेतृत्वात व पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या वतीने पक्षाच्या संघटनात्मक, सामाजिक व जनजागृतीपर उपक्रमांचे सातत्याने यशस्वी आयोजन करण्यात येत असून, या कार्याची पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांकडूनही दखल घेऊन कौतुक करण्यात येत आहे. कार्यकर्त्यांची संघटनशक्ती, नियोजनबद्ध कामकाज आणि समाजहिताच्या उपक्रमांमुळे वाशिम शहर मंडळाची वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

# प्रथम प्रयत्नात सी.ए. परीक्षा उत्तीर्ण आदित्य कोठारी यांचा सत्कार



■ प्रतिनिधी | वाशिम ■

श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, वाशिमच्या संचालक मंडळाशी संबंधित कोठारी परिवारातील चि. आदित्य कोठारी यांनी प्रतिष्ठित चार्टर्ड अकाउंटंट परीक्षा प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या आनंददायी आणि अभिमानास्पद प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या राहत्या घरी जाऊन आदित्य कोठारी तसेच संपूर्ण कोठारी परिवाराचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी आदित्य यांचे वडील आशिष कोठारी, जुगल कोठारी, महाविद्यालयाचे अध्यक्ष मनोज कोठारी, तसेच राहुल कोठारी यांच्यासह संपूर्ण कोठारी परिवाराचा गौरव करण्यात आला. उपस्थितांनी आदित्य यांच्या यशाबद्दल अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

सत्कार कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुलकुमार राऊत, डॉ. संदीप शिंदे, डॉ. देवानंद अंभोरे, डॉ. अशोक वाघ, प्रा. ज्ञानेश्वर गोरे, प्रा. उद्धव जमधाडे यांच्यासह प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.यावेळी मनोगत व्यक्त करताना आदित्य कोठारी यांनी आपल्या यशाचे श्रेय संपूर्ण कोठारी परिवाराने दिलेल्या शैक्षणिक संस्कारांना, सातत्यपूर्ण अभ्यासाला आणि वेळेच्या योग्य नियोजनाला दिले. 'प्रथम प्रयत्नात यश मिळविण्यामागे कुटुंबीयांचे मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि सकारात्मक वातावरण हेच महत्त्वाचे कारण आहे,' असे त्यांनी सांगितले. तसेच महाविद्यालयाचे अध्यक्ष मनोजभाऊ कोठारी आणि संपूर्ण परिवाराच्या प्रेरणा व पाठबळामुळे हे यश संपादन करता आले.

# नुकतेच पेरलेले कपाशीचे बियाणे महावितरण कंत्राटदाराने वाहन नेऊन चिरडले



**नुकसान ग्रस्त शेतक-याची भरपाईची मागणी**

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील आसोला खुर्द येथील शेतकरी युवराज रंगराव राठोड यांच्या कपाशी पिकाची लागवड केलेल्या शेतात डीपी बसविताना ट्रॅक्टर व वाहनांच्या ये-जा केल्याने पिकाची नासाडी झाली आहे. नुकसान भरपाई द्यावी, अन्यथा शेतातच उपोषण करण्याचा इशारा विज वितरण कंपनीचे उपमुख्यकार्य अभियंता व तहसीलदार यांना पिडित शेतकऱ्यांनी दिला आहे.

दिलेल्या दिव्यानानुसार मौजे आसोला खुर्द शेत शिवारातील गट क्र. ९७ क्षेत्रफळ १ हेक्टर ९२ आर या सामाईक क्षेत्रामध्ये बेड पद्धतीने महागडी कपाशी पिकाची लागवड केली होती. कर्जबाजारी असूनही उसनवारीने पैसे काढून शेती मशागत करून बी-बियाणे टाकून पीक उभे केले आहे. मात्र, महावितरण विभागाचे ठेकेदारांनी डीपी बसविताना कोणतीही पूर्वसूचना न देता ट्रॅक्टर व अवजड वाहने शेतातून नेली. त्यामुळे उभे पीक चिरडले जाऊन मोठे नुकसान झाले. आता पिकाचे नुकसान झाल्याने माझ्यापुढे जगण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे,' अशी व्यथा युवराज राठोड यांनी निवेदनातून मांडली आहे. महावितरणच्या आडमुठ्या धोरणामुळे शेतकऱ्यांना नुकसान सोसावे लागत असल्याचा आरोप पिडित शेतकऱ्यांनी केला असुन

नुकसानीची पाहणी करून तात्काळ भरपाई द्यावी, अशी मागणी त केली आहे. अन्यथा डीपी बसविलेल्या शेतातच कुटुंबासह उपोषणाला बसणार असल्याचा इशारा युवराज राठोड यांनी दिला आहे. महावितरणच्या ठेकेदारांच्या मनमानी कारभारामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान रोखण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी केली आहे.

# पिंपरी सरहद्दजवळ तरुणाचा संशयास्पद मृत्यू; चार जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल

## अपघाताचा बनाव केल्याचा आरोप; पोलिस तपासाकडे परिसराचे लक्ष

■ प्रतिनिधी | रिसोड ■

तालुक्यातील पिंपरी सरहद्द येथील बळीराजा पेट्रोलपंपाजवळ २४ वर्षीय तरुणाचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. सुरुवातीला हा अपघात असल्याचे सांगण्यात आले होते; मात्र फिर्यादीच्या तक्रारीनंतर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला असून चार जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

याबाबत विष्णू गोविंदा वाघ (वय ४९, रा. उकीरखेडा, ता. रिसोड) यांनी शिरपूर जैन पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आनंद विनोद मवाळ, प्रतीक संतोष हुंबाळ, पवन गजानन दांदडे (सर्व रा. महागाव, ता. रिसोड) व शुभम शेषराव अवचार (रा. अंजनी बु., ता. मेहकर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, आरोपी आनंद मवाळ याचे वडील विनोद मवाळ यांच्याशी सुमारे तीन वर्षांपूर्वी पैशांच्या कारणावरून फिर्यादीचा वाद झाला होता. तसेच मागील महिन्यात आनंद मवाळ याने फिर्यादीचा मुलगा अभिषेक विष्णू वाघ याला त्यांच्या वाहनावर काम करण्यासाठी येण्याचा आग्रह केला होता. मात्र अभिषेकने स्वतःकडे वाहन असल्याने नकार दिला. त्यावेळी आरोपीने धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

या पूर्ववैमनस्यातून आरोपींनी संगनमत करून अभिषेक वाघ याला १८ जून रोजी जेवणासाठी बाहेर जाण्याचे सांगून पिंपरी सरहद्द येथील बळीराजा पेट्रोलपंप परिसरात नेले. तेथे जुन्या वादाच्या कारणावरून जड हत्याराने डोक्याच्या मागील बाजूस वार करून त्याची हत्या केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. घटनेनंतर हा प्रकार अपघात असल्याचा बनाव करण्यात आल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. अभिषेक चालत्या वाहनातून पडल्याने जखमी झाल्याचे सांगत त्याला उपचारासाठी संभाजीनगर येथील सिग्मा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मात्र नंतरच्या तक्रारीमुळे या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले आहे.

सध्या जुन्या वादाचा मुद्दा समोर आला असला तरी या घटनेमागे अन्य काही कारण आहे का, याचाही तपास सुरू आहे. मृतक व आरोपी यांच्यात आणखी काही वाद होते का, तसेच अपघाताचा बनाव का करण्यात आला, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या सर्व बाबींचा उलगडा पोलिस तपासानंतरच होणार आहे.

फिर्यादीच्या तक्रारीवरून शिरपूर जैन पोलीस ठाण्यात संबंधित चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक इमरान पठाण करीत आहेत. या घटनेमुळे उकीरखेडा, महागाव व परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांचे लक्ष आता तपासाच्या निष्कर्षाकडे लागले आहे.

# 'एक धाव – आरोग्यासाठी' ही मॅरेथॉन स्पर्धा संपन्न

**अकोला :** महेश नवमीच्या निमित्ताने माहेश्वरी समाज ट्रस्ट अंतर्गत माहेश्वरी प्रगती मंडळाच्या वतीने 'एक धाव आरोग्यासाठी' ही मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आली ज्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समाज ट्रस्टचे अध्यक्ष विजयकुमार तोष्णीवाल,प्रधानमंत्री विजय राठी,उत्सव प्रमुख नरेश बियानी यांच्या मार्गदर्शनात तसेच गुजरात अंबुजा एक्सपोर्ट लि. चे अध्यक्ष ब्रिजमोहन चितलांगे यांच्या सहकार्याने माहेश्वरी भवन परिसरात आयोजित या स्पर्धेत ५ ते ८० वर्ष वयोगटातील समाजातील सदस्यांनी सहभाग घेतला.

# सैन्यदलाच्या जवानाच्या घरावर चोरट्यांचा डल्ला; हिवरखेडमध्ये खळबळ

■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

**देशाच्या सीमेवर उभा राहून राष्ट्ररक्षणाची जबाबदारी पार पाडणाऱ्या भारतीय सैन्य दलाच्या जवानाच्या घरालाच चोरट्यांनी लक्ष्य केल्याची धक्कादायक घटना हिवरखेड येथे उघडकीस आली आहे. जयस्वाल प्लॉट, खडकी परिसरातील ही घरफोडी समोर आल्यानंतर नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.**

तेल्हारा तालुक्यातील हिवरखेड येथील रहिवासी तथा भारतीय सैन्य दलातील जवान गोपाल रमेश भगत यांच्या निवासस्थानी ही घरफोडी झाली. घरातील सदस्य काही



कारणास्तव बाहेरगावी गेले असल्याची संधी साधत अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर घरातील मौल्यवान वस्तूंवर हात साफ करून चोरटे पसार झाले.

विशेष म्हणजे, ही घटना भरवस्तीत घडली असूनही चोरट्यांनी घरफोडी करून पलायन केल्याने परिसरातील सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. चोरीत किती ऐवज लंपास झाला याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नसून कुटुंबीय परतल्यानंतरच नुकसानीचा नेमका अंदाज येणार आहे. घटनेची माहिती मिळताच हिवरखेड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला व तपासाची सूत्रे वेगाने हलविली. आरोपींचा शोध घेण्यासाठी विविध पथके कामाला लागल्याची माहिती मिळत आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, संशयितांची हालचाल आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींची माहिती पोलिसांकडून तपासली जात आहे.

दरम्यान, हिवरखेड परिसरात गेल्या काही महिन्यांपासून चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याची तक्रार नागरिकांकडून सातत्याने करण्यात येत आहे. त्यातच अवैध धंद्यांचे वाढते जाळे आणि रात्रीच्या वेळी संशयास्पद हालचाली यामुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे पोलिस गस्त आणि प्रतिबंधात्मक कारवाईबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.नुकतेच हिवरखेड पोलीस ठाण्याची धुरा स्वीकारलेले पोलीस निरीक्षक सचिन पाटील यांच्यासमोर ही घटना मोठे आव्हान ठरली आहे. चोरीच्या घटनांवर प्रभावी नियंत्रण मिळविणे, अवैध धंद्यांवर आळा घालणे आणि जवानाच्या घरातील घरफोडीचा छडा लावून आरोपींना जेरबंद करणे, ही आता पोलिसांसमोरील प्रमुख कसोटी मानली जात आहे.

देशसेवेत असलेल्या जवानाच्या घरातच चोरी होणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात असून या प्रकरणाचा तातडीने उलगडा करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी हिवरखेडकरांकडून होत आहे. सध्या संपूर्ण परिसराचे लक्ष पोलिसांच्या तपासाकडे लागले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

# परिमंडळातील स्मार्ट टीओडी मीटरधारक ग्राहकांना तीन महिन्यांत १.६५ कोटींची सवलत

**अमरावती/का.प्र.**
स्मार्ट टीओडी (टाइम ऑफ डे) मीटरमुळे घरगुती वीज ग्राहकांना दिवसा वीज वापरावर मिळणाऱ्या सवलतीचा लाभ वाढत असून, अमरावती परिमंडळातील ग्राहकांना एप्रिल ते जून २०२६ या तीन महिन्यांत तब्बल १ कोटी ६५ लाख ११ हजार रुपयांची सवलत मिळाली आहे.

राज्यात घरगुती ग्राहकांसाठी स्मार्ट टीओडी मीटर बसविण्याची मोहीम सुरू आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निश्चित केलेल्या नव्या वीजदरानुसार, दिवसा वीज वापरणाऱ्या ग्राहकांना प्रति युनिट ८० पैसे ते १ रुपया सवलत जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार, १ जुलै २०२५ पासून या सवलतीचा लाभ ग्राहकांना मिळण्यास सुरुवात झाली. जुलै २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत प्रति युनिट ८० पैशांची सवलत देण्यात येत होती. एप्रिल २०२६ पासून ही सवलत वाढवून प्रति युनिट ८५



पैसे करण्यात आली आहे.

स्मार्ट टीओडी मीटरमुळे वीज वापराचे रीडिंग स्वयंचलित आणि अचूक पद्धतीने घेतले जात असल्याने बिलिंगमधील अचूकताही वाढली आहे. तसेच ग्राहकांना मोबाईलद्वारे तासागणिक वीज वापराची माहिती उपलब्ध होत असल्याने वापरावर नियंत्रण ठेवणे शक्य होत आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत वीज वापरावर सवलत मिळत असल्याने वॉशिंग मशीन, गिझर, एअर कंडिशनर आणि इतर अधिक वीज वापरणारी उपकरणे या वेळेत वापरल्यास ग्राहकांना आर्थिक लाभ होत आहे.अमरावती परिमंडळातील सुमारे ५ लाख ५६ हजार ग्राहकांना एप्रिल, मे आणि जून या तीन महिन्यांत ही सवलत मिळाली आहे. त्यामध्ये अमरावती जिल्ह्यातील ३ लाख २८ हजार ग्राहकांना १ कोटी १२ लाख ५६ हजार रुपयांची, तर यवतमाळ जिल्ह्यातील २ लाख २८ हजार ग्राहकांना ५२ लाख ५४ हजार रुपयांची सवलत मिळाली आहे.

दरम्यान, स्मार्ट टीओडी मीटर हे प्री-पेड नसून पोस्टपेड असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. पूर्वीप्रमाणेच वीज वापरानंतरच ग्राहकांना बिल मिळणार असून, मीटर बसविण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. शिवाय टिओडी स्मार्ट मीटर विषयी शंका असल्यास त्या दूर करण्यात येणार असल्याचेही महावितरणने स्पष्ट केले आहे.

त्यामुळे घरगुती ग्राहकांनी स्मार्ट मीटरला विरोध करण्याऐवजी सत्यता पडताळून वीज मीटर लावून घेण्यास सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

## संक्षिप्त

### कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर




**खल्लार -** नजिकच्या मोचर्डा येथे दर्यापूर तालुका विधी सेवा समिती व वकील संघ, दर्यापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जेष्ठ नागरिकांचे हक्क, कल्याण आणि संरक्षण या विषयावर कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दर्यापूर येथिल जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधिश सत्यवान ढोके उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी जिल्हा न्यायाधिश २ चे एम. आय. लोकवाणी, दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर एम. ए. शिलार, सहदिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यु. एन. पाटील, ए. एम. जोशी, सहदिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर एस. डी. कमलाकर तर प्रमुख उपस्थिती अँड. धमेंद्र आठवले, वक्ते म्हणून अँड.वैभव इंगळे, अँड. आम्रपाली चौरपगार, अँड. रितेश गवई, अँड. संजय आठवले यांनी भारतीय संविधानामधिल मूलभुत अधिकार, महिलांचे कायदेविषयक अधिकार व त्याचे संरक्षण, एकत्र कुटूंब पद्धत व जेष्ठ नागरिकांचे योगदान, जेष्ठ नागरिकांचे कायदेशिर अधिकार याबाबत उपस्थित असलेल्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अँड. एन. जी. थर्डक,संचालन अँड. देवानंद पर्वतकर तर आभार अँड.रियाज घाणीवाले यांनी केले. गावात प्रथमच झालेल्या या कार्यक्रमाला मोठया संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

### गजानन जवंजाळ यांचा सेवानिवृत्ती सत्कार

**आसेगाव पूर्णा -** सार्वजनिक बांधकाम उपविभागात कार्यरत असलेले गजानन जवंजाळ हे ३१ मे २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवेला गौरविण्यासाठी आसेगाव पूर्णा येथील अतिथी विश्रांतीगृहात छोटेखानी निरोप व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी



कॅस्ट्रेब संघटनेचे अध्यक्ष संजय गायकवाड व सचिव दीपक पाटील यांच्या हस्ते जवंजाळ यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या शासकीय सेवाकाळातील प्रामाणिक कार्यपद्धती, कर्तव्यनिष्ठा व सहकाऱ्यांशी असलेल्या स्नेहपूर्ण संबंधांचा गौरव केला. या प्रसंगी अरुण मेहरे, निखील गवई, निरंजन गावंडे, संतोष मांडवे, रमेश इंगळे यांच्यासह विभागातील कर्मचारी व सहकारी उपस्थित होते.कार्यक्रमात उपस्थितांनी जवंजाळ यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देत त्यांच्या निरोगी व आनंदी जीवनासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

आर्थिकदृष्ट्या गरजू गुणवंत विद्यार्थ्यांसाठी

## ‘सुदामजी सावरकर शिष्यवृत्ती २०२६’

**अमरावती/का.प्र.**
Sudam Education Foundation तर्फे यावर्षीही स्वातंत्र्यसेनानी साहित्यरत्न कै. सुदामजी सावरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ‘सुदामजी सावरकर शिष्यवृत्ती २०२६’ जाहीर करण्यात आली आहे. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या परंतु शैक्षणिकदृष्ट्या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.या शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्य बोर्डाच्या २०२६ च्या १०वी परीक्षेत ८५% पेक्षा अधिक गुण मिळवलेले तसेच वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ११ लाखांपेक्षा कमी असलेले विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र आहेत.शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन असून, आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये या भावनेतून Sudam Education Foundation हा उपक्रम राबवत आहे. पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवासात आर्थिक मदत व प्रोत्साहन देण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे.अधिक माहितीसाठी व अर्ज प्रक्रियेसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी किंवा पालकांनी ९०३५२२८९०० या क्रमांकावर संपर्क साधावा अथवा www.sudam.org या संकेतस्थळाला भेट द्यावी.

## आजपासून पावसाच्या ‘आद्रा’ नक्षत्राला प्रारंभ

**चांदूरबाजार/वार्ताहर**
हजारो वर्षा पूर्वी शेतीचा शोध लागला तेव्हा, हवेची दिशा.वार्याचा वेग , सायंकाळी सुर्य मावळती च्या वेळी आकाशा तील स्थीती. तसेच पक्षांचे आवाज व त्यांच्या वागण्याच्या स्थिती वरून पावसाचा अंदाज बांधल्या जाता होता. मुंग्या, मुंगळे,उधळी या किटकांच्या स्थलांतरा वरून ही जुनी जानकार माणसे पावसाचा अंदाज वर्तवित होती. त्यानंतर पंचांगाशास्त्राची निर्मिती झाली.तेव्हा पासून तत्कालीन खगोल शास्त्रा वरून,नक्षत्र,चंद्र,सूर्य,ग्रह यांचे आकलन करून पावसाचा अंदाज वर्तविण्यास सुरुवात झाली.आज ही या पंचांग शास्त्रीय हवामान अंदाज वर , शेतकऱ्यांचा विश्वास दिसून येतो.त्या पंचांग शास्त्रा नुसार, २२ जून ला, दुपारी १२ वाजून २३ मिनिटांनी पावसाच्या ‘आद्रा’ नक्षत्राला सुरुवात होत आहे.

पावसाळयाच्या एकूण १२ नक्षत्रा पैकी, पावसाचे तिसरे नक्षत्र म्हणजे आद्रा नक्षत्र होय. या बारा ही नक्षत्रात पावसाचे मान कसे असेल.हे खगोलशास्त्राचा आधार घेऊन,ग्रह,तारे, नक्षत्र यांची त्या त्या पावसाच्या नक्षत्रातील स्थितीचा अभ्यास करून पावसाचा अंदाज पंचांग शास्त्रा व्दारे वर्तविला जातो. त्या अंदाजानुसार आद्रा नक्षत्राचे वाहन ‘गाढव’आहे. या नक्षत्रात २४ जून नंतर वातावरणात बदल होईल.वट पोर्णिमेच्या सुमारास २६ ते २८ जून



**दुपारी १२ वाजून २३ मिनिटांनी, सुर्य मृग नक्षत्रात**

दरम्यान,पावसाळी हवामान राहील.काही भागात विशेषत: दक्षिण महाराष्ट्रात, या नक्षत्राचा चांगलं पाऊस होण्याची शक्यता आहे.इतरत्र मात्र बेताचाच पाऊस होईल.

यावर्षी रोहिणी व मृगाच्या पावसाने दगा दिला. अशातच नवतपा ही चांगलाच तापला.तरी ही मान्सूनचा पाऊस झाला नाही. हा निसर्ग चक्रात झालेल्या बदलांचा परिणाम असावा.असे अनेकांचे मत आहे.

तरी ही पावसाची चातका प्रमाणे आतूरतेने वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांसाठी, हे नक्षत्र काहीसे दिलासा देणारे दिसून येते.या नक्षत्रात ३० जून नंतर, राज्यात सार्वत्रिक पावसाचे योग दिसून येतात. ३० जून ते ५ जुलैपर्यंत चांगला पाऊस होण्याचे योग दिसून येतात. या दरम्यान सार्वत्रिक पेरण्या होण्याची शक्यता नाकारता येत नाही.२६ ते २८ जून व २ ते ५ जुलै दरम्यान, शेतकऱ्यांना दिलासा देणारे चांगले वृष्टीदायक योग या नक्षत्रात दिसून येतात. पावसाळ्याचा हा संपूर्ण अंदाज पंचांग शास्त्राने,ग्रह तात्यांच्या घडामोडींवर आधारित वर्तविला आहे. तरी शेतकऱ्यांनी हवामान खात्याचा अंदाज,आपल्या भागातील प्रत्यक्ष अनुभव व परीस्थिती पाहूनच आपले निर्णय घ्यावेत.

## ‘आली हलकेच आली ’ या पावसाळी द्वंद्व गीताचे २४ ला प्रसारण

अमरावती/का.प्र.
मराठी साहित्य आणि संगीतामध्ये पावसाला एक वेगळंच आणि हवंहवंसं स्थान आहे. आपल्याकडे बालगीतांपासून ते अगदी विरहाच्या, प्रेमाच्या आणि भक्तीच्या भावगीतांपर्यंत पावसाची विविध रूपे गाण्यांमधून मांडली गेली आहेत. विशेषतः मराठी कवींना पावसाने नेहमीच भुरळ पाडली आहे. पाऊस आणि रोमान्स यांचे फार जुने नाते आहे. पावसाचे प्रतिकात्मक रूप वापरून येथील प्रसिद्ध कवी, गझलकार प्रा अरुण सांगोळे यांच्या गाणी पावसाची या रसिकमान्य काव्यसंग्रहातील ‘आली हलकेच आली पावसाची सर’ हे गीत असून पी आर क्रिएशनच्या युट्यूब चॅनेलवर येत्या २४ ला प्रसारित करण्यात येणार आहे.

पाऊस आणि राधा, पाऊस आणि कृष्ण, पाऊस आणि राधाकृष्ण असा हा एक अलौकिक नातेबंध आहे. विरहाच्या क्षितिजावर गुंजन करणारा हा वेणूनाद सुरांच्या






**अरुण सांगोळे, प्रणव हरिदास, शार्दुल कवठेकर आणि विश्वजा जाधव यांची सांगितीक कलाकृती !**

इंद्रधनुषी पालखीत प्रणव हरिदास घेऊन आले आहेत.पावसाच्या पार्श्वभूमीवर विरहाची आणि प्रेमाची आर्तता अधोरेखित करणाऱ्या या गाण्याला मुंबईचे सुप्रसिद्ध बासरीवादक आणि संगीतकार प्रणव हरिदास यांनी संगीतबद्ध केले असून आजचे आघाडीचे गायक विश्वजा जाधव आणि शार्दुल कवठेकर यांनी आपला स्वर दिला आहे. या गाण्याची स्वर गुंफण प्रणव हरिदास यांनी अशी केलेली आहे




की ऐकतांना पावसाची अनुभूती गानरसिकांना यावी. अर्थपूर्ण शब्द, त्याला साजेसे संगीत आणि दैवी आवाज असा हा त्रिवेणी मेळ या गीताच्या माध्यमातून साधण्यात आला आहे. हे गीत रसिकांच्या मनात स्थान मिळवेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. मनातील न सांगितलेल्या भावनांना हे गीत स्पर्श करते. आशयघन शब्द, सुरेल संगीत आणि आठवणी याचं नातं किती गहिरं असू शकते, याची जाणीव करून देणारं हे अप्रतिम गीतकाव्य आहे. या गाण्याचे चित्रीकरणही नितांत सुंदर झाले आहे.विश्वजा जाधव आणि शार्दुल कवठेकर यांनी हे द्वंद्व गीत गायले आहे.

या पावसाळी गीताचे मिक्सिंग आणि मास्टरिंग सौरभ काजरेकर यांनी कल्पकतेने बझ इन स्टुडिओत केले असून कल्पेश केरकर यांनी ध्वनीमुद्रीत केले आहे. एतशा संझगिरी आणि निषाद भोईर या कलाकारांवर हे गीत गौरी भिडे आणि सागर यांनी चित्रीत केले आहे. सिनेमोटोग्राफी म्हणूनही सागरने व्हिडिओची धुरा सफाईदारपणे सांभाळली. कोरिओग्राफी राधिका जैतपाल यांची असून जाहिरात विभाग एस एस शिर्के यांनी सांभाळला. पी आर क्रिएशनची ही निर्मिती असून येत्या २४ तारखेला हे गीत युट्यूबवर प्रसारित केले जाईल, अशी माहिती गीताचे कवी प्रा अरुण सांगोळे यांनी सदर प्रतिनिधीला दिली.

## करातेमुळे घडतो निर्भय व सुदृढ समाज

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**
कराटे हा केवळ मारामारीचा खेळ नसून शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक कणखरपणा, शिस्त, आत्मसंरक्षण आणि उत्तम चारित्र्य घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे. विशेषतः महिला व बालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कराटे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे असून या खेळाच्या माध्यमातून निरोगी, निर्भय व सुदृढ समाजाची निर्मिती शक्य असल्याचे प्रतिपादन चांदूर रेल्वे पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक नंदलाल लिंगोट यांनी केले. ते कराटे स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात बोलत होते.



**पीएसआय लिंगोट यांचे प्रतिपादन**

वर्धा जिल्ह्यातील देवळी येथील विदर्भ केसरी खासदार रामदास तडस इंडोर स्टेडियममध्ये स्पोर्ट्स शोतोकॉन कराटे असोसिएशन इंडिया यांच्या वतीने नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेत चांदूर रेल्वे येथील शोतोकॉन कराटे-डो असोसिएशनच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. या स्पर्धेत सिया सुरज पिंगळे, तन्वी दिनेश राठोड, अफशा निशा शहा, यश संतोष नेवारे व आर्यन दिनेश राठोड यांनी सहभाग घेतला. या सर्व विद्यार्थ्यांनी २ गोल्ड, ४ सिल्वर व ३ ब्रांझ मेडल प्राप्त केले. सदर विद्यार्थी मुख्य प्रशिक्षक संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील संताबाई यादव नगर येथील गजानन महाराज मंदिर परिसरात नियमित कराटे प्रशिक्षण घेत आहेत.

विद्यार्थ्यांना संस्थेचे कोषाध्यक्ष अशोक मोटघरे तसेच पदाधिकारी सुरेश तिखे, अँड. मनोज अंबाडकर, अँड. नीलिमा मिसाळ, सीता राठोड, पिंकी देशमुख, उमेश ढगे, तायडे, निरंजन शहा व नगरसेवक निलेश (पप्पू) भालेराव यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय मुख्य प्रशिक्षक संदीप देशमुख तसेच आपल्या आई-वडिलांना दिले. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल परिसरातून त्यांचे अभिनंदन होत असून सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## आयुष्यभर झटणारे बी. टी. काकाचे व्यक्तीमत्व

**आ**ज जागतिक पितृ दिन. वडीलाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्या चा दिवस.भाऊ आपण उन, वारा, वादळ, पाऊस अंग खांद्यावर झेलत मायेची सावली देणाऱ्या, आपली पाळ, मुळ जमिनीत घट्ट रोऊन उभ्या असलेल्या वड वृक्षासारखे कायम प्राध्यापक च्या सुख, समृद्धी करीता आयुष्यभर झटणारे काकाच व्यक्तीमत्व. आपण आमचे बाबा (स्व. प्रा.डॉ. एम. आर. देशमुख, माजी कुलसचिव नागपूर विदयापीठ)वारल्या नंतर घरी आले त्यावेळी बाबांचे काही आठवणी काढल्या, त्यामध्ये बाबांनी रागाच्या भरात फुलसींग नाईक कॉलेज पुसद चा प्राचार्य पदाचा राजीनामा दिला होता. त्यावेळी बाबांना राजकमल चौकात बी. टी काका भेटले तेव्हा विचारपूस केली व समजावले,त्यावेळी त्यांना कळले की बाबा राजीनामा देऊन आले आहे. त्यावेळी ते बाबांना घेऊन पोस्ट ऑफिस मध्ये गेले व टेलिग्राम केला या टेलिग्राम मुळेच बाबा कोर्ट मध्ये जिंकले,असे वक्तिमत्व पुन्हा भेटणे नाही,माझ्या नोकरीच्या वेळी बी. टी.काकांनी जी भूमिका घेतली ती आयुष्यात विसरणार नाही, अश्या बऱ्याच आठवणी आहे पण आम्ही कुठेच त्याची प्रसिद्धी दिली नाही.

आपली संघटना NUTA चा जन्म होतो त्याक्षणीच वडिलांचा पितृत्वाचा प्रवास सुरु होतो.

आपल्या साऱ्या आवडी निवडी, छंद, भाव भावना बाजुला ठेऊन केवळ NUTAआणी प्राध्यापक यांच्या करीता खस्ता खाणारे आपणच,आपल्या जुन्या प्राध्यापक नें जे दुःख भोगले ते आपल्या नवीन पिढीच्या वाट्याला येऊ नये याकरीता आयुष्यभर भिंगरीगत फिरणारे, विधानसभा मध्ये प्रश्न मांडणारे, शिक्षण प्रणालीचा सर्वांगिण विकासाकरीता, समृद्धी करीता आयुष्य पणाला लावणारे तरी सुद्धा गृहित धरला जाणारे



आपण च आमचे बाप च होता. तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलेल्या,बापाच्या

**✍ प्रा.डॉ.प्रविण देशमुख**

व्यक्तीमत्वाचे अनेक कंगोरे असतात काही आपणास कळतात काही मात्र कळतच नाही आणी ते कळेपर्यंत मात्र आपणास सुख, समृद्धीच्या वाटेवर स्वार करून हा निघुन गेलेले असतो त्याच्या अंतिम प्रवासास अगदीच गुरु ठाकुर यांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास उरामंदी माया त्याच्या काळ्या मेघावानी.

दाखविना कधी कुना डोळ्यातल पाणी. झिजु झिजु संसाराचा गाडा हाकला. व्हटा मंधी हसु जरी कणा वाकला. घडी भर थांब जरा ऐक त्याची धाप रं...लय अवघड आहे गड्या उमगाया बाप रं...भावना व्यक्त न करता अनंत हाल अपेष्टा भोगुन प्राध्यापक ना सुसंस्कार, सुख व समृद्धीची सुवर्ण वाट दाखविणाऱ्या तमाम आपल्या सारख्या पितृशक्तीस, जागतीक पितृ दिना निमित्य अभिवादन.

त्रिमूर्ती कॅम्प, अमरावती
९४२१८२१३७०

## विद्यापीठात बारावा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

**अमरावती/का.प्र.**
आजच्या बदलत्या सामाजिक वातावरणात आणि कौटुंबिक वास्तव पाहता, आपले आरोग्य सुदृढ ठेवणे हे सर्वांत मोठे आव्हान आहे. म्हातारपण सुखाचे आणि निरोगी जाण्यासाठी आरोग्याची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे असून, त्यासाठी प्रत्येकाने योगाभ्यासाची कास धरली पाहिजे,असे आवाहन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले.

विद्यापीठाच्या ‘आजीवन अध्ययन व विस्तार विभाग’, ‘एम.ए. योगशास्त्र’ व ‘पी.जी. डिप्लोमा योगा थेरपी’ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग परिसरात अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात आणि योगप्रेमींच्या उत्स्फूर्त उपस्थितीत साजरा करण्यात आला.याप्रसंगी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आंतरराष्ट्रीय योग प्रशिक्षक डॉ. सुप्रिया



**निरोगी आरोग्यासाठी योग आवश्यक – कुलगुरू**

चकोले, शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या डॉ. निता गिरी, वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे, आजीवन अध्ययन व विस्तारचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, रासेयो संचालक डॉ. निलेश कडू, उपकुलसचिव मंगेश वरखेडे आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

विदर्भातील कौटुंबिक वास्तवावर भाष्य करताना कुलगुरू पुढे म्हणाले की, आज शिक्षणाच्या आणि नोकरीच्या निमित्ताने तरुण पिढी मुंबई-पुण्यासारख्या मोठ्या शहरांमध्ये स्थायिक होत आहे, तर त्यांचे वृद्ध आई-वडील अमरावती, नागपूरसारख्या शहरांमध्ये मागे राहत आहेत. या बदललेल्या वातावरणात आरोग्याच्या नव्या समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे आजच्या योग दिनानिमित्त देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा उपक्रम सुरू केल्यामुळे भारतीयांचे आरोग्य सुदृढ करण्यासाठी फार मोठा हातभार लागला असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या योग शिबिरात पुणे येथील आंतरराष्ट्रीय योग चिकित्सक व योग तज्ज्ञ डॉ. सुप्रिया चकोले यांनी मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून उपस्थितांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते संत गाडगे बाबा व महर्षि पतंजली यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उपस्थितांचे स्वागत रोपटे देऊन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले. संचालन डॉ. अनघा देशमुख यांनी, तर आभार प्रदर्शन राजेश पिदडी यांनी करून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रचित भजन गायीले. हा संपूर्ण सोहळा यशस्वी करण्यासाठी आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि अमरावतीमधील योगप्रेमी नागरिक उपस्थित होते.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २०५ ■ सोमवार, २२ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यामुळे योगाला जागतिक स्तरावर मान्यता- पालकमंत्री डॉ.पंकज भोयर

## पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय योग दिन सादरा

**-विविध शासकीय कार्यालये, सामाजिक संघटनांचा सहभाग**
**-हजारो सहभागीतांनी केली सामुहिक योगासने**

**वर्धा जनमाध्यम :** योगा ही भारताची पारंपरीक उपचार पद्धती आहे. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जगाला योगाचे महत्व पटवून दिले आणि या उपचार पद्धतीला जागतिक स्तरावर मान्यता आणि नावलौकिक प्राप्त झाला. आज जगातील बहुतांश देशात योगाचा दैनंदीन जीवनात उपयोग केला जातो, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले.

वर्धा येथील तालुका क्रीडा संकुल येथे जिल्हा प्रशासन, पोलिस अधीक्षक कार्यालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, शिक्षणाधिकारी कार्यालय, आरोग्य विभाग, माय भारत केंद्र, पतंजली योग समिती व विविध शासकीय कार्यालये, सामाजिक संस्था, संघटनांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी पालकमंत्री बोलत होते.



कार्यक्रमास जिल्हाधिकारी वान्मथी सी, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, नगराध्यक्षा सुधीर पांगुळ, अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय तेली, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी प्रताप वाघमारे, जिल्हा क्रीडा अधिकारी आशा मेश्राम, अशोक कलोडे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, नागरीक, महिला, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देशात असंख्य वर्षांची परंपरा लाभलेल्या योगाचे महत्व संपुर्ण जगाला पटलेले आहे. ही केवळ उपचार पद्धतीच नाही तर तंदुरुस्त शरीर, आरोग्य व आनंदाचा मंत्र देखील आहे. काही संस्था, संघटना योगाच्या प्रचार, प्रसिद्धीसाठी झटत आहे. प्रशासनाने देखील जनजागृती करून योगाचे महत्व नागरिकांना पटवून देण्यासाठी काम करण्याची गरज आहे. प्रत्येक नागरीकाने प्रत्यक्ष जीवनात जास्तीत जास्त योगाचा अवलंब करणे आवश्यक आहे. यावर्षी पाणी संकट राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे प्रत्येकाने आतापासूनच पाण्याची बचत व त्यादृष्टीने नियोजन करावे, असे पुढे बोलतांना पालकमंत्री डॉ.भोयर म्हणाले. आयटीआय टेकडी जवळील तालुका क्रीडा संकुलाच्या निसर्गरम्य परिसरात आयोजित जागतिक योग दिन कार्यक्रमाला शहरातील अधिकारी, कर्मचाऱ्यांसह महिला, मुले, विद्यार्थी विशेषत: ज्येष्ठ नागरिक देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालकमंत्री डॉ.पंकज भोयर, जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्यासह सर्व उपस्थितांनी यावेळी सामुहिक योगासने केली. पतंजली योग समितीचे दामोधर राऊत, मोहन काळे, प्रशांत सावरकर यांनी योगांचे महत्व पटवून सांगण्यासोबतच उपस्थितांकडून प्रात्यक्षिकाद्वारे योगासने करून घेतली. हजारो वर्धेकर उत्साहात योग दिन कार्यक्रमात सहभागी झाले होते.

# विकासाचे प्रश्न पाण्यात, आमदारांचा जलयोग रंगात

## विहिरीत योगासनाचा स्टंट की जनतेच्या प्रश्नांपासून पळवाट

**वर्धा (देवळी) जनमाध्यम :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त देशभरात योगसाधनेचे कार्यक्रम उत्साहात पार पडत असताना एका आमदारांच्या आगळ्यावेगळ्या जलयोगा'ने राजकीय वर्तुळात चर्चा आणि टीकेची वादळे निर्माण केली आहेत. पाण्याने भरलेल्या विहिरीत उडी मारून योगासन करणाऱ्या आमदार राजेश बकाने यांच्या उपक्रमावर विरोधकांनी जोरदार हल्लाबोल चढविला असून, जनतेचे प्रश्न सोडविण्याऐवजी प्रसिद्धीसाठी स्टंटबाजी सुरू आहे, असा आरोप केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार योग दिन साजरा करण्यासाठी लाखो नागरिक मैदानांवर, शाळांमध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी एकत्र आले होते. मात्र आमदार बकाने यांनी विहिरीत उतरून पाण्याखाली योगमुद्रा सादर करत स्वतःकडे लक्ष वेधून घेतले. या कार्यक्रमाचे व्हिडिओ आणि छायाचित्रे समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली. मात्र याच घटनेवरून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केले आहे.

विरोधकांच्या मते, मतदारसंघातील पाणीटंचाई, शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी, अपूर्ण विकासकामे, खराब रस्ते आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांचे प्रश्न आजही कायम आहेत. अशा वेळी जनतेच्या समस्यांवर उपाय शोधण्याऐवजी लोकप्रतिनिधी प्रसिद्धीच्या झोतात राहण्यासाठी वेगवेगळे प्रयोग करत असल्याची टीका होत आहे. विहिरीत योग करण्यापेक्षा विहिरींना पाणी कसे मिळेल,



याची चिंता करणे अधिक महत्त्वाचे आहे, असा टोला विरोधी नेत्यांनी लगावला.

राजकीय विश्लेषकांच्या मते, सध्याच्या काळात समाजमाध्यमांवर चर्चेत राहण्यासाठी नेतेमंडळी विविध प्रकारचे उपक्रम राबवत आहेत. मात्र त्यातून प्रत्यक्ष जनतेच्या जीवनात किती बदल होतो, हा खरा प्रश्न आहे. योग दिनाचा संदेश आरोग्य, शिस्त आणि आत्मसंयमाचा असताना त्याचे रूपांतर प्रसिद्धीच्या कार्यक्रमात होऊ नये, अशी भावना अनेक नागरिकांनी व्यक्त केली.

दरम्यान, आमदार बकाने यांच्या समर्थकांनी हा उपक्रम आरोग्याविषयी जनजागृती करण्यासाठी आणि योगाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी असल्याचे सांगितले आहे. तरीही विरोधकांचा सवाल कायम आहे, जनतेच्या प्रश्नांमध्ये उतरण्याऐवजी विहिरीत उतरून योग केल्याने विकास होणार आहे का या प्रश्नामुळे जलयोग'पेक्षा त्यावरून पेटलेले राजकारणच अधिक चर्चेत आले आहे.

### तहानलेल्या जनतेच्या जखमेवर योग'ची फुंकर

वर्धा जिल्ह्यात पाणीटंचाईने जनता हैराण असताना देवळीचे आमदार राजेश बकाने यांनी विहिरीत उतरून योगासने करत प्रसिद्धीचा नवा डाव साधल्याची जोरदार चर्चा आहे. गावोगावी पाण्यासाठी महिलांची पायपीट सुरू असताना लोकप्रतिनिधी मात्र योग स्टंट'मध्ये व्यस्त असल्याची टीका होत आहे. जनतेला पाणी नव्हे, तर फोटोसेशन देण्याचे राजकारण सुरू असल्याचा आरोप विरोधकांनी केला असून या प्रकारामुळे संतापाची लाट उसळली आहे.

# शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय; माळेगाव (काळी) तलावातील गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात

**आष्टी शहीद जनमाध्यम :** दुष्काळाच्या झळा सहन करणाऱ्या माळेगाव (काळी) परिसरातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. पूर्णपणे कोरडा पडलेल्या माळेगाव (काळी) तलावातील गाळ काढण्याच्या कामाला आमदार सुमित वानखेडे यांच्या पुढाकाराने अखेर सुरुवात झाली असून, यामुळे तलावाच्या पुनरुज्जीवनाचा मार्ग मोकळा झाला आहे.

तलाव कोरडा पडल्याची माहिती मिळताच आमदार वानखेडे यांनी प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली होती. तलावाची साठवण क्षमता घटल्याने भविष्यातील पाणीटंचाईचे संकट ओळखून त्यांनी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या प्रयत्नांमुळे आता तलावातील संपूर्ण गाळ उपशाचे काम युद्धपातळीवर सुरू झाले आहे.



तलावातील गाळ काढल्यानंतर पावसाळ्यात अधिक प्रमाणात पाणीसाठा होणार असून भूजलपातळी वाढण्यासही मदत होणार आहे. त्यामुळे परिसरातील शेतकरी, पशुपालक आणि ग्रामस्थांना दीर्घकालीन लाभ मिळणार असल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे तलावातून निघणारा सुपीक गाळ शेतजमिनीची उत्पादकता वाढविण्यास उपयुक्त ठरणार असल्याने अनेक शेतकरी हा गाळ आपल्या शेतात नेण्यासाठी पुढाकार घेत आहेत.

गेल्या काही वर्षांपासून तलावात मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्याने त्याची पाणी साठवण क्षमता कमी झाली होती. आता सुरू झालेल्या या कामामुळे तलावाला नवसंजीवनी मिळणार असल्याची भावना ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत आहे. तलावाच्या विकासासाठी पुढाकार घेऊन तातडीने निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल माळेगाव (काळी) येथील शेतकरी आणि ग्रामस्थांनी आमदार सुमित वानखेडे यांचे आभार मानले आहेत.

# देहव्यापाराच्या अड्ड्यावर पोलिसांचा धाडसी छापा

## सावंगीतून पीडितेची सुटका; ३८ हजारांचा मुद्देमाल जप्त, मुख्य सूत्रधार फरार

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील सावंगी (मेघे) परिसरात सुरू असलेल्या कथित देहव्यापाराच्या अड्ड्यावर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने धडक कारवाई करत एका पीडित महिलेची सुटका केली. या कारवाईत ३८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. तर या रॅकेटची मुख्य सूत्रधार मानली जाणारी महिला अद्याप फरार असून तिचा शोध सुरू आहे.



पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, सावंगी (मेघे) येथील मुस्कान उर्फ शबनम नावाची महिला आर्थिक फायद्यासाठी राज्याबाहेरील तसेच विविध भागातील तरुणींना पैशांचे आमिष दाखवून देहव्यापारासाठी प्रवृत्त करत होती. ग्राहकांशी संपर्क साधून त्यांना मुली पुरविण्याचा व्यवसाय कृष्णाई कोर्ट बिल्डिंगमधील फ्लॅटमधून सुरू असल्याची माहिती समोर आली.

या माहितीची शहानिशा केल्यानंतर पोलिसांनी बनावट ग्राहकाच्या माध्यमातून सापळा रचला. ठरलेल्या इशाऱ्यानंतर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पथकाने कृष्णाई कोर्ट बिल्डिंगच्या तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक १३ वर छापा टाकला. यावेळी फ्लॅटमध्ये आरोपी राजू उर्फ निलेश प्रदीपराव आदेवार हा आढळून आला. एका खोलीत बनावट ग्राहकासोबत पीडित महिला देहव्यापार करत असल्याचे उघड झाले.

चौकशीदरम्यान पीडित महिलेने आपण बाहेर राज्यातील असल्याचे सांगत मुस्कान उर्फ शबनम हिने पैशांचे आमिष दाखवून येथे आणल्याची माहिती पोलिसांना दिली. तसेच ग्राहकांकडून पैसे घेणे आणि फ्लॅटची देखरेख करण्यासाठी निलेश आदेवार याला ठेवण्यात आल्याचेही तपासात समोर आले. कारवाईदरम्यान पोलिसांनी तीन अँड्रॉइड मोबाईल, ८ हजार रुपयांची रोकड तसेच देहव्यापारासाठी वापरले जाणारे साहित्य असा एकूण ३८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध सावंगी (मेघे) पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १४३ (२) तसेच अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम १९५६ मधील विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या नेतृत्वात ही कारवाई पार पडली.

# ओडिशातून येत होता गांजाचा पुरवठा; पुलगाव पोलिसांची धडक कारवाई

## ६०८ ग्रॅम गांजासह २२ हजारांचा मुद्देमाल जप्त

**पुलगाव जनमाध्यम :** अमली पदार्थांच्या विळख्यात तरुणाई अडकत असताना पुलगाव पोलिसांनी मोठी कारवाई करत गांजा विक्री करणाऱ्या संशयिताच्या मुसक्या आवळल्या आहेत. रामनगर वॉर्ड परिसरात टाकलेल्या धाडीत पोलिसांनी ६०८.९६ ग्रॅम गांजा आणि मोबाईल असा एकूण २२ हजार १८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. विशेष म्हणजे अटक आरोपीला चक्क ओडिशा राज्यातून गांजाचा पुरवठा होत असल्याची माहिती प्राथमिक चौकशीत समोर आल्याने या रॅकेटची व्याप्ती किती मोठी आहे, याबाबत चर्चा सुरू झाली आहे.

पोलिस निरीक्षक सदाशिव ढाकणे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पोलिसांच्या पथकाने पुलगाव येथील रामनगर वॉर्डमध्ये सापळा रचला. त्यानंतर प्रफुल माणिक लोणकर (वय ४५) याच्या घरावर छापा टाकण्यात आला. घराची कसून झडती घेतली असता एका पिशवीत मोठ्या प्रमाणात गांजा आढळून आला. पोलिसांनी तात्काळ ६०८.९६ ग्रॅम गांजा आणि मोबाईल जप्त करून आरोपीला ताब्यात घेतले.

जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत १२ हजार १८० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. प्राथमिक चौकशीत गांजाचा पुरवठा ओडिशातून होत असल्याचे संकेत मिळाल्याने या साखळीमागील मुख्य सूत्रधारांपर्यंत पोहोचण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. त्यामुळे पुरवठादारांनाही बेड्या ठोकल्या जाणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रशेखर ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक सदाशिव ढाकणे, सहाय्यक पोलिस निरीक्षक मदनकर, पोलिस उपनिरीक्षक शहाजी घोडके तसेच पोलिस कर्मचाऱ्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# नीट पुनर्परीक्षेला १४८ विद्यार्थ्यांची दांडी

## जिल्ह्यातील सहाही केंद्रांवर परीक्षा शांततेत; १,७०३ विद्यार्थ्यांनी सोडविला पेपर

**वर्धा जनमाध्यम :** देशभरात चर्चेचा विषय ठरलेल्या नीट परीक्षेच्या पार्श्वभूमीवर रविवारी जिल्ह्यात पुनर्परीक्षा शांततेत आणि पारदर्शक पद्धतीने पार पडली. जिल्ह्यातील सहा परीक्षा उपकेंद्रांवर आयोजित करण्यात आलेल्या या परीक्षेसाठी १,८५१ विद्यार्थी पात्र होते. त्यापैकी १,७०३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर १४८ विद्यार्थ्यांनी परीक्षेकडे पाठ फिरवत गैरहजेरी लावली.



परीक्षा सुरळीत आणि कोणत्याही अनुचित प्रकाराविना पार पडावी यासाठी जिल्हा प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली होती. प्रत्येक परीक्षा केंद्रावर एका नायब तहसीलदारासह लिपिकाची नियुक्ती करण्यात आली होती. तसेच दोन भरारी पथकांनी परीक्षा सुरू असताना सर्व केंद्रांना आकस्मिक भेटी देऊन व्यवस्थेची पाहणी केली.

# बोरखेडी-बम्बरडा गावांना टँकरद्वारे दिलासा; पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रयत्न

**आष्टी शहीद जनमाध्यम :** बोरखेडी व बम्बरडा या गावांमध्ये यंदा तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विहिरी, बोअरवेल आणि इतर जलस्रोत कोरडे पडल्याने गावकऱ्यांची चिंता वाढली होती. या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीने तातडीने पुढाकार घेत प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा करून पाणीपुरवठ्याची व्यवस्था सुरू केली आहे.

ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची वेळोवेळी भेट घेऊन गावातील गंभीर परिस्थितीची माहिती दिली. तसेच नागरिकांच्या अडचणी मांडत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. या पाठपुराव्याची दखल घेत प्रशासनाने दोन्ही गावांसाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला आहे.



सध्या दररोज पाच ते सहा टँकरच्या माध्यमातून बोरखेडी व बम्बरडा गावांमध्ये पाणी पोहोचविण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला असून पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यास मदत होत आहे. मात्र, वाढते तापमान आणि अपुरा पाऊस यामुळे भविष्यातील पाणीस्थितीबाबत ग्रामस्थांमध्ये चिंता कायम आहे.

पावसाळा सुरू होईपर्यंत नियमित टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवण्याची मागणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे. तसेच दीर्घकालीन उपाययोजनांसाठी जलसंधारण व नवीन पाणीपुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्याची गरज व्यक्त होत आहे.

# केळझरात लोखंड माफियांचा सुळसुळाट

## लोखंडाचा डल्ला लाखोंचा गंडा, केळझरातून नागपूरपर्यंत चोरीच्या रॅकेटची चर्चा

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यातील केळझर परिसरात लोखंड चोरीचे संघटित रॅकेट सक्रिय असल्याची धक्कादायक माहिती समोर येत असून, औद्योगिक कंपन्यांकडे जाणाऱ्या मालवाहू ट्रकमधील लोखंडी साहित्याची अफरातफर करून ते नागपूरच्या भंगार बाजारात विकले जात असल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. या प्रकारामुळे औद्योगिक क्षेत्रात खळबळ उडाली असून, संबंधित यंत्रणांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विविध कंपन्यांसाठी मोठ्या प्रमाणात लोखंड वाहून नेणाऱ्या काही ट्रकमधील माल मार्गातच कमी केला जातो. त्यानंतर हा माल वेगवेगळ्या माध्यमातून नागपूरकडे वळवून भंगार व लोखंड बाजारात विक्रीसाठी पाठविला जात असल्याचे सांगितले जात आहे. या संपूर्ण व्यवहारामुळे संबंधित कंपन्यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान होत असल्याची चर्चा आहे.

स्थानिक स्तरावर या प्रकाराची जोरदार चर्चा सुरू असून, काही व्यवहारांशी संबंधित महत्त्वाचे पुरावेही उपलब्ध झाल्याचे समजते. त्यामुळे या गैरव्यवहारामागे नेमके कोण आहे, या साखळीचे सूत्रधार कोण आहेत आणि हा गोरखधंदा किती काळापासून सुरू आहे, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. काही व्यक्तींची नावेही चर्चेत असल्याने प्रकरण अधिकच गंभीर बनले आहे.

औद्योगिक मालवाहतुकीच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, संबंधित विभाग आणि पोलिस प्रशासनाने या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी नागरिक आणि व्यावसायिक क्षेत्रातून होत आहे. उपलब्ध पुराव्यांची काटेकोर पडताळणी करून दोषींवर कठोर कारवाई केल्यास लोखंड चोरीच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

केळझार परिसरात सुरू असलेल्या या कथित लोखंड चोरीच्या जाळ्यामुळे उद्योगविश्वात चिंता निर्माण झाली असून, आता प्रशासन या प्रकरणात किती तत्परतेने कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# समुद्रपूरच्या विष्णू स्वामीची सीए परीक्षेत देशात ४४ वी रँक

**समुद्रपूर जनमाध्यम :** येथील विष्णू रामदास स्वामी याने चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षेत देशातून ४४ वी रँक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे, अवघ्या २१ व्या वर्षी त्याने हे यश मिळविल्याने समुद्रपूरसह वर्धा जिल्ह्यात त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) तर्फे घेण्यात येणारी सीए परीक्षा देशातील सर्वाधिक कठीण आणि प्रतिष्ठेच्या व्यावसायिक परीक्षांपैकी एक मानली जाते. या परीक्षेत राष्ट्रीय स्तरावर रँक मिळविणे ही मोठी कामगिरी समजली जाते. विष्णूने सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या बळावर हे यश मिळविले. विष्णूचे प्राथमिक शिक्षण समुद्रपूर येथे झाले. त्यानंतर त्याने वर्धा येथे उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. बारावीच्या परीक्षेत त्याने जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवत आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली होती. त्याच गुणवत्तेचा ठसा त्याने सीए परीक्षेतही उमटविला आहे.

विष्णूच्या या यशामुळे त्याचे कुटुंबीय, शिक्षक व मित्रपरिवार आनंदित झाले असून विविध स्तरांतून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्याचे यश प्रेरणादायी ठरत असून, ध्येय निश्चित करून सातत्याने प्रयत्न केल्यास मोठे यश मिळविता येते, हे त्याने दाखवून दिले आहे. समुद्रपूरच्या शैक्षणिक वाटचालीत त्याच्या या यशाची नोंद अभिमानाने घेतली जात आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## हितसंबंधांची मैत्री

फ्रान्समधील एव्हियान या निसर्गरम्य शहरात पार पडलेली जी-७ या जगातील सर्वात श्रीमंत राष्ट्रांच्या संघटनेची परिषद भारत आणि अमेरिका यांच्यातील बदलत्या राजनैतिक समीकरणांची साक्षीदार ठरली. लेक जिनेवाच्या किनाऱ्यावर आयोजित या जागतिक मंचावर ५० हून अधिक देशांचे राजकीय नेते उपस्थित होते. येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात झालेली भेट सध्या आंतरराष्ट्रीय वर्तुळात चर्चेत आहे. जवळपास १६ महिन्यांनंतर दोन्ही नेत्यांची प्रत्यक्ष भेट झाली. एकेकाळी जागतिक राजकारणातील एक अनोखी मैत्री किंवा 'ब्रोमान्स' म्हणून मोदी आणि ट्रम्प यांच्या पर्सनल केमिस्ट्रीकडे पाहिले जात होते. २०१९ मधील 'हाऊडी मोदी' आणि २०२० मधील 'नमस्ते ट्रम्प' या भव्य कार्यक्रमांमधून दोन्ही नेत्यांनी वैयक्तिक जवळीक थाटामाटात प्रदर्शित केली होती. तथापि, ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळात भारत आणि अमेरिका संबंधांमध्ये तणाव अधिक स्पष्टपणे जाणवू लागला. ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणात भारताला लक्ष्य केले. पहिल्या कार्यकाळात भारताचे आयात शुल्क जगात सर्वाधिक असल्याचे सांगत त्यांनी उघड नाराजी व्यक्त केली होती. अमेरिकेच्या हार्ले डेव्हिडसन मोटारसायकलवर भारताने लावलेल्या उच्च कराचा मुद्दा ते वारंवार उपस्थित करत. भारताने हा कर ७५ टक्क्यांवरून ५० टक्क्यांवर आणला; पण ट्रम्प यांचे समाधान झाले नाही. त्यांनी भारताला प्रचंड कर लावणारा देश म्हणून संबोधणे सुरूच ठेवले. भारताच्या रशियाकडून होत असलेल्या तेल खरेदीवरही त्यांनी आक्षेप घेतला. याचा दंड म्हणून अतिरिक्त शुल्क आकारणीचा बडगा उगारला. मृत अर्थव्यवस्था म्हणून भारताचा अवमान, 'ऑपरेशन सिंदूर' प्रकरणातील विधाने, पाकिस्तानशी जवळीक साधून शरीफ आणि मुनीर यांच्यावर स्तुतिसुमने उधळणे, अशा घटनांमधून ट्रम्प यांची बदललेली भूमिका भारताच्या लक्षात आली. व्यापार करारादरम्यान अमेरिकन कृषिमालाला, दुग्धोत्पादनांना प्रवेश देण्याबाबत भारताने आखलेली लक्ष्मणरेषा हे याचे मुख्य कारण होते; पण या तणावाचे पडसाद सामरिक पातळीवरही उमटले. जी-७ शिखर परिषदेच्या पूर्वसंध्येला अमेरिकेच्या संरक्षण मंत्रालयाने (ज्याला आता 'डिपार्टमेंट ऑफ वॉ' असे संबोधले जात आहे) वादग्रस्त निर्णय घेतला. अमेरिकेने 'इंडो-पॅसिफिक कमांड'चे नाव बदलून पुन्हा जुने 'यूएस-पॅसिफिक कमांड' असे केले. २०१८ मध्ये भारताचे वाढते महत्त्व आणि 'क्वाड' समूहाची रचना लक्षात घेऊन या नावात 'इंडो' हा शब्द जोडला गेला होता. तो अचानक काढून टाकणे हा भारतासाठी स्पष्ट राजनैतिक संकेत आहे. या कमांडच्या संकेतस्थळावर पाकव्याप्त काश्मीर हा पाकिस्तानचा भाग असल्याचे दाखवणारा नकाशा प्रदर्शित केला. या घडामोडी भारताला डिवचणाऱ्या, खजिल करणाऱ्या आणि पाकिस्तानची तळी उचलणाऱ्या आहेत. याबाबत वेळोवेळी मोदी सरकारने भूमिका स्पष्ट केली; पण डीलमेकर म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या ट्रम्प यांच्या भूमिकांमध्ये बदल झालेला नाही. वास्तविक, या बैठकीच्या पूर्वसंध्येला अमेरिकेच्या हल्ल्यात तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाल्यामुळे सरकार नाराज होते. पंतप्रधान मोदी जी-७ परिषदेसाठी फ्रान्सला पोहोचले, तेव्हा त्यांच्या बोलण्यातून हा तणाव जाणवत होता. बैठकीत त्यांनी भारतीय सागरी खलाशांच्या सुरक्षेचा आणि व्यापारी जहाजांच्या संरक्षणाचा मुद्दा अत्यंत आक्रमकपणे मांडला. ट्रम्प यांच्या उपस्थितीत भाषण करताना त्यांनी कोणाचेही नाव न घेता, 'जगात विश्वासाची कमतरता' असल्याचे वक्तव्य केले. हा रोख अमेरिकेच्या धोरणांकडे होता. अमेरिका आणि इराण कराराच्या अंमलबजावणीदरम्यान होर्मुझच्या सामुद्रधुनीसह जागतिक सागरी व्यापारी मार्गांवर काम करणाऱ्या लाखो भारतीय खलाशांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे, ही मागणीही पंतप्रधानांनी केली. दोन्ही देशांमधील संरक्षण सहकार्य, सुरक्षा भागीदारी आणि आर्थिक चर्चा सुरू आहेत. मात्र, या मैत्रीतील भावनिक उबदारपणा संपला असून त्याची जागा पूर्णपणे व्यावहारिक हितसंबंधांनी घेतली आहे. ट्रम्प यांनी नुकतेच म्हटले होते की, ते पंतप्रधान मोदींचे मित्र राहतील; पण सध्या भारत ज्या काही गोष्टी करत आहे त्या मला पटत नाहीत. ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदींचे कौतुक करताना, त्यांना जगातील सर्वात कठीण वाटाघाटी करणाऱ्या नेत्यांपैकी एक असे म्हटले असले, तरी उभय देशांमधील व्यापार करार पूर्णत्वाच्या अगदी जवळ असल्याचे स्पष्ट केले. पुढील आठवड्यात अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी जेमिसन ग्रीर भारताचा दौरा करणार आहेत. संयुक्त पत्रकार परिषदेत ट्रम्प यांनी भारतावर हल्ला झाल्यास अमेरिका भारताच्या मदतीला धावून येईल, असेही म्हटले. या भूमिकेमागे अमेरिकेचे व्यापक आर्थिक, व्यापारी आणि सामरिक हितसंबंध आहेत. जागतिक पुरवठा साखळी, आशिया-प्रशांत क्षेत्रातील सुरक्षा, चीनचा वाढता प्रभाव आणि १४४ कोटी लोकसंख्येची बाजारपेठ या सर्व बाबींमुळे भारत अमेरिकेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. जी-७ शिखर परिषदेच्या 'आऊटरीच सत्रा'दरम्यान पंतप्रधान मोदी यांनी 'सर्वांसाठी संतुलित, सामायिक आणि शाश्वत आर्थिक विकासाचे पुनरुज्जीवन' या विषयावर भाषण केले. पश्चिम आशियातील संघर्षामुळे इंधन, खते आणि अन्नधान्य पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून याचा मोठा फटका 'ग्लोबल साऊथ'च्या गरीब देशांना बसल्याचे त्यांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांनी विकसनशील देशांना आधार देण्यासाठी विशेष यंत्रणा तयार करावी, जेणेकरून हे देश जागतिक धक्के पचवू शकतील, हा त्यांनी मांडलेला प्रस्तावही मोलाचा आहे. मोदींशी संवाद साधताना ट्रम्प यांनी लवकरच भारत दौऱ्यावर येण्याची इच्छा व्यक्त केली. व्हाईट हाऊसने या दौऱ्याबाबत अधिकृत घोषणा केल्यास, दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्षपद स्वीकारल्यानंतरचा ट्रम्प यांचा हा पहिलाच भारत दौरा ठरेल. ऑगस्ट २०२५ मध्ये नवी दिल्लीतील 'क्वाड' परिषदेसाठी ट्रम्प भारतात येणार होते; परंतु आयात शुल्क आणि भारत-पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर हा दौरा रद्द झाला. जी-७ परिषदेतील चर्चेदरम्यान ट्रम्प यांच्या भूमिकेत सकारात्मक बदल झाल्याचे दिसते. भारतावर हल्ला झाल्यास अमेरिका मदतीला धावून येईल, या विधानातून ट्रम्प यांनी चीनला अप्रत्यक्ष इशारा दिला आहे. भारत-अमेरिका यांच्यातील व्यापारी करारावर लवकरच शिक्कामोर्तब होण्याची चिन्हे असून, त्याद्वारे उभय देशांमधील तणाव दूर होऊन सहकार्याचे नवे पर्व सुरू होताना दिसेल.

# चिंता मान्सूनची !

**यंदा अल निनोच्या प्रभावामुळे मान्सूनची चिंता निर्माण झाली आहे. अन्नधान्य उत्पादनासाठी पावसाचे पाणी अत्यावश्यक आहे. तसेच देशातील ७० टक्क्यांहून अधिक पिण्याचे पाणी भूजल स्त्रोतांतून मिळते. म्हणूनच पावसाचा प्रत्येक थेंब जिथे आणि जेव्हा पडतो, त्याचे महत्त्व ओळखले पाहिजे आणि त्याचा जपून उपयोग केला पाहिजे. हाच भारताच्या जलसुरक्षेचा, अन्नसुरक्षेचा आणि भविष्यातील शाश्वत विकासाचा सर्वात महत्त्वाचा पाया आहे.**



दरवर्षी मान्सून केरळमध्ये वेळेवर दाखल होतो की नाही, याची देशभर उत्सुकता असते. भारतीय महासागर आणि बंगालच्या उपसागरातून देशाच्या अंतर्भागाकडे होणाऱ्या त्याच्या प्रवासावर बारकाईने लक्ष ठेवले जाते. मान्सूनच्या प्रगतीत थोडाही खंड पडला, तरी अनेकांच्या काळजाचा ठोका चुकतो. शेतकरी नव्याने लावलेल्या पिकांसाठी पावसाच्या पाण्याची वाट पाहत आकाशाकडे डोळे लावून बसलेले असतात. शेतीसाठी सिंचन आणि वीजनिर्मितीसाठी धरणे व जलाशय पुन्हा भरून निघणे आवश्यक असते. उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेने कोरडी पडलेली माती, झाडे आणि जंगलेही पावसाच्या प्रतीक्षेत असतात.

निसर्गापासून दूर गेलेल्या शहरांमध्ये राहणारे आपणसुद्धा जणू पिण्याचे पाणी सरकार आणि नळांमधूनच मिळते, असा समज करून घेतलेला असला, तरी मान्सूनच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहत असतो. तीव्र उष्णतेपासून दिलासा मिळावा, यासाठी पाऊस आवश्यक असतो. कोरड्या पडलेल्या जमिनीवर पहिल्या पावसाच्या सरी कोसळल्यानंतर येणाऱ्या मातीच्या सुगंधाइतका मोहक सुगंध क्वचितच दुसरा असतो. तो आपल्यासाठी आनंदाचा क्षण असतो, तरीदेखील भारतीय मान्सून नेमका कसा कार्य करतो, तो जागतिक हवामान व्यवस्थेशी कसा जोडलेला आहे आणि हवामान बदलामुळे महासागरांचे प्रवाह, वाऱ्यांचे स्वरूप आणि जगभरातील पर्जन्य प्रणालींमध्ये होणारे बदल त्याच्यावर कसा परिणाम करतात, हे आपण अजूनही पूर्णपणे समजून घेतलेले नाही.

२०२६ हे वर्ष हवामानाच्या दृष्टीने खरोखरच धक्कादायक ठरू शकते. पॅसिफिक महासागरात अल निनो विकसित होत असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. परंपरेने अल निनोचा अर्थ भारतासाठी कमकुवत मान्सून असा मानला जातो. आता हे जवळपास निश्चित झाले आहे की, यंदाचा अल निनो अत्यंत तीव्र किंवा 'सुपर अल निनो' स्वरूपाचा असेल. कारण, महासागराच्या पृष्ठभागावरील तापमान दीर्घकालीन सरासरीपेक्षा दोन अंश सेल्सिअसपेक्षा अधिक वाढण्याचा अंदाज आहे. महासागरातील ही तीव्र उष्णता वातावरणातील दाब व्यवस्था आणि जेट प्रवाह अस्थिर करेल आणि परिणामी जगभरातील हवामानविषयक घटना अधिक तीव्र होतील, अशी शक्यता आहे. याशिवाय हवामान बदलाचे दीर्घकालीन परिणाम आधीच तापमान वाढवत आहेत आणि हवामानाच्या पद्धती अधिक अस्थिर बनवत आहेत. त्यामुळे एकंदरीत २०२६ हे वर्ष प्रचंड उष्णता आणि हवामानातील टोकाच्या घटनांसाठी ओळखले जाऊ शकते.

यंदाचा अल निनो जून ते ऑगस्ट या कालावधीत अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. अशा परिस्थितीत त्याचे काही दुष्परिणाम कमी करण्याचे काम 'इंडियन ओशन डायपोल' करू शकते. पूर्व आफ्रिकेजवळील पश्चिम भारतीय महासागर आणि इंडोनेशियाजवळील पूर्व भारतीय महासागर यातील तापमानातील फरकावर ही प्रणाली आधारित असते. पश्चिम भागातील समुद्र पाणी तुलनेने अधिक उबदार असल्यास सकारात्मक डायपोल निर्माण होतो आणि तो तीव्र अल निनोच्या नकारात्मक परिणामांना काही प्रमाणात रोखू शकतो; मात्र यंदा भारतीय हवामान विभागाने तटस्थ डायपोल स्थितीचा अंदाज वर्तविला आहे. मान्सून हंगामाच्या शेवटी सकारात्मक डायपोल विकसित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ही परिस्थिती फारशी दिलासादायक नाही; मात्र चिंतेचे कारण इतक्यावरच संपत नाही. जागतिक हवामान व्यवस्था झपाट्याने असंतुलित होत आहे आणि त्याचा परिणाम मान्सूनवरही होत आहे.

एका बाजूला हवामानबदलामुळे अतिवृष्टीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. गेल्या काही वर्षांतील आकडेवारीनुसार भारतात जवळपास दररोज एक तरी तीव्र हवामानविषयक घटना घडली आहे. मुसळधार आणि अतिमुसळधार पाऊस, पूर आणि भूस्खलनाच्या घटना वर्षातील ६८ ते ९५ टक्के दिवसांमध्ये नोंदवल्या गेल्या आहेत. पूर्वीपेक्षा कमी दिवसांत अधिक पाऊस पडत आहे. ही बाब चिंताजनक आहे. कारण, त्यामुळे पूरस्थिती निर्माण होते. त्याचवेळी हा पाऊस अडवून ठेवण्यात आणि त्याद्वारे पृष्ठभागावरील तसेच भूजल साठ्यांचे पुनर्भरण करण्यात आपण अपयशी ठरलो, तर पाणीटंचाई आणि दुष्काळाची समस्या अधिक गंभीर होईल.

दुसऱ्या बाजूला, पश्चिमी विक्षोभांचे स्वरूपही बदलत असल्याचे दिसत आहे. भूमध्य समुद्र परिसरातून पश्चिम आशियामार्गे येणारे हे ओलसर वारे उत्तर भारतात पाऊस आणि हिमवृष्टी घडवून आणतात. परंपरेने हे विक्षोभ हिवाळ्यात सक्रिय असतात; परंतु आता हिमालयातील हिमवृष्टी कमी होत असल्याचे आपण पाहत आहोत आणि हे विक्षोभ वाढत्या प्रमाणात उन्हाळ्यात येत आहेत. इतकेच नव्हे, तर मान्सून काळातही ते सक्रिय राहतात.

उन्हाळ्यात मिळणारा अतिरिक्त पाऊस स्वागतार्ह वाटत असला, तरी तो कापणी झालेल्या पिकांचे नुकसान करतो. गेल्या काही वर्षांत पश्चिमी विक्षोभ आणि मान्सूनमधील कमी दाबाच्या प्रणाली यांच्यातील परस्पर संवादामुळे अतिवृष्टी आणि ढगफुटीच्या घटना वाढल्या आहेत. हिमालयीन राज्यांमध्ये गेल्या वर्षी झालेल्या भीषण पूर आणि भूस्खलनांना हीच परिस्थिती कारणीभूत ठरली.

जगातील हवामानाला कोणत्याही सीमा नसतात. पाऊस, उष्णता, हिमवृष्टी आणि थंडी नियंत्रित करणाऱ्या वाऱ्यांच्या आणि महासागर प्रवाहांच्या प्रणाली परस्परांशी जोडलेल्या असतात. या जागतिक प्रणालींवर आणखी एका जागतिक संकटाचा परिणाम होत आहे आणि ते संकट म्हणजे हरितगृह वायूंचे उत्सर्जन. हे उत्सर्जन विविध देशांतून होत असले, तरी त्याचा साठा संपूर्ण पृथ्वीच्या वातावरणात होतो. हवामान बदलामुळे तापमान वाढत असताना आर्क्टिक प्रदेश अधिक वेगाने उष्ण होत आहे. त्यामुळे ध्रुवीय जेट प्रवाह कमकुवत होत आहेत. परिणामी, विषुववृत्त आणि ध्रुव यांतील तापमानातील फरक कमी होत आहे आणि त्याचा परिणाम पश्चिमी विक्षोभांवर होत आहे. त्यामुळे भारतात अवेळी पाऊस पडण्याच्या घटना वाढत आहेत.

याचा नेमका अर्थ काय, असा प्रश्न अनेकांना पडू शकतो. शेवटी, सिंचन व्यवस्था आणि आधुनिक जलसुविधांमुळे पावसावरील आपले अवलंबित्व कमी झाले आहे, असे वाटू शकते; परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, भारत अजूनही मान्सूनच्या लहरींपासून पूर्णपणे सुरक्षित झालेला नाही. अन्नधान्य उत्पादनासाठी पावसाचे पाणी अत्यावश्यक आहे. भारतातील बहुतांश शेती ही अजूनही पावसावर आधारित आहे. सिंचनाखालील शेतीदेखील मोठ्या प्रमाणात भूजलावर अवलंबून आहे. देशातील ७० टक्क्यांहून अधिक पिण्याचे पाणी भूजल स्त्रोतांतून मिळते. म्हणूनच भारताचा खरा अर्थमंत्री म्हणजे भारतीय मान्सून, असे म्हटले जाते. त्याचा आपण पूर्ण आदर केला पाहिजे. पावसाचा प्रत्येक थेंब जिथे आणि जेव्हा पडतो, त्याचे महत्त्व ओळखले पाहिजे आणि त्याचा जपून उपयोग केला पाहिजे. हाच भारताच्या जलसुरक्षेचा, अन्नसुरक्षेचा आणि भविष्यातील शाश्वत विकासाचा सर्वात महत्त्वाचा पाया आहे.

✍ सुनीता नारायण

### पारंपरिक जलसंधारण विज्ञान

'सीएसई'ने १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला भारताच्या पारंपरिक जलसंधारण विज्ञानाचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. आमचे एक पथक राजस्थानच्या वाळवंटातून प्रवास करत असताना आम्हाला तिथे उलट्या ठेवलेल्या 'फ्लाईंग सॉसर्स'सारख्या काही रचना आढळल्या. चौकशीअंती समजले की, ती कृत्रिम पाणलोट क्षेत्र असलेली अत्यंत कल्पक जलसंधारण रचना होती. पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब गोळा करून तो एका भूमिगत विहिरीत साठवला जात असे. हे विज्ञान खरोखरच अद्भुत होते. या पद्धतीमुळे जैसलमेरसारख्या जगातील अत्यंत कोरड्या भागातही एका हेक्टर जमिनीवरून तब्बल दहा लाख लिटर पाणी साठवणे शक्य होते. वर्षाला केवळ ५० मिलिमीटर पाऊस पडत असतानाही पावसाचा प्रत्येक थेंब साठवून ठेवण्याच्या या कौशल्यामुळेच हे शहर प्राचीन काळात उत्तम रीतीने बहरले होते.

ब्रिटिशांचे आगमन झाल्यानंतर ही संपूर्ण व्यवस्था कोलमडून पडली. त्यांना भारतातील हे विज्ञानाचे वैविध्य आणि समुदायावर आधारित जलव्यवस्थापन कधी समजलेच नाही.

त्यांनी या पारंपरिक पद्धतींऐवजी कालवे आणि पाणी वळवण्याच्या आधुनिक प्रणाली आणल्या. परिणामी, पाणी व्यवस्थापन स्थानिक जनतेच्या हातातून काढून सरकारी नोकरशाहीच्या ताब्यात देण्यात आले. स्वातंत्र्योत्तर भारतातही आपण याच चुकीची पुनरावृत्ती केली. यामुळे हे प्राचीन ज्ञान लयाला गेले. त्याचे पुनरुज्जीवन करणे आता गरजेचे आहे.

# आमच्या देव्हाऱ्यातील दत्तात्रय गेला

## आता डोके ठेवायला पाय कुठून आणावेत ?

लोकप्रतिनिधीत्वाचा मानदंड निर्माण करणारे प्रा. बी.टी. देशमुख (भाऊ) काल अचानक अनंताच्या प्रवासाला निघून गेले. आमच्या देव्हाऱ्यातील दत्तात्रयच गेला. आता ज्या पायावर आदराने आणि विश्वासाने डोकं ठेवावं ते पाय कुठून आणावेत ? अशी भावना माझ्यासह अनेकांच्या अंतःकरणात निर्माण झाली असेल. मूल्यनिष्ठा, समर्पण, अभ्यासूपणा, वैचारिकता, कर्तृत्व, वक्तृत्व, संसदपटुत्व या तत्त्वांचा प्रतिशब्द म्हणजे प्रा. बी.टी.देशमुख होते. त्यासाठी त्यांनी आयुष्य पणाला लावलं होतं. पाच वेळा ते विधान परिषदेवर निवडून आले केवळ हा त्यांच्या मोठेपणाचा मानदंड नव्हता तर आयुष्य कसे असावे? ते कसे घडवावे? याचा वस्तुपाठ म्हणजे भाऊंचा जीवन प्रवास होता.

चांदूरबाजार तालुक्यातील बेलोरा या लहानशा गावात, सामान्य कुटुंबात जन्म घेतलेल्या भाऊंनी आपले आयुष्य बांधले. शिक्षणाचा, समाजकारणाचा आणि राजकारणाचा कोणताही वारसा नव्हता. उपजत बुद्धिमत्ता, चळवळ्या स्वभाव आणि आयुष्यात काहीतरी करून दाखवण्याची जिद्द या भरोवशावर त्यांनी आपली 'देशमुखी' निर्माण केली. ही देशमुखी आंदण मिळालेली नव्हती तर ती स्वकष्टाने निर्माण केलेली होती. नवव्या वर्गात असताना संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात ते सहभागी झाले. राजकमल चौकातील संयुक्त महाराष्ट्राच्या सभेत नवव्या वर्गातील भाऊराव तुळशीराम देशमुख या पोरसवदा वयाच्या मुलाने खणखणीत भाषण केले.

बापूसाहेब कारंजकर तेव्हा अमरावती जिल्हा संयुक्त महाराष्ट्र समितीचे समन्वयक होते. वीर वामनराव दादा जोशी. डॉ. अण्णासाहेब सोमण, डॉ.दाजीसाहेब पटवर्धन, नानासाहेब बामणगावकर, बाबासाहेब खापर्डे, बाळासाहेब मराठे हे चळवळीचे मार्गदर्शक होते. यशवंतराव खापर्डे, प्राचार्य अण्णासाहेब वैद्य ॲड. यशवंतराव शेरेकर, बबनराव मेटकर, कविवर्य सुरेश भट हे तत्कालीन तरुणतुर्क स्थानिक चळवळीचे हिरो होते. आपल्या धारिष्ट्याने, चळवळ्या स्वभावाने आणि खणखणीत वक्तृत्वाने भाऊराव देशमुख या मुलाने त्यात सर्वांचे लक्ष वेधून घेतले. राहायची सोय नव्हती की जेवणाची भ्रांत नव्हती. यशवंतराव खापर्डे भाऊरावांना बाळासाहेब मराठ्यांकडे (आप्पा) घेऊन गेले. आप्पा गुणग्राहक आणि दैनिक हिंदुस्थान परिवार म्हणजे सर्वांचे आश्रयस्थान. आप्पांनी भाऊरावांना दैनिक हिंदुस्थान मध्ये काम दिले आणि भाऊरावांनी आपल्या गुणवैशिष्ट्यांमुळे प्रचंड मेहनतीने दैनिक हिंदुस्थानचा केवळ कर्मचारीच नाही तर आप्पांच्या मानसपुत्राचे स्थान प्राप्त केले.

विदर्भ महाविद्यालयात भाऊंचे शिक्षण झाले. या महाविद्यालयातच्या विस्तीर्ण परिसरात आणि चिरेबंद वास्तूत प्राचार्य प.सि. काणेंसारख्या गुरूंच्या तालमीत ते घडले. भाऊ विदर्भ महाविद्यालयाच्या छात्रसंघाचे अध्यक्ष होते. विदर्भ महाविद्यालयाच्या छात्रसंघाचे अध्यक्ष असताना स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनासाठी त्यांनी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना आणले. भाऊराव देशमुख या छात्रसंघ अध्यक्षाने त्यावेळी केलेले भाषण युवा नेतृत्वासाठी एक आदर्श ठरले. यशवंतरावांनी या तरुण विद्यार्थी नेत्याच्या भाषणाची दखल घेतली. पुढे त्याचाच परिपाक म्हणून भाऊंच्या व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पाठपुराव्याचे यश म्हणून विदर्भ महाविद्यालयात चार विषयात पदव्युत्तर वर्ग प्राप्त झाले. वऱ्हाडातील विद्यार्थ्यांसाठी ही फार मोठी उपलब्ध होती? भाऊंच्या नेतृत्वाची बीजं याकाळात अंकुरित झाली.



राज्यशास्त्रात गुणवत्तेसह पदव्युत्तर पदवी विदर्भ महाविद्यालयातून प्राप्त केल्यावर सरकारी सेवेची दारं त्यांना खुली होती. शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावतीला सुरू केले होते. बहुजन समाजाच्या विशेषतः ग्रामीण भागातील मुलांसाठी उच्च शिक्षणाचे दालन त्यांनी उघडले होते. या महाविद्यालयात शिक्षक म्हणून डॉ ज्वालाप्रसादांसह अनेक गुणवंतांना त्यांनी आणले होते. डॉ. भाऊसाहेबांच्या या ज्ञानयज्ञात आपलीही समिधा अर्पण केली पाहिजे म्हणून भाऊराव देशमुखांनी शिवाजी महाविद्यालयात राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून सेवा दिली. प्रा.बी.टी. देशमुख नावाचा व्यासंगी, वक्तशीर व समर्पित शिक्षक ज्ञानगंगेच्या प्रवाहात आला. भाऊंचे वर्गातील शिकवणे ही विद्यार्थ्यांसाठी पर्वणीच ठरली. राज्यशास्त्राच्या अनेक पुस्तकांचे त्यांनी लेखन केले. सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, प्रो. हेरॉल्ड लास्की त्यांनी केवळ क्रमिक अभ्यासक्रमातील विषय म्हणून मुलांना सांगितले नाहीत तर त्यांची जीवनदृष्टी आपल्या अंत:करणातून त्यांच्या मन:पटलावर बिंबविली. त्यामुळेच 'मी बी. टी. सरांचा विद्यार्थी आहे किंवा होतो' ही बिरुदावली मिरवणारी विद्यार्थ्यांची पिढी निर्माण झाली. त्याकाळात नागपूर विद्यापीठ होते. भाऊ एक शिक्षक म्हणून विद्यापीठाच्या विविध उपक्रमात सक्रिय झाले. विशेषतः १९६३ साली स्थापन झालेल्या नागपूर विद्यापीठ शिक्षक संघात (नुटा) ते सक्रिय होऊन पुढे अध्यक्ष झाले. या संघटनेला भाऊंच्या नेतृत्वात उर्जितावस्था प्राप्त झाली. याशिवाय विद्यापीठ अभ्यास मंडळे, विद्या शाखा, विद्या परिषद, अधिसभा, कार्यकारी परिषद अशा प्राधिकरणांवर त्यांनी आपली अमीट छाप सोडली. प्रत्येक प्राधिकरणावर व्यवस्था परिवर्तन व सुधारण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण योगदान दिले. विद्यार्थी, शिक्षक हिताचे आणि विद्यापीठाची गरिमा वाढविणारे हे योगदान होते. हे करत असताना आपल्या कर्तव्याशी तसूभरी प्रतारणा त्यांनी कधी केली नाही. महाविद्यालयात सकाळी आपले अध्यापनकार्य पूर्ण करून एसटीने जाऊन ते विद्यापीठाच्या सभांना उपस्थित राहत. विद्यार्थ्यांच्या, शिक्षकांच्या भवितव्याच्या प्रश्नांबाबत महाविद्यालयाचे प्राचार्य, संस्थेच्या, विद्यापीठाच्या व्यवस्थापनासह शासनाशी कधी त्यांनी तडजोड केली नाही. आपल्या सद्सद्विवेकबुद्धीला आणि स्वीकारलेला कर्तव्याला स्मरून त्यांचे वर्तन राहीले . अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेत आणि उभारणीत भाऊंचा फार मोठा सहभाग आहे. १९८० साली भाऊ पदवीधर मतदारसंघातून विधान परिषदेवर निर्वाचित झाले. त्यावेळी त्या मतदारसंघावर 'नागपूरची' मक्तेदारी होती. ही मक्तेदारी मोडून उपजत बुद्धिमत्ता, अंगभूत प्रतिभा, शालेय-महाविद्यालयीन जीवनात व्यक्तिमत्त्वात रुजलेले नेतृत्वगुण, मेधावी वक्तृत्व, संसदीय आयुधांचा सुयोग्य उपयोग करण्याचे कौशल्य आणि मतदारांनी ज्या विश्वासाने विधानमंडळात पाठविले त्यांच्या प्रति असलेली बांधीलकी हे सतीच वाणं घेऊन आपल्या विधिमंडळातील कारकिर्दीचे भाऊंनी सोने केले. ते खरे संसदपटू व संसदरत्न ठरले. शेतकऱ्यांपासून तो प्राध्यापकापर्यंत हजारो लोकांच्या इच्छाआकांक्षांचे, त्यांच्या जीवन मरणाच्या प्रश्नांचे प्रतिबिंब भाऊंच्या संसदीय लढाईत उमटले. याकाळात काही दबावाचे व मोहाचे क्षण आले नाहीत का? आले. पण या राजकीय दबावाला वा पदांच्या मोहाला प्रा.बी.टी. देशमुख हा लोकप्रतिनिधी कधीही बधला नाही. व्रतस्थवृत्तीने आणि बाणेदारपणे या सर्व क्षणांवर त्यांनी मात केली.

अमरावतीच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नांसाठी, विदर्भाच्या अनुशेषासाठी, विदर्भातील सिंचन प्रकल्पांसाठी, शैक्षणिक सुधारणांसाठी भाऊ राजकीय गणितांची पर्वा न करता सरकारवर तुटून पडत. विदर्भाच्या अनुशेषाच्या प्रश्नावर त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांना विधिमंडळाचे संस्थगित अधिवेशन घ्यायला भाग पाडले. यावरून त्यांची कर्तव्यकठोरता अधोरेखित होते. वास्तविक पाहता प्रत्येक निवडणुकीत भाऊ काँग्रेसच्या पाठिंब्याने निवडून यायचे. पण जनतेच्या प्रश्नांसाठी आणि विशेषतः विदर्भाच्या अनुशेषासाठी विधिमंडळात काँग्रेसच्या सरकारला जेवढे त्यांनी धारेवर धरले ते विरोधी पक्ष नेत्यास साजेसे असेच होते. पण या प्रतिपादनात राजकीय विखार नव्हता, व्यक्तिगत द्वेष नव्हता की पडद्यामागची तडजोड नव्हती. जनतेच्या प्रश्नांसाठी अत्यंत प्रामाणिकपणे, पोटतिडकीने पुकारलेला तो एल्गार होता. आज

✍ डॉ.किशोर फुले

राजकीय, सामाजिक क्षितिजावर अत्यंत काळेकुट्ट ढग दाटून आले असताना बखरकारांनी म्हटल्या प्रमाणे या सर्व लढाईत 'भाऊ मध्यान्हीचा सूर्य भासला' असेच म्हणावे लागते. २०१० साली भाऊ सहाव्यांदा विधानपरिषद निवडणुकीला सामोरे गेले. जनताही कशी विसरभोळी असते आणि तात्कालीक विषयात वाहून जाते. राजकारणातील भ्रष्ट गुंडपुंड धनशक्तीच्या जोरावर कसे मस्तवाल होतात त्याचे हे उदाहरण आहे. अमरावतीच्या पिण्याच्या पाण्यासाठी भाऊंनी संघर्ष केला. हे पिण्याचे पाणी आणि शेतकऱ्यांच्या शेतीचे पाणी रतन इंडिया कंपनीला (सोफिया) देऊ नये ही ठाम भूमिका त्यांनी घेतली. या लढाईत पद्मश्री प्रभाकरराव वैद्य त्यांच्यासोबत होते. आसपासची शेती उजाड होणार होती. लोकांच्या जीवन मरणाचा हा प्रश्न होता. दिल्लीतील काँग्रेसच्या एका बड्या नेत्याचा या सोफियात 'इंटरेस्ट' होता. स्थानिक नेते त्यांनी मॅनेज केले होते. विरोधकांसह त्यांच्या पोटापाण्याची सोय झाली होती. फक्त बी.टी. देशमुख यांचा अडसर होता. तोंडावर विधान परिषदेची निवडणूक होती.

महाराष्ट्राच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी भाऊंना बोलावून या प्रश्नाला विरोध करण्याची भूमिका सोडा विधान परिषदेत आम्ही तुम्हाला ताकतीने मदत करू अन्यथा अडचणी येतील असे सुचवले. ' निवडणुकीत पराभव झाला तरी बेहत्तर पण जनतेच्या प्रश्नांशी प्रतारणा करणार नाही' असे बाणेदार उत्तर भाऊंनी मुख्यमंत्र्यांना दिले. गावाच्या आणि शेतकऱ्यांच्या भवितव्यासाठी लढणाऱ्या लोकप्रतिनिधीच्या मागे खरं म्हणजे एकसंध गाव आणि वऱ्हाड उभा राहायला हवा होता. बाणेदार भाऊंनी पराभव स्वीकारला. चारच दिवसात आमदार निवासातील खोली सोडली. त्यांचे काहीच बिघडले नाही कारण ते घडले होते. बिघडले अमरावतीचे, विदर्भाचे कारण विदर्भाच्या, वऱ्हाडच्या प्रश्नांवर प्राणांतिक बाजी लावणारा लोकप्रतिनिधी अडाणी लोकांनी नाही तर पदवीधर म्हणवणाऱ्यांनी गमावला होता. आपल्या व्यक्तिगत इच्छा -आकांक्षा जाळून टाकून, पदप्रतिष्ठांवर मात करून भाऊ आयुष्यभर लढले . एखादी दंतकथा वाटावी असे त्यांचे व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवन होते. सात दशकांच्या सार्वजनिक जीवनात लांच्छनाचा एकही शिंतोडा त्यांच्या शूचिभूर्त आयुष्यावर कधी पडला नाही. मंत्रिपदासाठी, राजकीय लाभासाठी त्यांनी कधी कोणाचा उंबरठा झिजविला नाही. आपल्या तत्वांशी कधी तडजोड केली नाही. अशी देवस्वरूप माणसं समाजात आपोआप, दररोज निर्माण होत नाहीत. त्यासाठी आयुष्याचे मोल द्यावे लागते. तेव्हा मूल्य निर्माण होते.

तत्त्वांसाठी विषाचा प्याला प्राशन करणारा सॉक्रेटिस, राजपुत्राचे प्राण वाचविण्यासाठी आपल्या मुलाचे बलिदान देणारी पन्नादायी, स्वकीयांचे राज्य प्रस्थापित होईपर्यंत कंदमूळ खाऊन जगणारे आणि गवतावर झोपणारे महाराणा प्रताप, स्वतःच्या मनगटावर राज्य प्रस्थापित करूनही 'हे राज्य रयतेचं आहे' हे मूल्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज ही भारतीय समाज जीवनातील शाश्वतमूल्यं आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी, तडफडणा ऱ्या गावासाठी, शेतकऱ्यांची शेती वाचली पाहिजे म्हणून त्यांच्या भवितव्यासाठी स्वतःच्या आमदारकी चीही बाजी लावणारे आणि सदसदविवेक बुद्धीवर विश्वास ठेवणारे निष्कांचन बीटीभाऊ हे अलीकडच्या काळातील मूल्य आहे. ही मूल्यं जपणं, ती वाढविणं ही समाजाची जबाबदारी असते आणि त्यावरच समाजाची पोतही अवलंबून असते. बीटीभाऊ राजकारण, समाजकारणात एक दीपस्तंभ निर्माण करून गेले. आता पाळी समाजाची आहे. या महान व्यक्तिमत्त्वास श्रद्धांजली अर्पण करताना डोळे पाणावतात ते यासाठीच. भाऊंच्या शाश्वत कार्याला अंत:करणपूर्वक सलाम!

मो.९४२३१२४६०८

## संक्षिप्त



### आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

अमरावती- आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त Sushma's Yoga Space येथे विशेष योग सत्र व विविध योगा ॲक्टिव्हिटीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात महिला, तसेच लहान मुलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत योगाच्या माध्यमातून आरोग्य, आनंद आणि सकारात्मकतेचा संदेश दिला. कार्यक्रमाची सुरुवात प्राणायाम, ध्यान व विविध योगासनांनी करण्यात आली. सहभागी सदस्यांना योगाचे शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्यावर होणारे फायदे समजावून सांगण्यात आले. नियमित योगाभ्यासामुळे तणाव कमी होऊन शरीर आणि मन निरोगी राहते, असा संदेश यावेळी देण्यात आला.Sushma's Yoga Space च्या संचालिका सुषमा बोरकर यांनी सांगितले की,'योग हा केवळ व्यायाम नसून जीवन जगण्याची एक सकारात्मक पद्धत आहे. निरोगी शरीर, शांत मन आणि आनंदी जीवनासाठी प्रत्येकाने योगाला आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवावे.' यावेळी उपस्थितांनी 'एक निरोगी व्यक्ती –एक निरोगी कुटुंब – एक निरोगी समाज' हा संकल्प घेतला. कार्यक्रमात सहभागी झालेल्या नागरिकांनी योगाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी पुढील काळातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली.'स्वतः निरोगी व्हा, इतरांनाही निरोगी बनवा; योगाच्या माध्यमातून सकारात्मक बदलाची सुरुवात आजच करा.'योग दिनानिमित्त आयोजित या उपक्रमामुळे परिसरात आरोग्य, सकारात्मकता आणि एकात्मतेचा संदेश पोहोचला असून अनेकांनी Sushma's Yoga Space सोबत जोडून नियमित योगाभ्यास करण्याची इच्छा व्यक्त केली.



### आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग शिबीर उत्साहात

**अचलपूर-**कांडली येथील प्रसिद्ध श्री साई मंदिर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात संपन्न झाला.यावेळी मेळघाट मतदार संघाचे आमदार केवलराम काळे ,अचलपुर नगर परिषद नगराध्यक्ष रूपाली माथने यांची प्रमुख उपस्थितीती होती.यावेळी योग प्रशिक्षक यांनी जीवनात योगासनाचे महत्व,जीवनशैली यावर मार्गदर्शन केले.यावेळी मोठ्या संख्येने भाजपा पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते ,नागरिक उपस्थितीत होते. यावेळी श्याम तांडील ,साहेबराव काठोले,प्रसाद देशपांडे,प्रसन्न काठोले,चेतन कान्हेकर आदी उपस्थितीत होते.

# जुळ्या शहरातील अनेक भागात गढूळ पाण्याचा पुरवठा

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात, नगर परिषद पाणीपुरवठा विभागाचे दुर्लक्ष

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात काही दिवसापासून गढूळ पाण्याचा पाणीपुरवठा होत असल्याने या पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न चव्हाट्यावर आला आहे. यामुळें नागरिकांना नाईलाजाने माती मिश्रीत पिवळसर पाणी प्राशन करावे लागत आहे. अचलपूर नगर परिषद पाणीपुरवठा विभागाच्या उदासीन धोरणाबाबत नागरिकांमध्ये तीव्र रोष व्यक्त होत आहे.

याबाबत अनेक वृत्त विवीध वर्तमानपत्रात प्रकाशित होवून सुद्धा अचलपूर नगर परिषद प्रशासनाने योग्य कारवाई केलेली नाही.

जुळ्या शहरात नागरिकांना सुरळीत व शुद्ध पाणीपुरवठा करण्यामध्ये अचलपूर नगर परिषद अनेक कारणामुळे अपयशी ठरलेली आहे. त्या मध्येच गेल्या काही दिवसांपासून गढूळ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असल्याने अचलपूर नगर परिषद पाणीपुरवठा विभागाच्या



कार्यप्रणालीवर अनेक प्रश्न निर्माण होत आहे.

जुळ्या शहरात अनेक भागात होणारा पाणी पुरवठा हा अत्यंत गढूळ आणि चिखलयुक्त होत आहे. याचा विपरित परिणाम

> गेल्या अनेक वर्षांपासून अचलपूर नगर परिषद प्रशासनाने माळवेशपुरा परिसरातील समस्या वाऱ्यावर सोडली आहे.यामुळे माळवेशपुरा परीसर विविध समस्याचे माहेरघर बनले आहे.मुख्य रस्ते व नाल्याची दुरावस्था झाली आहे.आणि या भागात नागरिकांना गढुळ पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये तीर्व रोष व्यक्त होत आहे.

जुळ्या शहरवासीयांच्या आरोग्यावर होत आहे. नागरिकांना पोटदुखी, काविळ, चक्कर येणे यासारखी आजारांचा सामना करावा लागत आहे. यामुळें नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करून खाजगी आरो पाणी विकत घ्यावे लागत आहे. या संदर्भात अचलपूर नगर परिषद प्रशासनाने जुळ्या शहरात अनेक भागात होणाऱ्या गढूळ पाण्याचा पुरवठा सुरळीत करण्याबाबत योग्य पावले उचलण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# आईने किडनी देऊन मुलाला दिला पुनर्जन्म

## पीडीएमसीमध्ये यशस्वी किडनी प्रत्यारोपण

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक डॉ पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय अमरावती येथे आईने आपल्या १९ वर्षीय मुलाला प्रेमापोटी किडनी दान करून मुलाला पुनर्जन्म दिला. बुलढाणा जिल्हा चिखली तालुक्यातील मंगरूळ नवघरे या गावात राहणारा १९ वर्षीय आदिल खा नसीब खा पठाण याला गेल्या सहा महिन्यापासून, बीपी वाढणे, श्वास भरून येणे अशा सारखा त्रास होत होता. स्थानिक पातळीवर तपासणी केल्यानंतर आदिलच्या दोन्ही किडण्याबरोबर काम करीत नाही. असे निदान करण्यात आले. या परिस्थितीत तो अकोला येथील खाजगी रुग्णालयात डायलिसिस घेत होता. परंतु यावर किडनी प्रत्यारोपण हा पर्याय असल्याचे सांगून डॉक्टरांनी त्याला अमरावती शहरातील नेफरोलॉजिस्ट डॉ प्रणित काकडे यांच्याकडे पुढील उपचार घेण्याची सुचविले. डॉ प्रणित काकडे यांच्या देखरेखी खाली उपचार घेत असताना, आदिलची आई अंजुम परवीन नसिब खा पठाण ही आपली एक किडनी मुलाला काही त्रास होणार नाही या निर्धाराने किडनी दान करण्याचा आईने निर्णय घेतला.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ अनिल देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ पवन टेकाडे, डॉ सोमेश्वर निर्मळ, यांच्या मार्गदर्शनाखाली यूरोलॉजिस्ट डॉ राहुल पोटोडे, डॉ विक्रम देशमुख, डॉ विशाल बाहेकर, डॉ राहुल घुले, डॉ प्रतीक चिरडे, डॉ आचल सिंगल, नेपरोलॉजिस्ट डॉ प्रणित काकडे, बधिरिकरण तज्ञ डॉ रोहित हातगावकर, डॉ उत्कर्षा भोजने, डॉ विद्या ईसळ, डॉ किरण हिरुळकर, डॉ रिकेश म्हात्रे, डॉ सलोनी देशमुख यांचा मोठा मोलाचा वाटा होता. पाच ते सहा तास चाललेली ही शस्त्रक्रिया यशस्वी पार पडली.

रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक यांचे समुपदेशन, वैद्यकीय चाचण्या, पोलीस वेरिफिकेशन, कायदेशीर बाबीची पूर्तता व इतर कागदपत्राची पूर्तता करून प्राधिकरण समिती समोर प्रस्ताव सादर करणे व प्रत्यक्ष मुलाखती द्वारे शस्त्रक्रियेला मान्यता प्राप्त करून घेणे. यात ट्रान्सप्लांन्ट कॉर्डिनेटर सतीश वडनेरकर यांची महत्त्वाची भूमिका होती. ही अत्यंत महागडी असलेली शस्त्रक्रिया शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत करण्यात आली. तसेच शस्त्रक्रिया पूर्वे देखील बऱ्याच चाचण्या रुग्णालयास्तरावरून मोफत करण्यात आल्यामुळे रुग्णाला बराच दिलासा मिळाला.

प्राधिकरण समिती अध्यक्ष डॉ अनिल देशमुख, सदस्य डॉ टी एस वारे, सहायक संचालक, आरोग्य सेवा अकोला, सिव्हिल सर्जन डॉ विनोद पवार, सेवानिवृत्त उपसंचालक ,डॉ अविनाश लव्हाळे, एनजीओ सदस्य आय एम ए अध्यक्ष डॉ दिनेश वाघाडे, डॉ शुभांगी वर्मा, डॉ पवन टेकाडे ,डॉ मिलिंद जगताप, डॉ किशोर बनसोड यांनी रुग्ण डोनर व नातेवाईक यांची प्रत्यक्ष मुलाखती द्वारे संवाद साधून व कागदपत्राची पडताळणी करून शस्त्रक्रियेला मान्यता दिली. शस्त्रक्रिया दरम्यान ओटीमध्ये परिचारिका



संध्या वाघमारे, प्रियांका मैंद, सुमित्रा गाडगे, मोहिनी गोहत्रे, गंगा पाटील, राणी खेकडे, आशिष बोकळे वैभव नासरे, प्रतीक्षा भिसेकर, अरविना जांभेकर, स्नेहल खरात, दीप खांडेकर यांनी काम पाहिले. व पुढील दहा दिवस किडनी अतिदक्षता विभागात शीतलं अंबरते, दामिनी ढवळे, स्मिता वावरे, शशिकांत ढिवर, नेहा घोरपडे, ममता चव्हाण,शिवानी टापरे, रुद्राणी खंडारे, वनशिका परिमल हे कार्यरत राहणार आहेत.रुग्णालय व्यवस्थापक डॉ श्रीकांत फुटाणे, मेट्रण चित्रा देशमुख, एम एस डब्ल्यू अनिकेत माहोरे, सहाय्यक आरती मोरांडे यांची शस्त्रक्रियापूर्व तयारीत मोलाचे सहकार्य होते. गोपाल सावरकर, उमेश सोनवणे, मंगेश गुलदे, वर्षा गाढवे,दर्शना खडसे, आकाश हंबर्डे, अशोक खुरकटे यांनी सहाय्यक म्हणून कर्तव्य पार पाडले.

# अंजनगाव बारी येथे वारंवार वीज खंडित

## भाजपचा तीव्र आंदोलनाचा इशारा

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

अंजनगाव बारी व परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून वारंवार होत असलेल्या वीज खंडितामुळे नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. सततच्या वीजपुरवठा खंडित होण्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून शेती, व्यवसाय तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही विपरीत परिणाम होत आहे.

या गंभीर समस्येबाबत भारतीय जनता पार्टीचे नेते रोशन पुनिया यांनी महावितरण प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. वारंवार वीजपुरवठा खंडित होणे आणि त्याबाबत कोणतीही पूर्वसूचना अथवा समाधानकारक माहिती न देणे हे महावितरणच्या निष्काळजी कारभाराचे द्योतक असल्याचा आरोप त्यांनी केला.

रोशन पुनिया यांनी महावितरण प्रशासनाला स्पष्ट इशारा देत सांगितले की, अंजनगाव बारी व परिसरातील नागरिकांना अखंडित व नियमित वीजपुरवठा मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. मात्र, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांना रोजच्या रोज मनस्ताप सहन करावा लागत आहे.पुढील तीन दिवसांत अंजनगाव बारी व परिसरातील वीजपुरवठा नियमित व सुरळीत करण्यात आला नाही, तर भारतीय जनता पार्टीच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल. या आंदोलनातून उद्भवणाऱ्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी महावितरण प्रशासनाची राहील,' असा इशारा रोशन पुनिया यांनी दिला आहे. अंजनगाव बारी व परिसरातील नागरिकांच्या समस्या लक्षात घेऊन महावितरण प्रशासनाने तातडीने योग्य उपाययोजना करून नियमित वीजपुरवठा सुरू करावा, अशी मागणी भारतीय जनता पार्टीच्या वतीने करण्यात आली आहे.

# संपूर्ण जिल्ह्यात जागतिक योग दिन उत्साहात

## नगरपरिषदेच्या वतीने योग दिन

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनाचे भव्य आयोजन रविवारी करण्यात आले. नगरपरिषद शाळेच्या मैदानावर झालेल्या या कार्यक्रमात शहरातील नागरिक, सामाजिक संघटना व सर्व वयोगटातील योगप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत योगसाधना केली. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विजय लोहकरे यांच्या मार्गदर्शनाखाली योग दिनाची जय्यत तयारी करण्यात आली होती. योगाभ्यासासाठी मॅट, ध्वनिक्षेपण यंत्रणा व प्रशिक्षकांची व्यवस्था चोख ठेवण्यात आली होती. मुख्याधिकारी विजय लोहकरे यांनी स्वतः उपस्थित राहून नागरिकांना प्रोत्साहन दिले.



विशेषकरून उपविभागीय पोलिस अधिकारी मनिष ठाकरे, माजी आमदार रमेश बुंदिले व शहरातील विविध सामाजिक संस्था, शाळा-महाविद्यालयांचे विद्यार्थी, महिला बचत गट व ज्येष्ठ नागरिक संघ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी योग गुरू भुपेद्र भेलांडे, संगिता मेन, बोंद्रे गुरुजी यांनी दहा ते पंधरा वर्षांपासून योग करण्याचे नागरिकांना प्रदक्षिण देत असल्याने त्यांचा नगरपरिषद प्रशासनातर्फे सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला खा. बळवंत वानखडे आमदार गजानन लवटे उपस्थित राहू शकले नसले तरी त्यांनी व्हिडिओ कॉल व्दारे सर्वांना शुभेच्छा दिल्या.तर कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना योगाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व पटवून देण्यात आले.

मुख्याधिकारी विजय लोहकरे यांच्या कुशल प्रशासकीय नियोजनाबद्दल, तसेच नगराध्यक्ष अविनाश गायगोले व उपनगराध्यक्षा प्रियंका मालठाणे, तसेच सभापती सह नगरसेवकांनी दाखवलेल्या नेतृत्वाबद्दल व प्रत्यक्ष सहभागाबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले.या उपक्रमाला लोकप्रतिनिधींनीही भरभरून प्रतिसाद दिला. नगराध्यक्ष अविनाश गायगोले व उपनगराध्यक्षा प्रियंका मालठाणे यांनी स्वतः योगासने करून नागरिकांसमोर आदर्श ठेवला. त्यांच्यासह नगरपरिषदेच्या सर्व सदस्यांनी योगसत्रात सक्रिय सहभाग नोंदवला. नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी योगाचे महत्त्व पटवून देताना दररोजच्या जीवनात योगाचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. उपनगराध्यक्षा प्रियंका मालठाणे यांनी महिला व मुलींनी आरोग्यासाठी पुढाकार घ्यावा, असे सांगत कौतुक केले.

## शिवाजी आयडियल इंग्लिश स्कूल

**अमरावती/का.प्र.**

शिवाजी आयडियल इंग्लिश स्कूल, अमरावती येथे जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये शाळेतील सुमारे ५०० विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाची सुरुवात शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पुतळ्याला हरार्पन करून कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित शिवाजी आयडियल इंग्लिश स्कूल च्या मुख्याध्यापिका वैशाली प्र.ठाकरे, शिवाजी बहुद्देशीय शाळेचे मुख्याध्यापक प्रसाद देशमुख, पर्यवेक्षिका शारदा प्र.फुले, क्रीडा शिक्षक अमर गोपाल खंडारे,सागर दिलीपराव शेंबेकर,जयस्वाल सर एनसीसी ऑफिसर ,प्रशांत इंगोले एन.सी.सी. ऑफिसर कैप्टन स्वामी सर, योग दिनाच्या महत्त्वाविषयी मार्गदर्शनाने करण्यात आली.त्यानंतर




विद्यार्थ्यांनी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध योगासने, प्राणायाम व ध्यानाचा सराव केला. योगामुळे शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते,तसेच एकाग्रता व आत्मविश्वास वाढतो, याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.शाळेचो मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थ्यांसोबत योगाभ्यास करून योगाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण सहभाग घेत कार्यक्रम यशस्वी केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयुरी पाटील तर आभार प्रदर्शन कल्याणी ठाकरे यांनी केले.या प्रसंगी शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचे विशेष योगदान लाभले.श्री शिवाजी आयडियल इंग्लिश स्कूल, अमरावती मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यक्रम यशस्वितकरिता विशेष परिश्रम घेतले.

## आज आंतरराष्ट्रीय धावपटू दिलीप पाटील आकाशवाणीवर

**अमरावती-**आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या निमित्ताने



दि.२२ सकाळी १० वाजता 'एक धाव निरोगी आयुष्याकडे' या विषयावर सेवानिवृत्त विक्रीकर उपायुक्त आणि आंतरराष्ट्रीय धावपटू दिलीप पाटील यांची मुलाखत आकाशवाणीच्या अमरावती केंद्रावरून प्रसारित केली जाणार आहे. नितीन भट यांनी त्यांच्याशी संवाद साधला आहे. 'नमस्कार अमरावती' या कार्यक्रमात ही मुलाखत प्रसारित केली जाईल. कार्यक्रमाची निर्मिती आकाशवाणी अमरावती केंद्राची असून सादरकर्ते भैय्यालाल टेकाम आहेत. हा कार्यक्रम आकाशवाणी अमरावती केंद्राबरोबरच News On Air या मोबाईल ॲपवर देखील ऐकता येईल. मुलाखतीचा आस्वाद घेण्याचे आवाहन अमरावती आकाशवाणीचे कार्यक्रम प्रमुख भय्यालाल टेकाम आणि कार्यक्रम अधिकारी आशिष गावंडे यांनी केले आहे.

## पी.आर.पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप

**अमरावती-** आंतरराष्ट्रीय स्तरावर साजऱ्या होणाऱ्या जागतिक योग दिनानिमित्त पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करून योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षीच्या 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' (Yoga for Healthy Ageing) या मुख्य संकल्पनेला अनुसरून आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना, शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना योगाचे महत्त्व पटवून देण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात योगाच्या महत्त्वाविषयी मार्गदर्शनाने करण्यात आली. आधुनिक धावपळीच्या जीवनशैलीत शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्वास्थ्य आणि भावनिक संतुलन राखण्यासाठी योग अत्यंत उपयुक्त असल्याचे यावेळी सांगण्यात आले. तसेच नियमित योगाभ्यासामुळे विविध आजारांपासून संरक्षण मिळते, तणाव कमी होतो आणि निरोगी व आनंदी जीवन जगण्यास मदत होते, असे मत व्यक्त करण्यात आले. यानंतर उपस्थितांच्या सहभागातून विविध योगासने, प्राणायाम तसेच ध्यानधारणेचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत योगाभ्यास केला. योगाच्या माध्यमातून निरोगी



शरीर, शांत मन आणि सकारात्मक विचारसरणी विकसित करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

या प्रसंगी संस्थेअंतर्गत कार्यरत सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, कार्यक्रमाचे आयोजक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी योग हा केवळ एक दिवसापुरता मर्यादित न ठेवता तो दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनविण्याचा संकल्प केला.कार्यक्रमाच्या शेवटी निरोगी समाजनिर्मितीसाठी योगाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे अधोरेखित करण्यात आले. योगाच्या माध्यमातून शारीरिक, मानसिक व सामाजिक आरोग्य सुदृढ ठेवण्याचा संदेश देत कार्यक्रमाची यशस्वी सांगता करण्यात आली.

## राजर्षी शाहू सायन्स कॉलेज

चांदुर रेल्वे - स्थानिक राजर्षी शाहू सायन्स कॉलेज येथे राष्ट्रीय छात्र सेना, शारीरिक शिक्षण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' या थीमवर साजरा करण्यात आला.सदर कार्यक्रमाला राहुल खोपे यांनी सहज योग च्या माध्यमातून शरीरातील विविध भवचक्र व त्यांच्या कार्याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. तसेच योगाच्या माध्यमातून त्याची अनुभूती सुद्धा करून दिली.याप्रसंगी शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक प्रा. असलम खान यांनी विविध योगासने करून दाखविले व विद्यार्थ्यांना योगासनाचे महत्त्व पटवून दिले. तसेच कॅडेट शौर्य रंगारी यांनी विविध आसने करून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. एस एस पाढेण,राष्ट्रीय छात्र सेना यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पराग वडनेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता प्रा.डॉ. असलम खान, संचालक शारीरिक शिक्षण विभाग प्रा. डॉ. गजानन संतापे, कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना व प्रा. डॉ. एस एस पाढेन, राष्ट्रीय छात्र सेना यांनी अथक परिश्रम घेतले.सदर कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, स्वयंसेवक विद्यार्थी व एनसीसी कॅडेट मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पातुरमध्ये काँग्रेसचा झेंडा : नगराध्यक्षपदी हिदायत खा उर्फ इद्दू पैलवान विजयी

## विकास योद्धा मंचाशी अटीतटीच्या लढतीत विजय; शिंदे गटाला मोठा धक्का, सर्व उमेदवारांची अनामत जप्त



■ प्रतिनिधी | पातूर ■

पातुर नगरपरिषदेच्या निवडणुकीत मतदारांनी पुन्हा एकदा स्थानिक समीकरणांना प्राधान्य देत काँग्रेसवर विश्वास दाखविला आहे. नगराध्यक्षपदाच्या प्रतिष्ठेच्या लढतीत काँग्रेसचे उमेदवार हिदायत खा उर्फ इद्दू पैलवान यांनी विकास योद्धा मंचाचे उमेदवार सय्यद बुऱ्हाण यांचा पराभव करून नगराध्यक्षपदावर विजयाची मोहोर उमटविली. या विजयामुळे काँग्रेस-उबाठा युतीला मोठे राजकीय बळ मिळाले असून पातुरच्या राजकारणात नव्या समीकरणांची नांदी झाल्याची चर्चा सुरू झाली आहे.

नगराध्यक्षपदासह नगरपरिषदेच्या २० जागांसाठी झालेल्या निवडणुकीची मतमोजणी रविवारी पार पडली. निकालातून काँग्रेसने ८ जागा जिंकत आपले वर्चस्व कायम राखले. विशेष म्हणजे विकास योद्धा मंचालाही ८ जागा मिळाल्याने नगरपरिषदेत कोणत्याही एका गटाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने २ जागा जिंकल्या असून भाजपालाही २ जागांवर समाधान मानावे लागले. या निवडणुकीतील सर्वाधिक लक्षवेधी बाब म्हणजे शिवसेना (शिंदे गट) ची झालेली दयनीय कामगिरी. नगराध्यक्षपदाच्या उमेदवारासह सर्व उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाल्याने शिंदे गटाला पातुरमध्ये मोठा राजकीय धक्का बसल्याचे मानले जात आहे. राज्यातील सत्ताधारी पक्षाचा घटक असूनही मतदारांनी त्यांच्याकडे पाठ फिरवल्याचे चित्र या निकालातून स्पष्ट झाले आहे.

### स्थानिक राजकारणातील बदलत्या प्रवाहांचे प्रतिबिंब

पातुरची निवडणूक केवळ नगराध्यक्षपदाची नव्हती, तर ती स्थानिक राजकीय नेतृत्व, सामाजिक समीकरणे आणि आघाड्यांच्या ताकदीचीही परीक्षा होती. काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांची युती एकीकडे मैदानात होती, तर विकास योद्धा मंचाने राष्ट्रवादी काँग्रेस, एमआयएम आणि वंचित बहुजन आघाडीच्या साथीने पर्यायी आघाडी उभी केली होती. त्यामुळे निवडणूक बहुरंगी आणि बहुकोनी झाली होती. विकास योद्धा मंचाने ८ जागांवर विजय मिळवत आपली ताकद दाखवून दिली असली तरी नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत मिळालेला पराभव त्यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे. दुसरीकडे काँग्रेसने नगराध्यक्षपद जिंकून राजकीय नेतृत्वावर आपली पकड कायम असल्याचे सिद्ध केले आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, पातुरच्या निकालाने स्थानिक पातळीवर काँग्रेसची संघटनात्मक ताकद अधोरेखित केली असून आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी हा निकाल महत्त्वाचा संकेत मानला जात आहे. विशेषतः शिंदे गटाच्या अपयशामुळे आणि विकास योद्धा मंचाच्या उदयामुळे अकोला जिल्ह्यातील राजकीय समीकरणांमध्ये नव्या चर्चांना तोंड फुटले आहे.

### नगरपरिषदेत सत्तास्थापनेची उत्सुकता

नगरपरिषदेत काँग्रेस आणि विकास योद्धा मंच यांच्याकडे प्रत्येकी ८ जागा आहेत. उबाठा गटाचे २ आणि भाजपाचे २ सदस्य निर्णायक भूमिकेत राहणार असल्याने आगामी काळात सत्तास्थापनेसाठी राजकीय हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे. नगराध्यक्षपद काँग्रेसकडे गेले असले तरी नगरपरिषदेतील सत्तेचे गणित अद्याप पूर्णपणे स्पष्ट झालेले नाही. निकाल जाहीर होताच पातुर शहरात काँग्रेस व उबाठा सेनेच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. फटाक्यांची आतषबाजी, गुलालाची उधळण आणि विजयाच्या घोषणांनी शहरातील वातावरण ढवळून निघाले. नगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर हिदायत खा उर्फ इद्दू पैलवान यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू असून समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



### विजयी उमेदवार

**काँग्रेस :** शितल प्रवीण पोहरे, मोहम्मद शाकीर मोहम्मद साबीर, सुनिता साहेबराव वाघमारे, साबा अहमद खान अझरखान, सुमया सदर शेख उस्मान, मोहम्मद मेहता अब्दुल रहुफ, ममता राजेश खोडे, हमीदाबी.

**विकास योद्धा मंच :** डॉ. सय्यद वसीम, बुशरा अंजुम मोहम्मद बाबर, साजिया परवीन मोहम्मद कैसर, कंबर जमा खान आदिल खान, मोहम्मद फैज मोहम्मद मकसूद, शरबत जमीन सय्यद मुजाहिद इकबाल, सय्यद मुजम्मिल हुसेन, साहिस्ता फिरदोस मोहम्मद इरफान.

**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)** : आनंदा रामभाऊ तायडे, अजय गजानन पाटील.

**भाजप :** अश्विनी सुनील पाटील, तुळसाबाई राजाराम गाडगे.

# हिवरखेड पोलिसांची कारवाई; बॅटरी चोरी प्रकरणी दोघांना अटक

## १.३० लाखांचा मुद्देमाल जप्त

■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

ट्रॅक्टर व हार्वेस्टरमधील बॅटऱ्या चोरी करणाऱ्या दोन आरोपींना हिवरखेड पोलिसांनी शिताफीने अटक करून १ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे परिसरातील चोरीच्या घटनांवर आळा बसण्यास मदत होणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंगणी येथील प्रवीण एकनाथ कोरडे यांनी १७ जून रोजी आपला ट्रॅक्टर व हार्वेस्टर गावातील मोकळ्या प्लॉटमध्ये उभा केला होता. दरम्यान, अज्ञात चोरट्यांनी ट्रॅक्टरमधील एक व हार्वेस्टरमधील दोन अशा एकूण तीन बॅटऱ्या चोरून नेल्या. चोरीस गेलेल्या मालाची किंमत सुमारे १५ हजार रुपये होती. याप्रकरणी हिवरखेड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३५२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.



गुन्ह्याचा तपास सुरू असताना हिवरखेड पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, चोरीचा माल घेऊन दोन संशयित आरोपी ऑटोरिक्षातून गोर्धा फाटा परिसरातून हिवरखेडकडे येत आहेत. माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून ऑटो अडविला.

तपासादरम्यान अब्दुल शहीद ताहेर खान (रा. अकोट) व सोफिया परवीन शेख हमीद (रा. इंदिरानगर, हिवरखेड) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून फ्लेक्स, अमरॉन, सन आणि पॉवर कंपनीच्या एकूण चार बॅटऱ्या, चोरीचा माल वाहतुकीसाठी वापरण्यात आलेला एमएच-४९ ई-५२७६ क्रमांकाचा ऑटो तसेच ओप्पो कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत १ लाख ३० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. हिवरखेड पोलीस ठाण्याचे ठाणेदार सचिन पाटील, पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रमोद चव्हाण आणि पोलीस कर्मचारी योगेश इंगळे यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

# सावरगावात रात्री मुरूम वाहतूक; सकाळी रस्त्याच्या कामात वापर?

## पेव्हर ब्लॉक कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह; महसूल विभागाच्या नुकसानीची चर्चा

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील अतिदुर्गम सावरगाव येथे सुरू असलेल्या पेव्हर ब्लॉक कामांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. रात्रीच्या अंधारात मुरूमाची वाहतूक करून पहाटेच्या सुमारास तो रस्त्याच्या कामात वापरला जात असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. या प्रकारामुळे महसूल विभागाचे आर्थिक नुकसान होत असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.



### अधिकारी दुर्गम भागाकडे फिरकत नसल्याचा आरोप

सावरगाव हे अतिदुर्गम गाव असल्याने संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी नियमितपणे भेट देत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. अभियंते प्रत्यक्ष पाहणीसाठी येत नसल्याने पेव्हर ब्लॉकचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याची तक्रार आहे. दुसरीकडे तलाठी स्तरावर देखरेख नसल्यामुळे रात्रीच्या वेळी मुरूम वाहतुकीसारखे प्रकार बिनधास्तपणे सुरू असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे विकासकामांच्या दर्जासह महसूल विभागालाही फटका बसत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

ग्रामस्थांच्या माहितीनुसार, सावरगाव ते घाटबोरी मार्गावरील झोपडपट्टी परिसरात दोन ठिकाणी पेव्हर ब्लॉकचे काम सुरू आहे. या कामांसाठी रात्रीच्या वेळी मुरूमाची वाहतूक केली जात असून सकाळी त्याचा फैलाव करून काम पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे मुरूमाचा स्त्रोत, वाहतुकीची परवानगी आणि वापराची वैधता याबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, पेव्हर ब्लॉकचे काम सुरू करण्यापूर्वी आवश्यक खोदकाम व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण होणे अपेक्षित असते. मात्र पावसाळ्यापूर्वी घाईघाईने काम पूर्ण करून देयके काढण्याच्या उद्देशाने थातूरमातूर काम केले जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. यामुळे कामाच्या गुणवत्तेबाबतही शंका व्यक्त केली जात आहे. नियमांनुसार अशा विकासकामांसाठी संबंधित विभागाच्या अभियंत्यांची प्रत्यक्ष पाहणी, तांत्रिक मंजुरी तसेच कामाची माहिती देणारा अंदाजपत्रक फलक लावणे आवश्यक असते. मात्र संबंधित ठिकाणी असा कोणताही फलक दिसून येत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. तसेच अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती नसल्याने कामाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संपूर्ण प्रकाराची सखोल चौकशी करून मुरूम वाहतुकीची सत्यता तपासावी, महसूल विभागाचे नुकसान झाले असल्यास संबंधितांकडून वसुली करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# अकोटच्या ग्रामीण भागातून गुटखा गायब

## कारवाईच्या धास्तीने विक्रेत्यांनी ओढला हात?

### युवकांच्या आरोग्यासाठी दिलासादायक चित्र; मात्र ही मोहीम तात्पुरती की कायमची, यावर प्रश्नचिन्ह

■ प्रतिनिधी | अकोट ■

अनेक वर्षांपासून राज्यात गुटखाबंदी अस्तित्वात असतानाही ग्रामीण भागात राजरोसपणे सुरू असलेली गुटख्याची विक्री अचानक ठप्प झाल्याचे चित्र अकोट तालुक्यात दिसून येत आहे. गेल्या काही दिवसांपासून तालुक्यातील अनेक गावांमध्ये गुटखा सहज उपलब्ध होत नसल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य, समाधान आणि उत्सुकता अशा मिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. अवैध व्यवसायांवर कठोर कारवाईचे संकेत मिळाल्यानंतर गुटखा विक्रेत्यांनी सावध भूमिका घेत विक्री थांबवल्याची चर्चा ग्रामीण भागात रंगू लागली आहे.

राज्यात गुटखाबंदी लागू झाल्यापासून प्रत्यक्षात अनेक ठिकाणी तिची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची टीका सातत्याने होत होती. ग्रामीण भागातील किराणा दुकाने, पानटपऱ्या आणि इतर छोट्या विक्री केंद्रांवर गुटखा सहज उपलब्ध होत असल्याने बंदी केवळ कागदोपत्री असल्याचा आरोप केला जात होता. मात्र अकोट तालुक्यात गेल्या काही दिवसांत परिस्थितीत अचानक बदल झाल्याचे दिसून येत आहे. अनेक गावांमध्ये गुटख्याचा साठा उपलब्ध नसल्याने सेवन करणाऱ्यांची मोठी गैरसोय होत असून काही जणांना तो मिळविण्यासाठी इतर भागांचा आधार घ्यावा लागत असल्याचे सांगितले जात आहे. ग्रामीण भागातील व्यापाऱ्यांमध्येही सध्या भीतीचे वातावरण असल्याची चर्चा आहे. पोलीस प्रशासनाकडून अवैध व्यवसायांविरोधात कठोर भूमिका घेतली जाणार असल्याचे संकेत मिळाल्यानंतर अनेक विक्रेत्यांनी गुटखा विक्रीपासून अंतर ठेवण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. विशेषतः कठोर प्रशासनिक कार्यपद्धतीसाठी ओळखल्या जाणाऱ्या पोलीस अधिकारी तुकाराम मुडे यांच्या नावाभोवती निर्माण झालेल्या प्रतिमेचाही या घडामोडींवर परिणाम झाल्याचे स्थानिक स्तरावर सांगितले जात आहे.दरम्यान, गुटखा विक्री बंद झाल्याच्या या परिस्थितीचे अनेक नागरिकांनी स्वागत केले आहे. युवकांमध्ये वाढत चाललेले व्यसन, शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलेली तंबाखूजन्य पदार्थांची सवय आणि त्यामुळे निर्माण होणारे आरोग्याचे गंभीर प्रश्न लक्षात घेता प्रशासनाने अशाच प्रकारे सातत्यपूर्ण कारवाई करावी, अशी मागणी पुढे येत आहे.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन हे कर्करोग, हृदयविकार, तोंडाचे विकार आणि इतर अनेक गंभीर आजारांचे प्रमुख कारण ठरत आहे. ग्रामीण भागातही या व्यसनाचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत असल्याने गुटखाबंदीची प्रभावी अंमलबजावणी ही काळाची गरज बनली आहे. त्यामुळे अकोट तालुक्यात दिसून आलेले हे चित्र आरोग्यदायी समाजाच्या दिशेने सकारात्मक पाऊल मानले जात आहे. मात्र या संपूर्ण घडामोडीत सर्वात महत्त्वाचा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. सध्या दिसत असलेली गुटख्याची टंचाई ही केवळ कारवाईच्या भीतीपोटी निर्माण झालेली तात्पुरती परिस्थिती आहे की प्रशासनाने खरोखरच अवैध विक्रीवर प्रभावी लगाम घालण्याची मोहीम हाती घेतली आहे? याचे उत्तर येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

सामाजिक कार्यकर्त्यांचे मत आहे की, केवळ अधूनमधून होणाऱ्या धाडी किंवा कारवायांनी समस्या सुटणार नाही. पुरवठा साखळीवर प्रहार, साठेबाजांवर कठोर कारवाई, नियमित तपासण्या आणि जनजागृती यांचा समन्वय साधल्यासच गुटखाबंदी यशस्वी होऊ शकते. अन्यथा काही दिवसांच्या शांततेनंतर पुन्हा अवैध विक्री सुरू होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

अकोट तालुक्यातील सध्याचे चित्र मात्र अनेकांसाठी आशेचा किरण ठरत आहे. गुटख्याच्या विळख्यात अडकणाऱ्या तरुण पिढीला वाचविण्यासाठी प्रशासनाने ही मोहीम कायमस्वरूपी स्वरूपात राबवावी आणि गुटखा विक्रीवर निर्णायक प्रहार करावा, अशी मागणी आता नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. त्यामुळे प्रशासन पुढे कोणती पावले उचलते आणि गुटखाबंदीची ही अंमलबजावणी कितपत टिकून राहते, याकडे संपूर्ण अकोट तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७८८/२०२६ — प्रोसेस नं.७३६६/२०२६
चौ.ता. २३/०७/२०२६ — दिनांक : ०९/०६/२०२६

**अर्जदार :** सैय्यद सिमरन सैय्यद साबीर रा. गौसिया मस्जिद जवळ, संजय नगर, नायगाव, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : आरती लक्ष्मण चौधरी
**पत्ता :-** रा. गौसिया मस्जिद जवळ, संजय नगर, नायगाव, ता.अकोला. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत आरती लक्ष्मण चौधरी यांचे दि. १७/०८/२०२५ रोजी मौजे तोंडगाव, ता. जि. वाशिम येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६६२/२०२६ — प्रोसेस नं.५४९७/२०२६
चौ.ता. २५/०६/२०२६ — दिनांक : २२/०४/२०२६

**अर्जदार :** मोतिराम विष्णुजि गवळी रा. पातूर नंदापूर, ता. जि. अकोला. मो. क्र. ९११२३७७९३२

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : एकनाथ विठोबा गवळी
**पत्ता :-** रा. पातूर नंदापूर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत एकनाथ विठोबा गवळी यांचे दि. १५/०३/२०२६ रोजी राहते घरी, पातूर नंदापूर, ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २५/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये. हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८३९/२०२६ — प्रोसेस नं.७४१५/२०२६
चौ.ता. २७/०७/२०२६ — दिनांक : १०/०६/२०२६

**अर्जदार :** १. पंकज भानुदास जउळकर रा. गणेश विला अपार्टमेंट, फ्लॅट क. टिर, रेणुका नगर, प्रिया टॉवर समोर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. २. मनिषा श्याम वानखडे रा. ३३२, सि.एच. वृन्दावन कॉलनी, इंदौर, इंडस्ट्रीअल स्टेट, मध्यप्रदेश. ३. प्राजक्ता महेंद्र सपकाळ रा. बालाजी नगर, डाबकी रोड, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : भावना भानुदास जउळकर
**पत्ता :-** रा. गणेश विला अपार्टमेंट, फ्लॅट क. टि २, रेणुका नगर, प्रिया टॉवर समोर, डाबकी रोड, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भावना भानुदास जउळकर यांचे दि. २१/०२/२०२६ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७८७/२०२६ — प्रोसेस नं.६७००/२०२६
चौ.ता. २५/०६/२०२६ — दिनांक : ११/०५/२०२६

**अर्जदार :** १. अभिजीत प्रल्हाद गावंडे २. स्वामी प्रल्हाद गावंडे ३. चित्रा प्रल्हाद गावंडे रा. मु. पो. म्हैसांग, ता. जि. अकोला. मो. क्र. ८६००२८२९९८

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रल्हाद वासुदेव गावंडे
**पत्ता :-** रा. मु. पो. म्हैसांग, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रल्हाद वासुदेव गावंडे यांचे दि. २१/०१/२०२६ रोजी राहते घर म्हैसांग, ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २५/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७५१/२०२६ — प्रोसेस नं.६३६२/२०२६
चौ.ता. ०९/०७/२०२६ — दिनांक : ०५/०५/२०२६

**अर्जदार :** १. प्रकाश किसनराव आठवले रा. ढगा, ता. जि. अकोला. २. विलास किसनराव आठवले रा. भिम नगर, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला. ३. संजय किसनराव आठवले रा. चुन्याच्या कारखान्या जवळ, जेतवन नगर, धोबी खदान, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : किसनराव बापुना आठवले
**पत्ता :-** रा. ढगा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत किसनराव बापुना आठवले यांचे दि. ०८/१२/२०२५ रोजी ढगा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०९/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १९५**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# अवैध रेती वाहतुकीवर पोलिसांचा मोठा दणका

## -दोन डंपरांसह ९४.४५ लाखांचा मुद्देमाल जप्त -पाच आरोपींविरुद्ध गुन्हा

**अमरावती/प्रतिनिधीः-** ब्राम्हणवाडा थडी पोलिसांनी अवैध रेती वाहतुकीविरोधात मोठी कारवाई करत दोन डंपर, रेती आणि मोबाईलसह तब्बल ९४ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी डंपर चालक, क्लिनर आणि मालक अशा पाच जणांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी जिल्ह्यातील अवैध धंदे, रेती तस्करी, गौवंश वाहतूक, हातभट्टी आणि जुगाराविरोधात कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यानुसार ब्राम्हणवाडा थडी पोलीस ठाणे, अमरावती ग्रामीण वाहतूक शाखा आणि तिवसा पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने १९ जून रोजी पहाटे विशेष गस्त मोहीम राबविली. ग्राम ब्राम्हणवाडा थडी येथील वणी पॉइंट परिसरात पहाटेच्या सुमारास दोन संशयित डंपर आढळून आले. पोलिसांनी दोन्ही वाहनांची तपासणी केली असता त्यामध्ये कन्हान नदीपात्रातील गौण खनिज रेती विनापरवाना वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले.

तपासणीदरम्यान एमएच-२७-डीटी-१२२१ या १२ चाकी टाटा डंपरमध्ये १२ ब्रास रेती आढळून आली. रेतीची किंमत १ लाख २० हजार रुपये असून डंपरची किंमत ४० लाख रुपये आहे. तसेच दोन मोबाईल फोन जप्त करण्यात आले. दुसऱ्या एमएच-४०-सीएम-८७८८ या १६ चाकी टाटा डंपरमध्ये २० ब्रास रेती आढळली. या रेतीची किंमत २ लाख रुपये असून डंपरची किंमत ५० लाख रुपये आहे. याशिवाय तीन मोबाईल फोनही जप्त करण्यात आले.



एकूण जप्त मुद्देमालाची किंमत ९४ लाख ४५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी पोलीस हवालदार मनीष देशमुख यांच्या फिर्यादीवरून मुनिफ खान मुख्तार खान (अचलपूर), रविंद्र बाबुलाल पांडे (अचलपूर), टिकाराम लेहाराम नागवंशी (वरूड), देविदास मैनू गजाम (वरूड) तसेच दोन्ही डंपरचा मालक राजू उर्फ शेख नईम शेख करीम (जरूड, वरूड) यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२), पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९ व १५, सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम कलम ३ व ७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्याय, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत जाधव तसेच ब्राम्हणवाडा थडी, तिवसा आणि वाहतूक शाखेतील पोलीस कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

# बिस्मिल्लानगरात मध्यरात्री बापलेकावर प्राणघातक हल्ला

## दोघे गंभीर जखमी



**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बिस्मल्लिानगर परिसरात मध्यरात्री घरात घुसून बापलेकावर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला केल्याची खळबळजनक घटना घडली. या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अब्दुल नाजिम अब्दुल सादिक (वय ३६) आणि त्यांचे वडील अब्दुल सादिक अब्दुल बशीर (वय ६५, दोघेही रा. बिस्मिल्लानगर, नागपुरी गेट) हे १९ जूनच्या रात्री त्यांच्या घरी असताना काही अज्ञात व्यक्तींनी घरात प्रवेश करून धारदार शस्त्राने त्यांच्यावर हल्ला केला. अचानक झालेल्या या हल्ल्यात दोघांनाही गंभीर दुखापत झाली. आरडाओरड ऐकून परिसरातील नागरिक घटनास्थळी धावले. जखमींना तातडीने उपचारासाठी अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीवर डॉक्टरांकडून लक्ष ठेवण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच नागपुरी गेट पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. जखमींच्या जबाबावरून हल्लेखोरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून वैयक्तिक वाद, जुने वैमनस्य किंवा अन्य कोणत्या कारणातून हा प्रकार घडला का, याचा तपास पोलीस करीत आहेत. दरम्यान, आरोपींचा माग काढण्यासाठी नागपुरी गेट पोलीस ठाण्याचे डीबी पथक रवाना करण्यात आले असून हल्लेखोरांना लवकरच अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. शहरात वाढत्या गंभीर गुन्ह्यांच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

# शोभानगरात युवकावर प्राणघातक हल्ला

## जखमीवर जिल्हा रुग्णालयात उपचार

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शोभानगर परिसरात एका युवकावर प्राणघातक हल्ला झाल्याची घटना समोर आली असून जखमी युवकावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, चेतन किशोर बन्सोड (वय २०, रा. गाडगेनगर) याच्यावर अज्ञात कारणावरून हल्ला करण्यात आला. हल्ल्यात तो गंभीर जखमी झाल्याने त्याला तातडीने उपचारासाठी अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच गाडगेनगर पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून जखमी युवकाचा जबाब नोंदविला. त्यानंतर मिळालेल्या तक्रारीवरून संबंधित हल्लेखोराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून वैयक्तिक वाद, जुन्या भांडणाची पार्श्वभूमी किंवा अन्य कोणते कारण आहे का, याचा शोध पोलीस घेत आहेत. परिसरातील नागरिकांकडूनही माहिती संकलित करण्यात येत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास गाडगेनगर पोलीस करीत आहेत. आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी हालचाली सुरू केल्या असून लवकरच हल्ल्याचे नेमके कारण समोर येईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयामध्ये प्रा. बी. टी. देशमुख यांना श्रद्धांजली

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथे २१ जून २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय व जागतिक योग दिनाचे आयोजन श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालया मधील कार्यरत योगा विभागाच्या वतीने योगा हॉल येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मा. विधान परिषद सदस्य तथा महाराष्ट्र प्राध्यापक संघाचे माजी अध्यक्ष प्रा. बी. टी. देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून त्यांना आदरांजली वाहिली. त्यानंतर आंतरराष्ट्रीय व जागतिक योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम प्रास्ताविक भाषण योग मार्गदर्शक डॉ. सरोजनी उंबरकर यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात दि. २७ सप्टेंबर २०१५ पासून आयुष मंत्रालय द्वारा २१ जून हा दिवस 'जागतिक योग दिन' म्हणून सर्वत्र साजरा केला जातो तसेच भारतीय योग परंपरा कशी श्रेष्ठ आहे याबाबत मार्गदर्शन केले.



लगेचच त्यांनी जागतिक योग दिनाच्या निमित्ताने आयुष मंत्रालया च्या प्रोटोकाल नुसार प्रार्थनेने योगाभ्यासाची सुरुवात करून शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सामुहिक योगासने केली. त्यामध्ये प्रात्यक्षिक सत्रात खडे आसन, बैठे आसन पोटावरची आसन, पाठीवरचे आसन, मान, खांदे, कंबर, गुढगे आदींचे सूक्ष्म योगिक व्यायाम शिकवले तसेच प्राणायाम, ध्यानाभ्यास, अनुलोम विलोम, फुप्फुसाचे व्यायाम, सूर्यनमस्कार इत्यादींबाबत मार्गदर्शन व प्रात्यक्षिक करून घेतले. करून विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सामूहिक योगाभ्यास करून योगाचे महत्त्व जाणून घेतले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुभाष गावंडे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात आंतरराष्ट्रीय योग दिनाचे महत्त्व विशद केले. योग ही भारतीय संस्कृतीची जगाला अमूल्य देणगी असून निरोगी व संतुलित

## आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

जीवनासाठी योग आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच प्रा. बी. टी. देशमुख यांच्या शैक्षणिक, सामाजिक व संघटनात्मक कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करताना उच्च शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले. त्यांच्या निधनाने शैक्षणिक क्षेत्राची मोठी हानी झाल्याची भावना याप्रसंगी त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन डॉ.सरोजनी उंबरकर यांनी केले व प्रात्यक्षिके महाविद्यालयाच्या बीपीएड या वर्षात शिकत असलेल्या अभय वर्मा, नूतन दिव्या, आचल, नेहा, नीता गौरी यांनी करून दाखवली

यावेळी आयक्यूएसी समन्वयक, वरिष्ठ प्राध्यापिका डॉ. पुष्पलता देशमुख महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# ब्राह्मणवाडा थडी येथे 'आंतरराष्ट्रीय योग दिन' उत्साहात

**ब्राह्मणवाडा थडीः** स्थानिक श्री नागनाथ विद्यालय, ब्राह्मणवाडा थडी येथे आज २१ जून रोजी 'आंतरराष्ट्रीय योग दिन' मोठ्या उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. 'निरोगी काया, आनंदी मन' हा संदेश देत विद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे योगासने केली.




कार्यक्रमाच्या सुरुवातीला योगाचे मानवी जीवनातील महत्त्व आणि शारीरिक-मानसिक आरोग्यासाठी त्याची असणारी गरज यावर प्रकाश टाकण्यात आला. यानंतर उपस्थित सर्वांनी विविध योगासने आणि प्राणायाम यांचे प्रात्यक्षिक केले.

या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक जयदीप देशमुख, ज्येष्ठ शिक्षिका वैशाली देशमुख, तसेच सहाय्यक शिक्षक नरेंद्र देशमुख, प्रवीण मोहोड, अतुल ठाकरे, विवेक काळे, राजेश केवट, उषा परिहार, पंकज अगुलधरे, खंडारे मॅडम आणि धनंजय इंगळे रसिका तायडे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाला विद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने सर्व योगासने पूर्ण केली. मुख्याध्यापक जयदीप देशमुख यांनी सर्वांना दैनंदिन जीवनात योगाचा अवलंब करण्याचा संकल्प करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# हबीबनगरात युवकावर प्राणघातक हल्ला

## जखमीवर जिल्हा रुग्णालयात उपचार

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हबीबनगर परिसरात एका युवकावर प्राणघातक हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या युवकाला उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रिजवान बेग अहमद बेग (वय ३०, रा. हबीबनगर, गाडगेनगर) याच्यावर अज्ञात कारणावरून हल्ला करण्यात आला. हल्ल्यात त्याला गंभीर दुखापत झाल्याने स्थानिक नागरिकांच्या मदतीने तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच गाडगेनगर पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसराची पाहणी करून प्राथमिक माहिती संकलित केली. हल्ला नेमका कोणत्या कारणातून झाला, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. वैयक्तिक वाद, जुने वैमनस्य किंवा अन्य कोणते कारण यामागे आहे का, याचा शोध पोलीस घेत आहेत. या प्रकरणी संबंधित व्यक्तींची चौकशी सुरू असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच प्रत्यक्षदर्शींची माहितीही तपासली जात आहे. हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे गतिमान केली असून पुढील तपास गाडगेनगर पोलीस करीत आहेत.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

| | |
|---|---|
| फेरफार अहवाल/अर्ज क्र. | 278/2026 कलम २२ |
| सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक | **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती** **एफ-१२७७३/अमरावती** |
| बाबत अर्जदार - | **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती** |

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत (वर्णन)** - **निरंक**

**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--

पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २८४**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# सामाजिक कार्यकर्ते शरदसिंग चव्हाण यांना पत्नीशोक

**अमरावती :** मोर्शी तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते निंभार्णी येथील रहिवासी शरदसिंग मारुतीसिंग चव्हाण यांच्या पत्नी व स्थानिक शंकर नगर जवळील बालाजी नगर येथील शीतलसिंग चव्हाण यांच्या आई मीना यांचे आज दि.२१ जून रोजी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ६८ वर्षाच्या होत्या.



आज सायंकाळी ५ वाजता मोर्शी तालुक्यातील निंभार्णी या त्यांच्या गावातील स्मशानभूमीत त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती शरदसिंग, मुलगा शीतलसिंग, मुलगी शिल्पा कचवे, स्वाती येवतीकर, सून, नातवंडे आणि मोठा आप्त परिवार आहे.

# डीजेच्या वादातून अल्पवयीनावर प्राणघातक हल्ला

## तीन जणांविरुद्ध गुन्हा

**अमरावती/प्रतिनिधीः-** पंधरा दिवसांपूर्वी झालेल्या किरकोळ वादाचा राग मनात धरून एका १७ वर्षीय अल्पवयीन युवकावर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. या हल्ल्यात युवक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेनंतर आरोपी फरार झाले असून त्यांचा शोध पोलीस घेत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सोहेल बेग जफर बेग (वय १७, रा. लालखडी) हा १८ जून रोजी रात्री सुमारे ९.५५ वाजताच्या सुमारास गंभीर जखमी अवस्थेत आढळून आला. परिसरातील नागरिकांनी तत्परता दाखवत त्याला तातडीने अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. सध्या त्याच्यावर उपचार सुरू असून त्याची प्रकृती लक्षात घेऊन वैद्यकीय पथकाकडून विशेष काळजी घेतली जात आहे. प्राथमिक माहितीनुसार, पंधरा दिवसांपूर्वी डीजे वाजविण्याच्या कारणावरून काही अल्पवयीन मुलांमध्ये किरकोळ वाद झाला होता. याच वादाचा राग मनात धरून तीन प्रौढ व्यक्तींनी सोहेलवर धारदार शस्त्राने हल्ला केल्याचा आरोप आहे. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. जखमीच्या जबाबावरून नागपुरी गेट पोलीस ठाण्यात संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून तपास सुरू केला असून आरोपींचा शोध घेण्यासाठी विविध पथके कार्यरत आहेत. हल्ल्यामागील नेमके कारण आणि संपूर्ण घटनाक्रम उघड करण्यासाठी नागपुरी गेट पोलीस सखोल चौकशी करीत आहेत.

# एस. बी. खोबरागडे यांचा अभीष्टचिंतन सोहळ्यानिमित्त महापौरांच्या हस्ते सत्कार

**अमरावती/प्रतिनिधीः-** सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असलेले माजी शिक्षणाधिकारी एस. बी. खोबरागडे यांच्या अभीष्टचिंतन सोहळ्यानिमित्त महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. १० जूनला भीमटेकडी येथील संबोधी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संस्कार भवन येथे हा कार्यक्रम पार पडला. यावेळी मनपा स्थायी समितीचे सभापती अविनाश माईकर, नगरसेवक मंगेश मनोहर, नगरसेविका अर्चना पाटील, संविधानाचे अभ्यासक एस. यु. फुलझले, उमेश सहारे, भारत सहारे, गोपाल इंगळे, प्रा. वाल्मीक दवले, शिवा प्रधान, भास्कर दवले, आनंद तायडे विचारमंचावर उपस्थित होते.

प्रास्ताविक स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर तर संचालन नगरसेवक मंगेश मनोहरे यांनी केले. बौद्ध धम्म प्रचार समितीचे अध्यक्ष भारत शहारे



यांनी आभार मानले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी एस.बी. खोबरागडे यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचे कौतुक केले. या कार्यक्रमाला अॅड. पी. एस. खडसे, डॉ. कमल राऊत, रमेश कटके, नारायण दहाट, पांडुरंग चंडिकापुरे, राजू मेश्राम, मनीष पाटील, भगवान गोसावी, ओमप्रकाश भगत, श्याम दळवी, जयंत. बनसोड, बाबूराव छापानी, परसराम ढोले, अक्षय चव्हाण, निखील जवंजाळ, नारायण दहाट, पांडुरंग चंडिकापूरे, राजू मेश्राम, मनीष पाटील, प्रविण आकोडे व मोठ्या संख्येने बौद्ध बांधव उपस्थित होते.

# अंबानगरी फोटो-व्हिडिओग्राफर्स असोसिएशन २०२६

## कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा थाटात साजरा

**अमरावती/प्रतिनिधीः-** अंबानगरी फोटो व्हिडिओग्राफर असोसिएशन, अमरावतीच्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा रविवारी मराठी पत्रकार भवन, वालकट कंपाऊंड, अमरावती येथे उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमास फोटोग्राफर व व्हिडिओग्राफर क्षेत्रातील मान्यवर, सदस्य आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी आमदार प्रा. बी. टी. देशमुख तसेच मोर्शी येथील छायाचित्रकार अनिकेत विजयराव बन्सोड यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष जयंतराव दलाल प्रमुख अतिथी म्हणून नाना उर्फ विजय चौधरी, रामेश्वरराव गुल्हाने नवनिर्वाचित अध्यक्ष तसेच असोसिएशनचे माजी अध्यक्ष नीलश्यामजी चौधरी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते नवनिर्वाचित अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला व पदग्रहण सोहळा पार पडला.

नवीन कार्यकारिणी अध्यक्ष गजानन अंबाडकर, उपाध्यक्ष प्रतिक रोहणकर, महेंद्र मोहोड, निखिल तिवारी, सचिव प्रशांत टाके, सहसचिव राहुल पालेकर, कोषाध्यक्ष शुभम विलास डोईफोडे, सह कोषाध्यक्ष अनंत जामोदकर, कार्यकारिणी सदस्य नितेश झा, सोहेल अहमद, स्वप्नील मनवर, रोशन अग्रवाल, पवन देशमुख, मोहन देशमुख, सागर काजळे, मोहन कोहळे आणि प्रशांत गजबिये यांची निवड करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित कार्यकारिणीला शुभेच्छा देत संघटनेच्या बळकटीकरणासाठी, फोटोग्राफर व्हिडिओग्राफर बांधवांच्या हितासाठी आणि व्यवसायाच्या प्रगतीसाठी कार्य करण्याचे आवाहन केले. नूतन पदाधिकाऱ्यांनीही संघटनेच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रभावी संचालन असोसिएशनचे मनीष जगताप यांनी केले, तर सचिव प्रशांत टाके यांनी आभार प्रदर्शन केले. पदग्रहण सोहळ्यानंतर उपस्थित सदस्यांनी नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.व यानंतर प्रथम सर्वसाधारण आमसभा घेऊन वर्षभर चालणार्या कार्यक्रमाचे नियोजन व प्रकल्प प्रमुख ठरवण्यात आले.

# माळीपुरा परिसरात मध्यरात्री घरफोडी

## -रोख रकमेसह दीड लाखांचे दागिने लंपास

**नांदगाव पेठ :** माळीपुरा परिसरात अज्ञात चोरट्याने मध्यरात्रीच्या सुमारास एका घरात घरफोडी करून रोख रक्कम आणि सोने-चांदीचे दागिने असा सुमारे दीड लाख रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या धाडसी चोरीमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माळीपुरा येथील रहिवासी अतुल वासुदेव राऊत यांच्या घराला चोरट्याने लक्ष्य केले. घराच्या वरच्या मजल्यावर कोणीही नसल्याची संधी साधत चोरट्याने घरात प्रवेश केला. त्यावेळी कुटुंबीय खालच्या मजल्यावरील खोलीत झोपलेले होते. चोरट्याने वरच्या मजल्यावरील गोदरेज कपाटाचे कुलूप तोडून कपाटातील १५ हजार रुपये रोख रक्कम तसेच सोने-चांदीचे दागिने लंपास केले. चोरीचा प्रकार सकाळी उघडकीस आल्यानंतर कुटुंबीयांना धक्का बसला. याबाबत अतुल राऊत यांनी तत्काळ नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपासाची सूत्रे हाती घेतली. श्वानपथक आणि न्यायवैद्यक (फॉरेन्सिक) पथकाला पाचारण करण्यात आले. पथकांनी घटनास्थळाची बारकाईने पाहणी करून आवश्यक पुरावे संकलित केले. पोलिसांनी पंचनामा करून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून विविध अंगांनी तपास सुरू केला आहे. अलीकडील काळात घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांनी घर सुरक्षिततेबाबत अधिक सतर्क राहण्याची गरज व्यक्त होत आहे. दरम्यान, चोरीतील आरोपींचा लवकरात लवकर शोध घेण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## संक्षिप्त

### किरकोळ वादातून काठीने मारहाण

**वर्धा** -येथील माता मंदिर वॉर्ड परिसरात किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर मारहाणीत झाले. एका व्यक्तीला काठीने



मारहाण करून जखमी केल्याची घटना समोर आली आहे. नरेश महादेव माहुरे यांनी याबाबत पोलिसांत तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, छोटा रावण या नावाने ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तीने वादाच्या भरात त्यांना काठीने मारहाण केली. या घटनेत माहुरे यांना दुखापत झाली असून परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. तक्रारीच्या आधारे आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेमागील नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे. वाढत्या किरकोळ वादांमधून हिंसाचाराच्या घटना घडत असल्याने नागरिकांनी संयम बाळगण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

### धनादेश बाऊन्स प्रकरणी एक वर्ष कारावासाची शिक्षा

**हिंगणघाट**-येथील ईरा अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या



कर्जवसुली प्रकरणात न्यायालयाने आरोपीला एक वर्षाच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. आशिष रविकांत वाटकर यांनी सोसायटीकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी दिलेला ७१ हजार ६७२ रुपयांचा धनादेश बँकेत अनादरित झाला होता. त्यानंतर सोसायटीने न्यायालयात दावा दाखल केला होता. सुनावणीनंतर दुसरे सह अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी तथा वरिष्ठ स्तर न्यायाधीश ए.एच.सैय्यद यांनी आरोपीला दोषी ठरवत एक वर्ष सश्रम कारावास व ८० हजार रुपयांचा नुकसानभरपाई दंड ठोठावला. प्रकरणाची बाजू सोसायटीच्या वतीने ॲड. संदीप देवगिरकर यांनी मांडली. धनादेश अनादरित प्रकरणांमध्ये न्यायालयाचा हा निर्णय महत्त्वाचा मानला जात असून आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता राखण्याचा संदेश या निकालातून मिळाला आहे.

# तुरीच्या पोत्यात दोन किलोचा फरक

## आष्टी बाजार समितीतील वजनकाटा प्रकरणाने घेतले गंभीर वळण, दोषींवर कठोर कारवाईची मागणी, आंदोलनाचा इशारा

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

आष्टी कृषी उत्पन्न बाजार समितीतील कथित बोगस वजनकाटा प्रकरण दिवसेंदिवस अधिकच गंभीर होत असून या प्रकरणामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. शेतकऱ्यांच्या मालाचे वजन कमी दाखवून आर्थिक नुकसान करण्यात आले का, याची चर्चा सुरू असतानाच पुन्हा करण्यात आलेल्या मोजणीत तब्बल दोन किलोचा फरक आढळल्याने बाजार समितीच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शेतकरी श्याम देशमुख यांनी विक्रीसाठी आणलेल्या तुरीच्या पोत्यांची पुनर्मोजणी करण्यात आली. या वेळी प्रति पोते सुमारे दोन किलोचा फरक आढळून आल्याचे समोर आले. त्यामुळे वजनकाटा अचूक होता की नाही, तसेच शेतकऱ्यांच्या मालाचे वजन कमी दाखविण्याचा प्रकार झाला का, याबाबत संशय अधिक गडद झाला आहे.

या प्रकरणाला सुरुवातीपासूनच शेतकरी दहेकार यांनी वाचा फोडली. वजन प्रक्रियेत गैरप्रकार होत असल्याचा आरोप करत त्यांनी संबंधित यंत्रणेचे लक्ष वेधले. त्यांच्या




पाठपुराव्यानंतर बाजार समिती प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेत चौकशी सुरू केली. आता वजनकाटा तपासणी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात आलेल्या तपासणीचा अहवाल येणे बाकी असून त्यानंतरच पुढील कारवाईची दिशा स्पष्ट होणार आहे. दरम्यान, या वजनकाट्याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. संबंधित वजनकाटा नेमका कुणाच्या मालकीचा होता, तो बाजार समितीच्या आवारात कशाच्या परवानगीवर कार्यरत होता, वजन मोजणीच्या वेळी अधिकृत व्यक्ती उपस्थित होती का, तसेच वजन प्रक्रियेदरम्यान नियमांचे पालन करण्यात आले होते का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी शेतकरी करीत आहेत.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, शेतीमाल विक्रीच्या वेळी वजनात होणारा अगदी किरकोळ फरकही त्यांच्या उत्पन्नावर परिणाम करणारा ठरतो. अशा परिस्थितीत दोन किलोचा फरक आढळणे ही गंभीर बाब असून यामागील सत्य बाहेर आले पाहिजे. दोषी कोणताही असो, त्याच्यावर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी होत आहे.

शेतकऱ्यांच्या घामाच्या पैशावर कुणी डल्ला मारत असेल तर ते सहन केले जाणार नाही. चौकशी निष्पक्ष व्हावी आणि दोषींवर कडक कारवाई व्हावी. अन्यथा शेतकऱ्यांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शेतकरी दहेकार यांनी दिला आहे.आता सर्वांचे लक्ष वजनकाटा तपासणी अहवालाकडे लागले असून या अहवालातून नेमके काय सत्य समोर येते आणि बाजार समिती प्रशासन कोणती भूमिका घेते, यावर पुढील घडामोडी अवलंबून राहणार आहेत.

# बोर नदीकाठावरील हातभट्टीवर पोलिसांचा छापा

## ११.४८ लाखांचा मुद्देमाल जप्त; एक आरोपी ताब्यात, दुसरा फरार

**सेलू/जनमाध्यम**

अवैध दारू निर्मिती आणि विक्रीविरोधात सुरू असलेल्या मोहिमेंतर्गत सेलू पोलिसांनी बोर नदीकाठावरील हातभट्टीवर धडक कारवाई करत तब्बल ११ लाख ४८ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून एक आरोपी फरार झाला आहे.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार बोरी कोकाटे शिवारातील बोर नदीच्या काठावर गावठी मोहा दारूची हातभट्टी सुरू असल्याची माहिती



मिळाली होती. त्यानुसार नवनियुक्त ठाणेदार पंकज वाघोडे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी वॉशआऊट मोहिमेदरम्यान छापा टाकला. पोलिसांची चाहूल लागताच हिंगणी येथील पंढरी जुगनाके हा घटनास्थळावरून पसार झाला. मात्र त्याचा साथीदार आशिष उपास ठाकरे याला पोलिसांनी ताब्यात घेतले.

कारवाईदरम्यान १,८०० लिटर कच्चा मोहा सडवा, जमिनीत गाडून ठेवलेल्या ड्रममधील २,४०० लिटर कच्चा मोहा सडवा, ८०० लिटर उकळता मोहा सडवा, २६० लिटर तयार गावठी मोहा दारू तसेच लोखंडी ड्रम आणि भट्टीसाठी लागणारे साहित्य आढळून आले. हा सर्व मुद्देमाल जागीच जप्त करून नष्ट करण्यात आला.या प्रकरणी पंढरी जुगनाके आणि आशिष उपास ठाकरे यांच्याविरुद्ध दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार आरोपीचा शोध सुरू आहे. पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार पंकज वाघोडे, जमादार प्रशांत श्रीवास्तव तसेच डीबी पथकातील कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली.

# दहशत माजवणाऱ्या दोघांवर पोलिसांचा बडगा

**कारंजा (घाडगे)** - पोलिसांनी धारदार शस्त्र घेऊन परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या दोन जणांविरुद्ध कारवाई केली आहे. नारा गावात प्रकाश अजाबराव गोरे हा विनाकारण शिवीगाळ करत चाकूसारखे शस्त्र घेऊन फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तातडीने कारवाई करत त्याला ताब्यात घेतले. दुसरी कारवाई कारंजा शहरातील इंदिरानगर परिसरात करण्यात आली. अजय मोरे हा धारदार शस्त्र घेऊन नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करत




असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत त्यालाही अटक केली. दोन्ही आरोपींविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सार्वजनिक ठिकाणी शस्त्र बाळगून दहशत पसरविणाऱ्या विरुद्ध कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.

# वाहतूक नियमांचे पालन करा, विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवा-रियाज खान

## स्कूल बस व ऑटोचालकांसाठी परिवहन समितीची जनजागृती कार्यशाळा



**वर्धा/जनमाध्यम**

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी वाहून नेणाऱ्या स्कूल बस व ऑटोचालकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे अत्यावश्यक आहे. चालकांनी स्वतःला शिस्तीत बांधून सुरक्षित वाहनचालना केल्यास अनेक अपघात टाळता येऊ शकतात. वाहतूक नियमांचे करूया पालन, विद्यार्थ्यांचे भविष्य करूया रक्षण हा संदेश देत वाहतूक नियंत्रण शाखेचे सहाय्यक फौजदार रियाज खान यांनी चालकांना मार्गदर्शन केले. स्थानिक अग्रगामी कॉन्व्हेंट,म्हसाळा येथे परिवहन समितीच्या वतीने स्कूल बस व ऑटो रिक्षा चालक-मालकांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रियाज खान यांनी विद्यार्थ्यांना समोरील सीटवर बसवू नये, वाहन चालविताना सीट बेल्टचा वापर करावा, मोठ्या आवाजात संगीत वाजवू नये तसेच विद्यार्थ्यांसमोर गुटखा, तंबाखू किंवा इतर व्यसनांचे सेवन करू नये, अशा महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.अपघात घडल्यास अथवा एखादी आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास ११२ व १०८ या मोफत हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधून तातडीने मदत मिळवावी, असेही त्यांनी सांगितले. तसेच रस्त्यावर अपघातग्रस्तांना तातडीने रुग्णालयात पोहोचविणाऱ्या नागरिकांसाठी शासनाच्या 'रहागीर योजना' अंतर्गत २५ हजार रुपयांच्या प्रोत्साहनपर बक्षिसाची माहितीही देण्यात आली. वर्धा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस निरीक्षक विलास पाटील वानिशा यांच्या आदेशानुसार ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली.कार्यक्रमाला शाळेच्या प्राचार्या जेसी मॅडम, पंचायत समितीच्या विस्तार अधिकारी सौ. परमार, म्हसाळा ग्रामपंचायतीचे सरपंच किटे, शाळेतील शिक्षक सूर्या कोसुरकर, प्रवीण भाऊ तसेच स्कूल बस व ऑटो रिक्षा चालक-मालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन हेमंत सर यांनी केले.

# एनसीसी छात्र सैनिकांना आवश्यक योगाभ्यास प्रशंसनीय-संगीता शेंडे

**सेवाग्राम/जनमाध्यम**

निरोगी आरोग्य हेच आपले धन आहे. आरोग्य चांगले असेल तर आपण आपले जीवन आनंददायी करू शकतो. म्हणूनच दररोज योगा व व्यायाम करणे आवश्यक असून या दृष्टिकोनातून एनसीसी बटालियन अंतर्गत छात्र सैनिकांना आवश्यक केलेला योगाभ्यास प्रशंसनीय आहे, असे प्रतिपादन महिला पतंजली विभागाच्या तालुकाप्रमुख संगीता शेंडे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात स्थानिक बापुरावजी देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिसरात 'जागतिक योग दिना'निमित्त आयोजित योगाभ्यास कार्यक्रमात २१ जून रोजी केले.

स्थानिक २१ महाराष्ट्र बटालियन एनसीसी च्या वतीने आयोजित ६०६ वा वार्षिक एनसीसी शिबिरादरम्यान जागतिक योगा दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी एनसीसीच्या कमांडिंग ऑफिसर कर्नल संदीप कुमार सिंग, प्रशासकीय अधिकारी जीसांतो, सुबेदार मेजर दिलबाग सिंग व एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर मंचावर उपस्थित



होते.यावेळी योगा प्रशिक्षक संगीता शेंडे, प्रशिक्षक संगीता इलमे व महिला एनसीसी अधिकारी सिंधू खुशवा यांनी उपस्थित सैन्य दलातील अधिकारी, एनसीसी अधिकारी, सैन्य दलाचे प्रशिक्षक व छात्र सैनिकांना प्रशिक्षण दिले. यात ४५० एनसीसी छात्र सैनिकांनी प्रशिक्षण प्राप्त केले.

सदर योगास सत्रात एनसीसी अधिकारी लेफ्टनंट संदीप पारखी, लेफ्टनंट सचिन श्रीरामे, सेकंड ऑफिसर स्वप्निल आगाशे, सुबेदार टुला सिंग, सुबेदार प्रमोद घोरपडे, हवालदार सतीश पुरकर, हवालदार योगेश पानसरे, हवालदार संतोष माने, हवालदार विशाल खुणे, हवालदार प्रशांत तिवसकर, हवालदार नारायण कदम, अश्विनी सिंग यांच्यासह सैन्य दलातील प्रशिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यात विशेष म्हणजे देवळीच्या एस एस एन जे महाविद्यालयातील ५५एनसीसी छात्र सैनिकांचा समावेश होता. सीनियर अंडर ऑफिसर कल्याणी लिखार, सार्जंट साक्षी पारिसे, सार्जंट आरती मरघडे, सार्जेंट कुंदन कावडे, सप्तेश्वरी सावरकर व समीक्षा नेहारे यांनी छात्र सैनिकांचे नेतृत्व केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एनसीसी अधिकारी कॅप्टन नंदकिशोर बिजागरे यांनी तर आभार गर्ल कॅडेट इन्स्ट्रक्टर साधना पाल यांनी मानले.

# ट्रकच्या धडकेत कारचे नुकसान

**हिंगणघाट**-शहरातील सर्व्हिस रोडवर झालेल्या अपघातात ट्रकने कारला मागून जोरदार धडक दिल्याने एक जण जखमी झाला.या अपघातात कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून लंकेश उघडे हे जखमी झाले आहेत. वासुदेव गुलाबराव डेहणे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्यांचा मुलगा आदेश डेहणे व लंकेश उघडे हे शेतातून कारने घरी परतत असताना भरधाव ट्रकने वाहनाला धडक दिली. धडकेमुळे वाहनाचे नुकसान होऊन लंकेश उघडे यांना दुखापत झाली. अपघातानंतर परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## अश्रूंनी दाटला समाज मंदिर परिसर

# समाजसेवक सतीश मसराम यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**वर्धा/जनमाध्यम**

गोंड मोहल्ला येथील सामाजिक कार्यकर्ते सतीश मसराम यांच्या स्मरणार्थ आयोजित श्रद्धांजली सभा रविवारी भावनिक वातावरणात संपन्न झाली. समाज मंदिर परिसरात झालेल्या या कार्यक्रमात समाजबांधव, मित्रपरिवार, नातेवाईक आणि कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित राहून दिवंगत सतीश मसराम यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी उपस्थितांनी सतीश मसराम यांच्या सामाजिक कार्याचा, समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचा आणि सर्वसामान्यांशी जपलेल्या जिव्हाळ्याच्या नात्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. समाजहितासाठी त्यांनी केलेले कार्य आणि



गरजूंच्या मदतीसाठी कायम तत्पर राहण्याची त्यांची वृत्ती अनेकांनी आठवली. त्यांच्या आठवणींना उजाळा देताना सभागृहातील वातावरण भावूक झाले होते.श्रद्धांजली सभेत उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या निधनामुळे समाजाने एक संवेदनशील, मनमिळावू आणि कार्यतत्पर व्यक्तिमत्त्व गमावल्याची भावना वक्त्यांनी व्यक्त केली.सतीश मसराम यांच्या पश्चात पत्नी, दोन मोठे भाऊ आणि मोठा आप्तपरिवार असून त्यांच्या अकाली निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या कार्याची प्रेरणा समाजासाठी कायम स्मरणात राहील, अशा भावना उपस्थितांनी व्यक्त करत त्यांना अखेरचा भावपूर्ण निरोप दिला.

## रागाच्या भरात घर सोडले

# पोलिसांच्या सतर्कतेने २४ तासांत सिकंदराबादहून शोधला अनुज

**वर्धा/जनमाध्यम**

घरातील किरकोळ कारणावरून रागाच्या भरात घर सोडून गेलेल्या अल्पवयीन मुलाचा सिदी रेल्वे पोलिसांनी अवघ्या २४ तासांत शोध लावून त्याला सुखरूपपणे पालकांच्या ताब्यात दिले. पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे एका कुटुंबाचा जीव भांड्यात पडला असून या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. सुरेश राऊत यांनी सिदी रेल्वे पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, १८ जून रोजी त्यांच्या मुलगा अनुज याला घरकामाच्या कारणावरून आईने समज दिली होती. त्यानंतर रागाच्या भरात अनुज घरातून निघून गेला. बराच शोध घेऊनही तो न सापडल्याने पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १३७(२) अन्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू करण्यात आला.तपासादरम्यान अनुज हा सिदी रेल्वे स्थानकाच्या दिशेने जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार तांत्रिक माहिती, स्थानिक सूत्रे आणि विविध यंत्रणांची मदत घेऊन शोधमोहीम राबविण्यात आली. अखेर तेलंगणातील सिकंदराबाद येथे अनुज आढळून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन सुखरूप वर्ध्यात आणले आणि कायदेशीर पालकांच्या स्वाधीन केले.पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली, सिदी रेल्वेचे ठाणेदार नरेंद्र निस्वाडे यांच्या नेतृत्वात पोलीस हवालदार प्रफुल डफ तसेच पोलीस शिपाई अतुल मडावी, उमेश खामणकर आणि नितीन नखाते यांनी ही यशस्वी कारवाई पार पाडली. अल्पावधीत मुलाचा शोध लावल्याबद्दल पोलिसांच्या कार्यक्षमतेचे नागरिकांकडून अभिनंदन होत आहे.

## महेश नवमी उत्सवाची जय्यत तयारी

# रक्तदान, जलाभिषेक, भव्य शोभायात्रा आणि गुणवंतांचा गौरव; किरण मुंदडा प्रमुख अतिथी

**वर्धा/जनमाध्यम**

भगवान महेशाच्या कृपेने वैश्य धर्म स्वीकारून उदयास आलेल्या माहेश्वरी समाजाचा गौरवशाली वंशोत्पत्ती दिन अर्थात महेश नवमी निमित्त माहेश्वरी मंडळ वर्धाच्या वतीने उद्या दि. २३ जून रोजी विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पावन पर्वानिमित्त समाजबांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून कार्यक्रमाच्या तयारीला वेग आला आहे.

महेश नवमी हा माहेश्वरी समाजासाठी केवळ धार्मिक उत्सव नसून समाजाच्या एकतेचा, संस्कारांचा आणि सेवाभावाचा प्रतीक मानला जातो. या निमित्ताने भगवान महेश यांचा जलाभिषेक, रक्तदान शिबिर, विविध देखाव्यांनी सजलेली भव्य शोभायात्रा, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच समाजातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा व गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांमधून समाजसेवा आणि संस्कृती संवर्धनाचा संदेश दिला जाणार आहे.

यंदाच्या कार्यक्रमासाठी नागपूरच्या ख्यातनाम सामाजिक कार्यकर्त्या, प्रेरणादायी वक्त्या, साहित्य साधिका



आणि 'पाक्षिक माहेश्वरी'च्या मानद संपादिका किरण मुंदडा प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. महिला सक्षमीकरण, सामाजिक जागृती, पर्यावरण संवर्धन आणि संस्कार शिक्षण या क्षेत्रांत त्यांनी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे.'तेजस्विनी मंच'च्या माध्यमातून महिलांमध्ये आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण विकसित करण्याचे कार्य त्यांनी केले आहे. तसेच बीजेएस स्मार्ट गर्ल कार्यशाळेच्या मास्टर ट्रेनर म्हणून अनेक मुलींना मार्गदर्शन केले आहे. ऑनलाइन गीता वर्गांच्या माध्यमातून त्या युवक आणि महिलांना भारतीय संस्कृती व अध्यात्माशी जोडण्याचे कार्य सातत्याने करीत आहेत.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत जनजागृती केल्याबद्दल त्यांना नागपूर महानगरपालिकेच्या स्वच्छता ब्रँड ॲम्बेसेडरचा मान मिळाला आहे. पॉवरफुल वूमन प्राईड अवॉर्ड, सेवा सन्मान, उड्डाण पुरस्कार तसेच कोरोना काळातील उल्लेखनीय सेवेसाठी 'कोरोना योद्धा' अशा अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे.महेश नवमीच्या या उत्सवात समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यक्ष नंदकिशोर भूतडा, ऋषभ जाजू, सुनिता विजय राठी, साक्षी चितलांगे, सचिव हरीश गांधी, अमित लड्ढ, छाया पसारी, विशाखा टावरी तसेच समन्वयक राजकुमार जाजू यांनी केले आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २०५**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

सोमवार , दि. २२ जून २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# "साहेब,आम्हाला घर द्या हो..घर!"

## बेघर महिलांचा पुसद नगरपरिषदेला कुलूप ठोकून संताप, ४० वर्षांच्या प्रतीक्षेनंतरही घरकुलाचा प्रश्न कायम

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २१ :** शहरातील सुभाष वॉर्ड, गणेश वॉर्ड आणि भोईपुरा परिसरातील ६० ते ६५ बेघर व आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांनी घरकुल व राहण्यासाठी जागेच्या मागणीसाठी पुसद नगरपरिषदेच्या मुख्य प्रवेशद्वाराला कुलूप ठोकून तीव्र आंदोलन केले. "साहेब, आम्हाला घर द्या हो...!" अशी आर्त हाक देत महिलांनी प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला.



गेल्या चार दशकांपासून शहरात वास्तव्य करणाऱ्या या कुटुंबांकडून नियमित करपट्टी घेतली जात असतानाही त्यांना आजपर्यंत घरकुल किंवा पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, नगराध्यक्षा, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी तसेच लोकप्रतिनिधींना अनेकदा निवेदने देऊनही प्रश्न मार्गी लागला नसल्याचा आरोप आंदोलक महिलांनी केला. १७ जून रोजी सकाळी महिलांचा समूह नगरपरिषद कार्यालयात आपली बाजू मांडण्यासाठी पोहोचला होता. मात्र, जवळपास दीड तास ताटकळत उभे ठेवूनही नगराध्यक्षा मोहिनीताई नाईक यांनी त्यांचे म्हणणे न ऐकताच निघून गेल्याचा आरोप महिलांनी केला. यामुळे संतप्त झालेल्या महिलांनी नगरपरिषदेला कुलूप ठोकत जोरदार घोषणाबाजी केली. महिलांच्या मते, विठाळा वॉर्ड येथील ट्रॅव्हल्स पॉइंटलगत असलेल्या नगरपालिकेच्या जागेवर तात्पुरता निवारा किंवा घरकुलासाठी जागा देण्याची मागणी त्यांनी केली होती. परंतु त्याकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात आले. आंदोलनात पुष्पा गाढवे, वंदना वाठोरे, वर्षा यादव, सविता शिरनाथ, कावेरी वाघमारे, लता गुद्दटवार यांच्यासह अनेक महिलांचा सहभाग होता.

### "कर घेतला, पावत्या दिल्या; पण जागा मात्र नाही!"

बेघर नागरिकांना जागा उपलब्ध करून देण्याच्या नावाखाली दोन-तीन वर्षांपूर्वी नगरपालिकेकडून सुरुवातीला ३५०, त्यानंतर ५०० ते ६०० रुपये घेतल्याचा गंभीर आरोप आंदोलकांनी केला आहे. संबंधित रकमेच्या पावत्याही आमच्याकडे आहेत. मात्र, पैसे घेतल्यानंतरही जागा न मिळाल्याने आम्ही घरकुल योजनांपासून वंचित राहिलो, अशी खंत स्वप्नील इंगोले यांनी व्यक्त केली.

### "प्रशासकीय अडचणींचा आधार; ठराव करून शासनाकडे पाठपुरावा"

गरजू बेघर महिलांच्या मागणीसंदर्भात नगरपरिषद ठराव घेऊन शासनाकडे पाठपुरावा करेल. संबंधित जागा थेट देण्यास प्रशासकीय मर्यादा आहेत. नियमानुसार प्रक्रिया पूर्ण करून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी भूमिका मुख्याधिकारी, नगर परिषद पुसद यांनी मांडली.

## झरीतील युवकांचा शिवसेना शिंदे गटात पक्षप्रवेश शिवसेना पक्षप्रवेश सोहळा



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. २१ :** तालुक्यातील विविध गावातील तरुणांनी आशिष खुलसंगे व तालुका प्रमुख बालू चेडे यांच्या नेतृत्वामध्ये यवतमाळ येथे युवकांनी शिवसेना शिंदे गटात पालकमंत्री संजय राठोड यांच्या विश्वास ठेवून यांनी प्रवेश केला आहे. याप्रसंगी जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार, पश्चिम विदर्भ सहसंपर्क प्रमुख पराग पिंगळे, यवतमाळ सहसंपर्क प्रमुख श्रीधर मोहोड, यवतमाळ जिल्हा संपर्क प्रमुख राजाभाऊ जाधव, जिल्हा प्रमुख गजानन डोमाळे, जिल्हाप्रमुख यशवंत पवार, जिल्हाप्रमुख संजय हातगावकर, जिल्हा समन्वक सुरेश चिंचोळकर यांची उपस्थिती होती. यावेळी झरी तालुक्यातील आदिवासी सामाजिक कार्यकर्ते मारोती कुसराम, राहुल गवळी, प्रकाश खिरटकर, अमित मुके, अमोल यमजलवार, सोनल घुगुल, प्रवीण गावंडे, अभिलाश बाजनलावार, तुलसीदास मंदावार, प्रेम मंदावार, आकाश काचिनवार, विक्रम पशिवार, प्रकाश मंदुलवार, सुभाष तांदूळकर, समाधान कुनधाटकर, रामराव आत्राम, दादाराव मेश्राम यांनी पक्षप्रवेश केला आहे.

# 'री-नीट' जिल्ह्यात शांततेत पार..!

## २,८४७ पैकी २,६२६ विद्यार्थ्यांची उपस्थिती, २२१ गैरहजर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २१ :** राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (NEET-UG २०२६) ची फेरपरीक्षा (री-नीट) रविवारी यवतमाळ जिल्ह्यात कडक सुरक्षा, काटेकोर नियोजन आणि शांततापूर्ण वातावरणात पार पडली. जिल्ह्यातील १३ परीक्षा केंद्रांवर एकूण २ हजार ८४७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.



त्यापैकी २ हजार ६२६ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित राहिले, तर २२१ विद्यार्थ्यांनी परीक्षेकडे पाठ फिरवली. मेडिकल आणि दंतवैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी ही परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासन, शिक्षण विभाग आणि परीक्षा केंद्र प्रशासनाने व्यापक तयारी केली होती. परीक्षा संचालन, देखरेख आणि विविध व्यवस्थांसाठी ९५ पर्यवेक्षक व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. सर्व परीक्षा केंद्रांवर उमेदवारांची ओळख पडताळणी, सुरक्षा तपासणी, प्रवेश व्यवस्थापन आणि परीक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्यात आले. विद्यार्थ्यांना निर्धारित वेळेपूर्वी केंद्रांवर पोहोचण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. केंद्रांबाहेर पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. परीक्षेदरम्यान वाहतूक नियंत्रण, पिण्याच्या पाण्याची सुविधा आणि अन्य आवश्यक सोयी-सुविधांचीही व्यवस्था प्रशासनाने केली होती. त्यामुळे संपूर्ण परीक्षा प्रक्रिया कोणत्याही अडथळ्याविना आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली. जिल्हा प्रशासनाच्या माहितीनुसार, कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार, कॉपी, गोंधळ अथवा अप्रिय घटनेची नोंद झाली नाही. सर्व केंद्रांवर परीक्षा निष्पक्ष, पारदर्शक आणि शांततेच्या वातावरणात संपन्न झाली. या यशस्वी आयोजनासाठी प्रशासन, शिक्षण विभाग, केंद्रप्रमुख, पर्यवेक्षक आणि कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम केल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. देशातील सर्वाधिक महत्त्वाच्या प्रवेश परीक्षांपैकी एक असलेल्या नीट-यूजीच्या फेरपरीक्षेनंतर आता विद्यार्थ्यांचे लक्ष निकालाकडे लागले आहे.

# ढाणकीत CPHC प्रशिक्षणाचा शुभारंभ..!

## ग्रामीण आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी आरोग्य विभागाची पुढाकार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**ढाणकी, दि. २१ :** ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक प्रभावी, लोकाभिमुख आणि सर्वसमावेशक करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन व जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने प्राथमिक आरोग्य केंद्र ढाणकी येथे कॉम्प्रिहेन्सिव्ह प्रायमरी हेल्थ केअर (CPHC) प्रशिक्षण कार्यक्रमाचा उत्साहात शुभारंभ झाला.



१९ ते २३ जूनदरम्यान दोन टप्प्यांत आयोजित या प्रशिक्षणात आरोग्य यंत्रणेला अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात येत आहे. उद्घाटन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वाती मुनेश्वर होत्या. अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कृष्णदास बानोत, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुनील दुबे, डॉ. विशाल दवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रशिक्षणात समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक, गटप्रवर्तक व आशा सेविकांना प्रत्यक्ष कृतीद्वारे प्रशिक्षण देण्यात आले. गावपातळीवरील आरोग्य व्यवस्थापन, आरोग्य पत्रिकेचा वापर, डॉक्टरांच्या गावभेटी, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांसह १३ महत्त्वपूर्ण विषयांचा समावेश आहे. यावेळी डॉ. स्वाती मुनेश्वर व डॉ. विशाल दवणे यांच्या उल्लेखनीय कार्याचा जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ढोले यांनी पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन सन्मान केला. तसेच CPHC प्रशिक्षणाच्या यशस्वी नियोजनाबद्दल डॉ. सुनील दुबे, डॉ. विशाल दवणे, डॉ. स्वाती मुनेश्वर आणि दोन्ही प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या चमूचे विशेष कौतुक करण्यात आले. ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला नवसंजीवनी देणारा हा उपक्रम ठरणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## थोडक्यात

### नीट परीक्षा केंद्रांबाहेर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

**यवतमाळ :** राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (नीट) निमित्त शनिवारी यवतमाळ



शहरातील विविध परीक्षा केंद्रांबाहेर परीक्षार्थीसोबत आलेल्या पालक व नागरिकांसाठी वहदत-ए-इस्लामी हिंद, शाखा यवतमाळ यांच्या वतीने शुद्ध पिण्याच्या पाण्याची मोफत व्यवस्था करण्यात आली. जून महिन्यातील कडक उन्हामुळे ग्रामीण व दुर्गम भागातून आलेल्या पालकांना तासन्तास परीक्षा केंद्राबाहेर थांबावे लागत असल्याने सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. शहरातील अमोलकचंद महाविद्यालय,अँग्लो हिंदी हायस्कूल आणि देवराव पाटील विद्यालय, आर्णी रोड येथील एकूण तीन परीक्षा केंद्रांबाहेर पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमामुळे पालक व नागरिकांनी समाधान व्यक्त करत वहदत-ए-इस्लामीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे आभार मानले. विद्यार्थ्यांसह पालकांच्या सेवेसाठी पुढाकार घेतल्याबद्दल संस्थेच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. शेख मुजीब, फसीउल्लाह खान, अली इम्रान, निसार फारुकी, शकील अहमद, अकिल खान, डॉ. साजिद पटेल यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### घाटंजीत जागतिक योग दिन उत्साहात साजरा

**घाटंजी :** जागतिक योग दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी घाटंजी ग्रामीणच्या वतीने श्री समर्थ हायस्कूल, घाटंजी येथे योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये योगाचे महत्त्व, निरोगी जीवनशैली आणि नियमित व्यायामाचे फायदे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या प्रसंगी सुरेशजी डहाके,तालुकाध्यक्ष विजय बैस,नामपेल्लीवार, संदीप माटे, विनय जाधव, बालू खांडरे, वर्षा पेंदोर, सोनल ठाकरे, साधना माडूरवार, सुष्मा खांडरे, नम्रता मेश्राम, नरेश पेंदोर, प्रशिकजी लढे, बच्चू चिव्हाने तसेच भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. शिबिराला वैद्य,मदने, कानकाटे आणि गणेश खापर्डे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच या शिबिराचे प्रशिक्षक सतीश रामगडे यांनी अतिशय उत्कृष्ट पद्धतीने योग प्रशिक्षण देऊन उपस्थितांना योगाचे विविध प्रकार आणि त्यांचे आरोग्यदायी लाभ समजावून सांगितले. या योग शिबिरामुळे उपस्थितांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली असून नियमित योगाभ्यास करण्याचा संकल्प करण्यात आला. योग हा निरोगी, संतुलित आणि आनंदी जीवनाचा आधार असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

### ४२ कुटुंबे घरकुल योजनेपासून वंचित..! बिडीओकडे तक्रार!

**महागाव :** तालुक्यातील इजनी येथील एकुण ४२ कुटुंबातील नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुलाचा लाभ न मिळाल्याचे वास्तव्य समोर आले आहे.गेल्या अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या या ४२ कुटुंबातील नागरिकांना अतिक्रमणाच्या जागेवर वास्तव्य करत असल्याचे ग्रामपंचायत मार्फत घोषीत करण्यात आले.मात्र २०१४ मध्ये याच नागरिकांना स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शौछालयाचे बांधकाम करुन देण्यात आले.मनरेगा अंतर्गत विविध योजनेचे लाभ देण्यात आले आहेत.व काही कुटुबांना जुन्या झोपडपट्टीचे लाभ देखील मिळाले आहे.तर कोणत्या नियमावली नुसार येथे वास्तव्यास असलेल्या ४२ कुटुंबातील नागरिकांनी अतिक्रमण करून राहत असल्याचे सिध्द झाले आहे. असा सवाल उद्भवत आहे.गावातील काही राजकीय लोकतंत्रापायी ग्रा पंचायत सचिव, सदस्य यांच्या मिलीभगतीमुळे येथील कुटुंबांना जाणीवपूर्वक घरकुलाच्या लाभापासून वंचित ठेवल्याचा आरोप तक्रारीतुन करन्यात आला आहे. घरकुल योजनेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकारची मोकापाहणी व शहानिशा न करता येथील गरजु लाभार्थ्यांना अतिक्रमणच्या जागेवर वास्तव्य करत असल्याचे घोषित केले आहे.गेल्या अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांना डावलुण काही लोकप्रतिनिधीनी आपल्या फायद्यासाठी चेलाचपाटयांची नावे घरकुल योजनेच्या यादीत समाविष्ट केली आहेत मात्र खऱ्या लाभार्थ्यांना अतिक्रमणच्या जागेवर राहत असल्याचे घोषित करण्यात आले असल्याने येथील नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ चौकशी करून खरोखरच येथील ४२ कुटुंबातील नागरिकांनी अतिक्रमण करून वास्तव्यास असलेल्या जागेवर कब्जा मिळविला आहे किंवा नाही या सर्व बाबींची पूर्तता करुन मोकापाहणी करण्यात यावी अशा आशयेची लेखी तक्रार शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम उमरे यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती महागांव यांच्याकडे दाखल केली आहे.

# नियमित योग करा निरोगी व आनंदी जीवन जगा..- प्रा. अशोक उईके

## दोन हजारांहून अधिक नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २१ :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पोलीस कवायत मैदानावर पोलीस प्रशासन, पतंजली योग समिती, आर्ट ऑफ लिव्हिंग, जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळ आणि भाजपाच्या संयुक्त विद्यमाने भव्य योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करत नियमित योगामुळे निरोगी, आनंदी आणि तणावरहित जीवन जगता येते, असा संदेश दिला.



कार्यक्रमात विविध योग प्रशिक्षकांनी प्राणायाम, सूर्यनमस्कार व योगासने यांचे प्रात्यक्षिक सादर केले. दहा वर्षीय कु. ऋतुजा अमोल भोयरकर हिने प्रभावी योग सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. योगाचा प्रसार घराघरांत पोहोचविण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला. पोलीस अधिकारी, वैद्यकीय तज्ज्ञ, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटनांचे प्रतिनिधी आणि नागरिकांसह दोन हजारांहून अधिक योगसाधकांच्या सहभागामुळे यंदाचा योग दिन केवळ औपचारिक न राहता जनआरोग्य जनजागृतीचे प्रभावी व्यासपीठ ठरला.

# मैदानावरील कसून सराव,नियमित व्यायाम केल्यास यश मिळते - राजू डांगे

## विदर्भस्तरीय 3x3 बास्केटबॉल स्पर्धेत नागपूरची बाजी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २१ :** खेळाडूंनी मैदानावर कसून सराव, शिस्त आणि सातत्यपूर्ण मेहनत केल्यासच स्पर्धेत यश संपादन करता येते. आजच्या धावपळीच्या जीवनात प्रत्येकाने नियमित व्यायाम आणि कसरतीला प्राधान्य देऊन आरोग्य तंदुरुस्त ठेवले पाहिजे, असे प्रतिपादन भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष राजू डांगे यांनी केले. स्व. यादवरावजी डांगे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित विदर्भस्तरीय ३x३ बास्केटबॉल स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते.




प्रशासकीय महाविद्यालय, लासिना यांच्या पुढाकाराने यवतमाळ जिल्हा बास्केटबॉल संघटना, क्युरियस स्पोर्ट्स क्लब आणि विशुद्ध विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विवेकानंद-राणी लक्ष्मीबाई विद्यालयाच्या मैदानावर स्पर्धा पार पडली. स्पर्धेत नागपूर, वर्धा, अमरावती, गडचिरोली, अकोला आणि यवतमाळ येथील २० संघांनी सहभाग घेतला. चुरशीच्या सामन्यांनंतर एमएच-३१, नागपूर संघाने विजेतेपद पटकावले, तर एचव्हीपीएम, अमरावती संघ उपविजेता आणि एसकेएम, अमरावती संघ तृतीय क्रमांकाचा मानकरी ठरला. विजेत्या संघाला ७ हजार रुपये, उपविजेत्याला ५ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकाच्या संघाला ३ हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. उत्कृष्ट खेळाडू म्हणून नागपूरच्या सार्थक, तर उत्कृष्ट शूटर म्हणून अमरावतीच्या श्याम यांचा सन्मान करण्यात आला. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रशासकीय महाविद्यालय, लासिना, यवतमाळ जिल्हा बास्केटबॉल संघटना आणि क्युरियस स्पोर्ट्स क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने निषेधार्थ जोडे मारो आंदोलन.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

## उबाठा शिवसेनेचा संताप व्यक्त

**पुसद, दि. २१ :** आज दिनांक २१ जून रोजी सकाळी ११ वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात पुसद येथे उबाठा शिवसेनेच्या वतीने शिवसेनेशी गद्दारी करणाऱ्या खासदार संजय देशमुख यांचे विरोधात तीव्र निषेध व्यक्त करून त्यांच्या प्रतिमेला जोडो मारो आंदोलन करण्यात आले आहे.




यवतमाळ वाशिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे पक्षा तर्फे मशाल या निशाणीवर प्रचंड बहुमताने विजयी झाले त्यांना शिवसैनिकांनी, जनतेने, सामान्य गोरगरीब मतदारांनी तन-मन-धनाने पाठिंबा देऊन प्रचंड बहुमताने विजयी केले. परंतु संजय देशमुख यांनी जनतेचा विश्वासघात केला. पक्षाशी बेईमानी केली. त्यांचे करिता शिवसेना पक्ष प्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांनी वाशिम यवतमाळ लोकसभेच्या सहा विधानसभा मध्ये भर उन्हामध्ये तुफानी प्रचारसभा घेऊन प्रचंड बहुमताने विजय केले. परंतु यांनी पक्षाला धोका दिला पक्षासी गद्दारी केली. त्यांचे निषेधार्थ छत्रपती शिवाजी महाराज चौकात प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. संजय देशमुख यांचा निषेध करण्यात आला गद्दार है गद्दार है संजय देशमुख गद्दार है, राजीनामा द्या राजीनामा द्या,परत निवडून दाखवा शिवसैनिक तुम्हाला जागा दाखवण्यास तयार आहे. आता गाठ शिवसैनिकांसी आहे. जय भवानी जय शिवाजी, हिंदुह्य सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो उद्धवजी ठाकरे आगे बढो हम तुम्हारे साथ है अशा घोषणा देऊन संजय देशमुख यांचा राजीनामा मागण्यात आला व त्यांचा धिक्कार निषेध करण्यात आला. तसेच त्यांचे फोटो वर जोडे मारण्यातआले. या आंदोलनाचे नेतृत्व- शिवसेना माजी उपजिल्हाप्रमुख राजू अण्णा वाकडे यांचे नेतृत्वात माजी विधानसभा संघटक विजय बाबर,माजी शहरप्रमुख हरीश गुरुवानी, युवा सेना उपजिल्हाप्रमुख राहुल सहारे, विभाग प्रमुख राजू वंजारे, उप शहरप्रमुख रवि बहादुरे, विजय वानखेडे, विश्वंभर पाटील, ज्ञानेश्वर बोंबीलवार, गजानन निकस, तुषार व्यवहारे, सागर देवकुळे, कैलास जळगावकर, मनोज देवकुळे, कृष्णा काळे, विक्की वाढवे, रवी भजनावळे, विजय पानपट्टे, अब्बास भाई, संजय पोटे, विक्की वानखेडे, तसेच पुसद शहरातील व तालुक्यातील समस्त मतदारांनी निषेध नोंदवला.

# राजीव माध्यमिक व सूर्यतेज उच्च माध्यमिक विद्यालयात योग दिवस उत्साहात साजरा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**मांडवी, दि. २१ :** राजीव माध्यमिक व सूर्यतेज उच्च माध्यमिक विद्यालय, मांडवी येथे जागतिक योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक कोगुरवार सर यांनी विविध योगासनांचे प्रात्यक्षिक करून दाखविले.तसेच विद्यार्थी व शिक्षकांकडून योग्य पद्धतीने योगासने करून घेतली.सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत विविध योगासने केली. दरवर्षीप्रमाणे यंदाही योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य टोंगलवार सर यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व



सांगत नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बोळकुंटवार सर,आगलावे सर,सौ. मुत्यालवार मॅडम,सौ. बल्लाळ मॅडम,नुगुरवार सर,राकेश सर तसेच मारुती भाऊ यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/४८३/२०२६**
**तहसिलदार उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड**
**दिनांक : - ०२/०६/२०२६**

## जाहीरनामा

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शेख वहाब शेख मुसा रा.उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांची मुलगी नामे दानिया शेख वहाब जन्म दि-२३/०४/२००९ मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक १५.०६.२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा/-
तालुका दंडाधिकारी
उमरखेड

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय






# ४८ कोटींच्या दंडवसुलीचा 'पोस्टमार्टम' होणार ?

## - महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर संशयाचे सावट -निर्णयांच्या साखळीत कोणाचे हित जपले गेले? शासनाचा महसूल वाचवला की दंडग्रस्तांना दिलासा?

**ॲड. समीर ठाकूर**

अकोला : गाजीपूर येथील कथित अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणातील ४८ कोटी रुपयांच्या दंडवसुलीची फाईल आता केवळ महसूल वसुलीची बाब राहिलेली नाही. उलट या संपूर्ण प्रकरणात महसूल विभागातील विविध अधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयांचे, नोंदींचे, हालचालींचे आणि विलंबाचे 'पोस्टमार्टम' करण्याची वेळ आली असल्याची चर्चा प्रशासन व कायदेवर्तुळात सुरू झाली आहे.

कारण या प्रकरणात सुरुवातीपासून आजपर्यंत घडलेल्या प्रत्येक टप्प्याकडे पाहिले असता एक प्रश्न सातत्याने समोर येत आहे तो म्हणजे महसूलचे अधिकारी शासनासाठी काम करत होते की कोणाच्या हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी? दंड ठोठावण्यात आला, त्यानंतर अपील झाले, वसुलीची प्रक्रिया सुरू झाल्याचे दाखविण्यात आले, मालमत्तांचा शोध घेण्यात आला, काही मालमत्तांवर बोजा चढविण्यात आला; मात्र प्रत्यक्ष शासनाच्या खात्यात किती रक्कम जमा झाली याबाबतचे चित्र अद्यापही धूसरच आहे. त्यामुळे आता केवळ दंडग्रस्तांची चौकशी न होता निर्णय घेणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्याच्या भूमिकेची स्वतंत्र चौकशी व्हावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### दंड ठोठावल्यापासून आजपर्यंतची फाईल उघडणार का?

महसूल विभागातील सूत्रांच्या माहितीनुसार या प्रकरणातील प्रत्येक नोंद, प्रत्येक आदेश, प्रत्येक पत्रव्यवहार आणि प्रत्येक शेरा तपासला गेला तर अनेक प्रश्नांची उत्तरे मिळू शकतात. दंड आदेशानंतर वसुलीसाठी कोणत्या तारखेला कोणती कारवाई करण्यात आली? कोणत्या अधिकाऱ्याने कोणते निर्देश दिले? कोणत्या पातळीवर फाईल किती दिवस थांबली? याची कालानुक्रमे चौकशी झाल्यास अनेक धक्कादायक बाबी उघड होऊ शकतात.

### मोठे मासे वाचविण्यासाठी वेळकाढूपणा?

या प्रकरणात सुरुवातीपासूनच चर्चेत असलेले काही प्रभावशाली लाभार्थी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम घटक यांच्यावर कठोर कारवाई करण्यास प्रशासनाने जाणूनबुजून विलंब केला का, हा प्रश्न आता अधिक तीव्रतेने विचारला जात आहे. विशेषतः चांडक यांच्याशी संबंधित कथित मालमत्ता, आर्थिक व्यवहार आणि दंडवसुलीच्या संदर्भातील कारवाईची गती पाहता महसूल प्रशासन खरोखरच वसुली करत होते की वेळ मिळवून देत होते, याची चौकशी होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. कायद्यानुसार शासनाच्या महसुलाचे संरक्षण करणे ही अधिकाऱ्यांची जबाबदारी असताना प्रत्यक्षात कारवाईची गती एवढी संथ का होती, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.

### आता चौकशी केवळ दंडग्रस्तांची नव्हे तर निर्णयकर्त्यांची?

या प्रकरणात आजवर चर्चेचा केंद्रबिंदू दंडग्रस्त व्यक्ती होते. मात्र आता परिस्थिती बदलताना दिसत आहे. कारण दंड ठोठावल्यानंतरची प्रत्येक प्रशासकीय हालचाल तपासली गेल्यास प्रश्नांची दिशा थेट महसूल प्रशासनाकडे वळू शकते. कोणत्या अधिकाऱ्याने कोणता निर्णय घेतला? कोणत्या नोंदी केल्या? कोणत्या नोंदी टाळल्या?कोणत्या कारवाया विलंबित ठेवल्या? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे शासनाला मिळणारा ४८ कोटी रुपयांचा महसूल वाचविण्याऐवजी कोणाचे हित जपले गेले? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी स्वतंत्र, उच्चस्तरीय आणि वेळबद्ध चौकशीची मागणी आता अधिक जोराने पुढे येत आहे.

### शासकीय कंत्राटदाराला 'बळीचा बकरा' बनविण्याचा प्रयत्न?

महसूल वर्तुळात आणखी एका चर्चेने जोर धरला आहे. संपूर्ण प्रकरणातील मूळ लाभार्थी आणि कथित आर्थिक फायदा घेणाऱ्या घटकांऐवजी एका धरण प्रकल्पाशी संबंधित शासकीय कंत्राटदारावर जबाबदारी ढकलण्याचा प्रयत्न सुरू असल्याची चर्चा रंगली आहे. जर प्रत्यक्ष लाभार्थी वेगळे आणि जबाबदारी टाकली जात असलेली व्यक्ती वेगळी असेल, तर हा केवळ कायदेशीर प्रश्न राहणार नाही तर दंडवसुलीच्या संपूर्ण प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा प्रकार ठरू शकतो. यामागे नेमके कोणाचे हितसंबंध आहेत? कोणाला वाचविण्याचा प्रयत्न सुरू आहे? आणि कोणाला पुढे करून संपूर्ण प्रकरणाला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न केला जात आहे? याची चौकशी करण्याची मागणी आता पुढे येत आहे.

### आरआरसी प्रक्रिया नेमकी कुठे अडकली?

४८ कोटी रुपयांची वसुली करण्यासाठी महसूल वसुली प्रमाणपत्र अर्थात आरआरसी प्रक्रिया सुरू करण्याचे संकेत देत ढोल पिटण्यात आले होते.

मात्र त्यानंतर प्रत्यक्ष काय झाले? किती मालमत्ता जप्त झाल्या? किती लिलाव प्रक्रिया सुरू झाली? किती बँक खाती गोठविण्यात आली? किती रक्कम शासनाच्या खात्यात जमा झाली?

या प्रश्नांची अधिकृत उत्तरे अद्याप समोर आलेली नाहीत. त्यामुळे आरआरसी ही प्रत्यक्ष वसुलीची प्रक्रिया होती की कागदोपत्री दाखविण्यासाठी केलेली औपचारिकता, याबाबत संशय व्यक्त केला जात आहे.

### तहसीलदारांना मालमत्ता अचानक कशा सापडल्या?

या प्रकरणातील सर्वात मोठ्या विसंगतींपैकी एक म्हणजे मालमत्तांच्या शोधाची कथा. महिनोनमहिने संबंधितांची मालमत्ता शोधण्यात अडचणी असल्याचे सांगितले गेले.

डिजिटल युगात सातबारा, फेरफार, मालमत्ता नोंदी, नोंदणी विभागाची माहिती, बँक व्यवहार आणि महसुली अभिलेख उपलब्ध असतानाही मालमत्ता शोधण्यात प्रशासनाला अपयश येत असल्याचे चित्र उभे करण्यात आले. मात्र 'जनमाध्यम'ने मालमत्तांची माहिती समोर आणताच काही तासातच शासनाचा दावा चढविण्याच्या हालचाली सुरू झाल्या.

मग प्रश्न असा निर्माण होतो की मालमत्ता आधी नव्हती की शोधण्याची इच्छाशक्ती नव्हती? त्यातही भरीस भर म्हणजे ज्या क्रीम मालमत्ता आहे त्यांच्या सात बाऱ्यावर अद्यापही शासनाचा बोजा चढविण्यात आला नसल्याने अनेक गंभीर प्रश्नांना तोंड फुटत आहे.

### आदिवासी जमिनींच्या प्रकरणात एसडीओंचे मौन का?

गाजीपूर येथील आदिवासी जमिनींवर शासनाची पूर्वपरवानगी न घेता भाडेपट्टे करण्यात आल्याचे खुद्द तत्कालीन एसडीओ यांनी विधिमंडळाच्या लक्षवेधीला उत्तर देताना सांगितले असल्याची नोंद महसूल अभिलेखात आहे. या संदर्भात सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे उपविभागीय अधिकाऱ्यांनी या नोंदीची तपासणी करीत या प्रकाराची माहिती वरिष्ठांना दिली होती का? जर दिली असेल तर त्यावर पुढे काय कारवाई झाली? आणि जर दिली नसेल तर का दिली नाही? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहे. वास्तविकतेत आदिवासी जमिनींशी संबंधित प्रकरणे ही अत्यंत संवेदनशील स्वरूपाची मानली जातात. अशा वेळी वरिष्ठांना अहवाल पाठविण्यात झालेला विलंब किंवा कथित मौन यामागील कारणे समोर येणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# आष्टीकरांनी खासदारकीचा राजीनामा द्यावा..!

## नंतर शिंदेसेनेत नवा राजकीय अध्याय सुरू करावा

**उमरखेड/प्रतिनिधीः-** हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेला सोडून शिंदेसेनेत प्रवेश केल्यानंतर उमरखेड-महागाव विधानसभा क्षेत्रासह मतदारसंघातील नागरिकांमधून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. महाविकास आघाडीच्या पाठिंब्यावर आणि भाजपा-शिंदेसेनेच्या विरोधात जनतेने मतदान करून आष्टीकर यांना निवडून दिले होते. त्यामुळे पक्षांतर करून त्यांनी मतदारांच्या जनादेशालाच तडा दिल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. लोकसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास



ठेवत शिवसेनेचे निष्ठावान कार्यकर्ते, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या कार्यकर्त्यांनी एकजुटीने प्रचार केला होता. त्यातूनच नागेश पाटील आष्टीकर यांना विजय मिळवून देण्यात आला. अशा परिस्थितीत निवडून आल्यानंतर त्यांनी शिंदेसेनेची वाट धरल्याने मतदारांमध्ये नाराजीचा सूर उमटला आहे.सोशल मीडियावरही अनेक नागरिकांनी, ☞(पान २ वर)

'उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या उमेदवारीला महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी जिवाचे रान करून विजय मिळवून दिला.

भाजपा व शिंदेसेनेच्या विरोधातील जनमतामुळेच आष्टीकर खासदार झाले. त्यामुळे शिंदेसेनेत प्रवेश करायचा असेल, तर त्यांनी आधी खासदारकीचा राजीनामा देऊन नव्या पक्षाच्या चिन्हावर पुन्हा निवडणूक लढवावी. त्यातूनच त्यांची कथित निष्ठा आणि जनाधार सिद्ध होईल.'

**-संजय पळसकर,** जिल्हा समन्वयक, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष, उमरखेड

# ट्युशनच्या सहलीत दहावीच्या विद्यार्थ्याचा नाल्यात बुडून मृत्यू

## ट्युशन संचालकांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** शहरातील एका खासगी ट्युशन क्लासच्या सहली दरम्यान दहावीच्या विद्यार्थ्याचा नाल्यात बुडून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना रविवारी उघडकीस आली. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून, सहलीच्या नियोजना बाबत आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

मृत विद्यार्थी थायलेश चंद्रमणी मेश्राम (वय १५) हा यवतमाळ येथील अणे महाविद्यालयात इयत्ता दहावीत शिक्षण घेत होता. तो पराते एज्युकेशन अकॅडमीमध्ये शिकत होता. मिळालेल्या माहितीनुसार, २० जून रोजी रात्री ट्युशनचे शिक्षक मयूर पराते यांनी विद्यार्थ्यांना सहलीसाठी जाण्याची माहिती दिली होती. त्यानुसार रविवारी सकाळी थायलेश घरातून डबा घेऊन शिक्षक व इतर विद्यार्थ्यांसोबत सहलीसाठी गेला. सकाळी १० वाजता आईने फोन केल्यावर थायलेशने आपण मित्र आणि शिक्षकांसह सहलीला जात असल्याचे सांगितले. मात्र, दुपारी त्याच्याशी संपर्क होऊ शकला नाही. दुपारी ३.१४ वाजता शिक्षकांचा ☞(पान २ वर)

# मृग नक्षत्र संपले तरी मान्सूनची हुलकावणीच

## -पावसाअभावी शेतकरी हवालदिल, पेरणी रखडली

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** मान्सून आज येईल उद्या येईल अशी प्रतीक्षा करत मृग नक्षत्र संपले तरी सुद्धा पावसाची पेरणी योग्य दमदार हजेरी झाली नाही. अखेर मान्सून ने हुलकावणी दिल्याने पाऊस कधी येईल आणि पेरणी केव्हा होईल या विवंचनेत शेतकरी असून हवालदिल झाला आहे. शेतकऱ्याचे लक्ष आभाळाकडे लागून आहे. पेरणीचा योग्य कालावधी पावसाअभावी निघून जात असल्याने उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. मृग नक्षत्र संपले तरीसुद्धा पेरणी योग्य पाऊस झाला नाही तेव्हा आद्रा नक्षत्रात समाधानकारक पाऊस येईल आणि पेरणी होईल या आशेवर शेतकरी आहे. कारण पेरणी करिता मृग आणि आद्रा ही दोनच नक्षत्र समाधानकारक असतात असा



शेतकऱ्यांचा विश्वास आहे. जून महिना संपण्याच्या मार्गावर असताना सुद्धा तालुक्यात पेरणी योग्य समाधानकारक पाऊस झाला नसल्याने शेतकऱ्यांचा खरीप हंगाम धोक्यात येऊन पेरणीचे गणितच बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही. आर्थिक गुंतवणूक करून शेतकरी पेरणीच्या तयारीत आहे. महागडे बियाणे खते औषध याची तज बीच करून आहे. आधीच कर्जबाजारी असून सुद्धा बँकेकडून झिडकारल्या नंतर ही सावकाराचे उंबरठे झिजवून पेरणीसाठी जुळवा जुळव करून पावसाच्या प्रतीक्षेत आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती व्यवसाय एक प्रकारे जुगार बनत चालला असताना सुद्धा दरवर्षी आशेने शेतकरी पेरणीच्या माध्यमातून नव्याने डाव ☞(पान २ वर)

# विदर्भात आणखी चार दिवस उष्णतेचा तडाखा

## -२५ जूननंतर पावसाला अनुकूल वातावरण

### -शेतकऱ्यांनी ३० जूनपूर्वी पेरणी टाळावी : प्रा. अनिल बंड

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यातील शेतकरी मान्सूनच्या प्रतीक्षेत असताना मान्सूनची प्रगती अद्याप संथ गतीने सुरू असून तो सध्या हरनई, सोलापूर आणि हैदराबाद परिसरातच स्थिरावलेला आहे. त्यामुळे विदर्भासह राज्यातील अनेक भागांत पावसाची प्रतीक्षा कायम आहे. दरम्यान, २३ जूनपासून मान्सून पुढे सरकण्यासाठी वातावरण अनुकूल होण्याची शक्यता असल्याचा अंदाज हवामान अभ्यासक प्रा. अनिल बंड यांनी व्यक्त केला आहे.

हवामान विभाग आणि स्कायमेटच्या माहितीनुसार, २४ जूनपर्यंत अमरावती, अकोला, बुलढाणा आणि वाशीम जिल्ह्यांत हवामान प्रामुख्याने कोरडे व उष्ण राहण्याची शक्यता आहे. या कालावधीत कमाल तापमान ४२ अंश सेल्सिअसच्या आसपास जाण्याचा अंदाज आहे. यवतमाळसह पूर्व विदर्भातील काही भागांत तुरळक पाऊस पडू शकतो, मात्र उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. हवामान तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, २५ आणि २६ जूनदरम्यान विदर्भातील काही ठिकाणी मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. तसेच २५ जूनपासून पावसाचे प्रमाण हळूहळू वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. दरम्यान, शेतकरी बांधवांनी घाईघाईने पेरणी न करता ३० जूनपर्यंत प्रतीक्षा करण्याचा सल्ला प्रा. बंड यांनी दिला आहे. धूळपेरणी टाळावी, फळबागांना आवश्यकतेनुसार हलके ओलीत द्यावे आणि शेतातील पालापाचोळा व काडीकचरा जाळू नये,विदर्भात आणखी चार दिवस उष्णतेचा ☞(पान २ वर)

# जुन्या वादातून तरुणाची निर्घृण हत्या; धारदार चाकूने केला होता वार

## तीन आरोपी गुन्हे शाखेच्या ताब्यात

### खून प्रकरणाचा अवघ्या सहा तासांत छडा

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील देशी दारू दुकानाजवळ झालेल्या तरुणाच्या खून प्रकरणाचा अमरावती शहर गुन्हे शाखेने अवघ्या सहा तासांत छडा लावत तीन आरोपींना ताब्यात घेतले. आरोपींमध्ये दोन तरुणांसह एका विधीसंघर्षग्रस्त बालकाचा समावेश आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बडनेरा परिसरातील देशी दारू दुकानाजवळ एका तरुणाचा खून झाल्याची माहिती मिळताच पोलीस आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. प्राथमिक तपासात मृताची ओळख ओम आशिष कैथवास (रा. माता फाईल, जुनी वस्ती, बडनेरा) अशी पटली. अज्ञात



आरोपींनी धारदार शस्त्राने वार करून त्याची हत्या केल्याचे निष्पन्न झाले. घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांनी पथकासह घटनास्थळी भेट देऊन तपासाची सूत्रे हाती घेतली. तपासादरम्यान मृतक व आरोपी यांच्यात जुन्या कारणावरून वाद असल्याची माहिती समोर आली. कोणताही ठोस धागादोरा नसताना गुन्हे शाखेने तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे अवघ्या काही तासांत आरोपींचा माग काढला. या कारवाईत रोशन ☞(पान २ वर)

# परतवाड्यात बंद घर फोडून ७.०६ लाखांची चोरी

## २४ तासांत आरोपी जेरबंद

**परतवाडा/प्रतिनिधीः-** परतवाडा शहरातील हरिद्वार नगर परिसरात अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ७ लाख ६ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली. मात्र, परतवाडा पोलिसांनी तत्परता दाखवत अवघ्या २४ तासांच्या आत आरोपीला अटक करण्यात यश मिळविले. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव संजय उर्फ नंदू कवळे (वय ३०, रा. कांडली, परतवाडा) असे आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार मनकाय मधुकर धांडेकर (वय ५०, रा. बदनापूर, हरिद्वार नगर, परतवाडा) यांचे पती आजारी असल्याने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यामुळे १९ जूनच्या रात्री त्या रुग्णालयातच पतीजवळ थांबल्या होत्या. २० जून रोजी सकाळी आंघोळ व इतर कामांसाठी त्या घरी परतल्या असता घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तुटलेले दिसले. घरात प्रवेश केल्यानंतर कपाटे व इतर सामान अस्ताव्यस्त पडलेले आढळून आले. चोरट्याने घरातील लोखंडी पेटी व बक्से फोडून त्यामधील रोख ☞(पान २ वर)

# फायरिंग प्रकरणातील सात आरोपी जेरबंद

## - जुन्या वैमनस्यातून हल्ला

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील असोरिया पेट्रोल पंपाजवळ शनिवारी रात्री शोएब अहमद (वय ३५) यांच्यावर चाकूने हल्ला करून हवेत गोळीबार करण्यात आल्याच्या खळबळजनक घटना घडली. या प्रकरणात नागपुरी गेट डीबी पथकाने अवघ्या काही तासांत सात आरोपींना अटक केली आहे. या घटनेमागे जुने वैमनस्य कारणीभूत असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये सुफियान बेग अन्वर बेग (२३, पठाण चौक), वसीम खान शफी खान (४०, अन्सार नगर), अरबाज खान अहफाज खान (२३, ताज नगर), शेख मन्नू शेख सलीम (३२, रतनगंज), मोहम्मद सुफियान मोहम्मद मन्नान (२४, अन्सार नगर), सय्यद तौसिफ सय्यद नासिर (२४, अन्सार नगर) आणि शेख परवेज शेख सादिक (१८, अन्सार नगर वाडी परिसर) यांचा समावेश आहे. माहितीनुसार, शनिवारी रात्री असोरिया पेट्रोल पंप परिसरात काही युवकांनी शोएब अहमद यांच्यावर चाकूने हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले. हल्ल्यानंतर आरोपींनी परिसरात दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने हवेत गोळीबार केला. या प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती ☞(पान २ वर)

# कारच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू कविठा रोडवरील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** परतवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कविठा रोडवर शनिवारी (दि. २० जून) दुपारी दुर्दैवी अपघातात एका वृद्धाचा मृत्यू झाला. रस्त्यात दुचाकी बंद पडल्याने ती दुरुस्त करत असताना भरधाव कारने धडक दिल्याने हा अपघात घडला. मृत वृद्धाचे नाव ओंकारराव मोतीराम देशमुख (वय ७०, रा. लाखनवाडी) असे आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ओंकारराव देशमुख हे पत्नी शोभा देशमुख यांच्यासह दुचाकीने आपल्या भाचीला भेटण्यासाठी कविठा रोडमार्गे परतवाड्याकडे जात होते. शनिवारी दुपारी सुमारे १२ वाजताच्या सुमारास योगीराज कॉलनीजवळ त्यांच्या दुचाकीत बिघाड झाल्याने ती अचानक बंद पडली. यानंतर ओंकारराव यांनी दुचाकी रस्त्याच्या कडेला उभी करून ती दुरुस्त करण्याचा प्रयत्न सुरू केला. त्याचवेळी समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या एमएच २७/आर ७२२४ क्रमांकाच्या मारुती कारच्या चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवित रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ओंकारराव देशमुख यांना जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत ओंकारराव देशमुख गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी हलविण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच परतवाडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत ☞(पान २ वर)

# आमला येथे गावठी दारू अड्ड्यावर धाड; १.१५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दर्यापूर :** अवैध दारू विक्री आणि गावठी हातभट्टी दारू निर्मितीविरोधात अमरावती ग्रामीण पोलिसांनी सुरू केलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ग्राम आमला येथील पारधी बेडा परिसरात धाड टाकून १ लाख १५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत मोठ्या प्रमाणात गावठी दारू, मोहमाचा सडवा आणि दुचाकी हस्तगत करण्यात आली.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या निर्देशानुसार अवैध दारू व्यवसायाविरोधात कारवाई सुरू असताना उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी यांना गोपनीय माहिती मिळाली होती की, आमला येथील पारधी बेडा परिसरात गावठी हातभट्टीची दारू तयार करून विक्री केली जात आहे. माहितीच्या आधारे पोलीस पथकाने घटनास्थळी धाड टाकली. यावेळी एका घरासमोर मोटारसायकलवर बसून एक व्यक्ती दारू विक्री करताना आढळून आली. मात्र पोलिसांची चाहूल लागताच संबंधित आरोपी घटनास्थळावरून पसार झाला.

झडतीत मोटारसायकलवर ठेवलेली २० लिटर गावठी हातभट्टीची दारू, घराच्या अंगणात लपवून ठेवलेल्या १० प्लास्टिकच्या बाटल्यांमधील २० लिटर दारू, तसेच घरामागील जागेत चार प्लास्टिक ड्रम आणि एका लोखंडी ☞(पान २ वर)

# मोबाईलच्या नादातून १२ वर्षीय मुलाकडून मंगळसूत्र चोरी; सूत्रधारासह गुन्हा उघड

## ९० हजार रुपयांची सोन्याची लगड जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** सरस्वती नगर परिसरातील घरातून चोरीला गेलेल्या सोन्याच्या मंगळसूत्राचा गुन्हा गाडगेनगर पोलिसांनी उघडकीस आणला असून, या प्रकरणात मोबाईलच्या मोहापायी १२ वर्षीय अल्पवयीन मुलाकडून चोरी करवून घेतल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी मुख्य आरोपीकडून सुमारे ९० हजार रुपये किमतीची सोन्याची लगड जप्त केली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सरस्वती नगर येथील रहिवासी मंगेश उत्तमराव आंबेकर यांनी




१ जून रोजी गाडगेनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. २३ एप्रिल रोजी कुटुंबासह लग्नकार्याकरिता बाहेरगावी जाताना ☞(पान २ वर)